# एम.ए (राज्यशास्त्र)

## सत्र - IV (CBCS)

# संयुक्त राष्ट्र

# (THE UNITED NATIONS)

## विषय कोड : 91597

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. बाबासाहेब सखाराम तोंडे**
प्रमुख, यूजी, पीजी आणि संशोधन केंद्र
राज्यशास्त्र विभाग
आरबीएनबी कॉलेज श्रीरामपूर जि अहमदनगर.

**लेखक** : **डॉ.भगवान लोखंडे**
सहयोगी प्राध्यापक
डी. जी. तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालय
तळा जि-रायगड.

**डॉ. बालासाहेब चंद्रप्रकाश किलचे**
सहायक प्राध्यापक
नाथकॉलेज ऑफ एज्युकेशन, औरंगाबाद

: **डॉ. बाबासाहेब त्र्यंबक मोताळे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान
महाविद्यालय, म्हसबि ता. साक्री, जि. धुळे

**डिसेंबर २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना (Introduction) | १ |
| २ | संयुक्त राष्ट्र | २६ |
| ३ | संयुक्त राष्ट्रांची भूमिका | ५८ |
| ४ | आजचे संयुक्त राष्ट्रे | ८३ |

**एम.ए (राज्यशास्त्र)**

**सत्र - IV (CBCS)**

# संयुक्त राष्ट्र

# (The United Nations)

**अभ्यासक्रम**

**Introduction**

a) Approaches: Liberal, Realist

b) Evolution of International Organisations

c) The League of Nations

**United Nations**

a) The United Nations Charter

b) General Assembly, Security Council

c) International Court of Justice, Secretary General

**Role of the United Nations**

a) Maintenance of international peace and security

b) Protection and promotion of human rights,

c) International Labour Organisation, United Nations Educational Scientific Cultural Organisation and World Health Organisation

**United Nations Today**

a) Changing Nature

b) Reforms

c) Relevance

**Reading List:**


1. Thomas George Weiss, Sam Daws (Edt.), The Oxford Handbook on the United Nations, Oxford University Press, New York, 2007
2. Joachim Koops, Norrie MacQueen, Thierry Tardy, Paul D. Williams (Edt), The Oxford Handbook of United Nations Peacekeeping Operations, Oxford University Press, 2015
3. Gordenker, Leon, *The UN Secretary-General and Secretariat*, Second Edition, Routledge, New York, 2010.
4. Karns, Margaret P., and Mingst, Karen A., *International Organisations ThePolitics and Processes of Global Governance*, Viva Books, New Delhi, 2005
5. Krasno, Jean E., *United Nation: Confronting the Challenges of a Global Society*, Lynne Rienner, London, 2004.
6. Mehrish, B.N., *The United Nations in the New Millennium: A Changing Scenario*, Academic Excellence, Delhi, 2007.
7. Moore, John A., and Pubantz, Jerry, *New United Nations: InternationalOrganization in The Twenty-First Century*, Pearson *Prentice Hall*, Upper SaddleRiver, 2006.
8. Singh, J. P., *UNESCO (United Nations Educational, Scientific, and CulturalOrganization) Creating Norms for a Complex World*, Routledge, New York, 2010.
9. Thakur, Ramesh, *The United Nations, Peace and Security*, Cambridge University Press, Cambridge, 2006.
10. United Nations, *United Nations Today*, United Nations Publications, New York, 2008.
11. Whitworth, Sandra, *Men, Militarism, and Peacekeeping: A Gendered Analysis*, Lynne Rienner, Boulder, 2007.
12. Zweifel, Thomas D., *International Organizations and Democracy: Accountability,Politics, and Power*, Lynne Rienner, Boulder, 2005.

# १

# प्रस्तावना (Introduction)

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ आंतरराष्ट्रीय संबंध दृष्टीकोन

१.३ आंतरराष्ट्रीय संबंध उदारमतवादी दृष्टीकोन

१.४ आंतरराष्ट्रीय संबंध वास्तववादी दृष्टीकोन

१.५ आंतरराष्ट्रीय संघटना मूल्यमापन

१.६ राष्ट्रसंघ

१.७ सारांश

१.८ आपण काय शिकलो ?

१.९ संदर्भ सूची

## १.१ उद्दिष्टये

संयुक्त राष्ट्रे हा आंतरराष्ट्रीय संघटनाच्या विकासातील एक महत्वाचा टप्पा मानला जातो. समकालिन संदर्भात संयुक्त राष्ट्रांना जागतिक संदर्भात सर्वोच्च मध्यवर्ती सभेचे स्थान ही प्राप्त झालेले दिसते. यादृष्टीने संयुक्तराष्ट्रांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. या संयुक्त राष्ट्रे घटकाचा परिपूर्ण अभ्यास होण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेखेरीज सिंध्दांताची मांडणी करणारे विविध दृष्टकोन अभ्यासने अनिवार्य आहे. त्यातूनच आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय संघटना यातील सैध्दांतिक विकास व मूलभूत आधारांचा संदर्भ आपणास कळू शकतो. यासाठी या प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेतील दृष्टीकोणांची मांडणी उदारमतवादी व वास्तववादी दृष्टीकोनाच्या संदर्भात करण्यात आली आहे. त्याआधारे आंतरराष्ट्रीय संघटनांचे मूल्यमापन करून आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता व सहकार्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी निर्माण झालेली पहिली आंतरराष्ट्रीय संघटना म्हणून राष्ट्रसंघाची मांडणी ही सविस्तर करण्यात आली आहे. या प्रकरणाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेतील आंतरराष्ट्रीय संघटना ही संकल्पना व तिचा विकास उदारमतवादी व वास्तववादी दृष्टीकोनाची संकल्पनात्मक मांडणी आंतरराष्ट्रीय संघटनाचे मूल्यमापन व राष्ट्रसंघाचे यश अपयश याचे अवलोकन अधिक प्रगल्भ होईल अशी अपेक्षा आहे.

## १.२ आंतरराष्ट्रीय संबंधाचा दृष्टीकोन विकास व स्वरूप

'आंतरराष्ट्रीय संबंध' हा शब्द जेरेमी बेंथम यांना सर्वप्रथम १७८९ साली प्रथम वापरला. तेव्हापासूनच या विषयाकडे एका विशिष्ट दृष्टीकोनातून पाहण्याची प्रक्रिया सुरू झाली. जेरेमी बेंथम पूर्वी ही आंतरराष्ट्रीय संबधास स्वतंत्र विद्याशाखा देण्याचा काहीचा प्रयत्न झालेला

दिसतो. परंतु एक विद्याशाखा म्हणून स्वतंत्र दृष्टीकोन निर्माण होण्याची प्रक्रिया खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये २०व्या शतकातच पार पडली. आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेस अनेक सिद्धांत व दृष्टीकोणांनी उत्तरोत्तर अधिक समृद्ध केलेले आपणांस पहावयास मिळते. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकांनी विविध दृष्टीकोनातून या विद्याशाखेकडे पाहिले त्यामुळे त्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्या सिंद्धाताचा मुलभूत आधार बनलेला दिसतो. त्यामुळे 'दृष्टिकोन' व 'सिंध्दात' या संकल्पनांचा मूळ अर्थ अवलोकन करणे आवश्यक आहे. त्याबरोबरच 'सिंद्धात' व 'दृष्टीकोन' यातील परस्परसंबंध समजून घेणे ही आवश्यक आहे. साधारणत: 'दृष्टीकोन' म्हणजे एखाद्या विशिष्ट घटनेकडे वा विषयाकडे विचारवंताची, शास्त्रज्ञाची पाहण्याची भूमिका वा दृष्टी होय. ज्यामुळे वस्तूस्थितीचे दर्शन घडून येते. वास्तविक दृष्टी हा शब्द Thea या शब्दापासून आलेला आहे. Thea या शब्दाचे विकसित रूप म्हणजे Theary होय. Theary या शब्दास मराठी भाषत 'सिंध्दात' असे संबोधले जाते. 'सिंध्दात' या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ असा सांगितला जातो की, 'सिंध्दात' म्हणजे एखादी गोष्ट, घटना, वस्तुस्थिती आहे तशी समजावून घेवून त्या ज्ञानाच्या आधारे 'अचूक विधान करणे, ज्याची क्षमता भविष्य वर्तविण्याची असेल. अशा निष्कर्षास सिंध्दात असे म्हटले जाते. त्यामुळे 'दृष्टीकोन व सिंध्दात' या परस्पर संबंधित संकल्पना होत.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर सैध्दांतिक मांडणीची निकड प्रकर्षाने जाणवू लागली. १९४५ नंतर तर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या स्वरूपात क्रांतीकारी बदल घडून आले. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये सैध्दांतिक मांडणी करण्याकरिता निरीक्षण, परीक्षण, तार्किकता व अनुभवजन्य पद्धतीवर आधारीत विश्लेषण करण्याची गरज निर्माण झाली. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या कालखंडात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये व्यक्तीच्या नेत्यांच्या वर्तनाच्या अभ्यासास ही प्राधान्य प्राप्त होत गेले. युद्ध व शांततेच्या प्रसंगामध्ये विशिष्ट एखाद्या राष्ट्राचा राष्ट्रप्रमुख कसे वर्तन करतो याचा अभ्यास शास्त्रशुद्ध पध्दतीने करताना वर्तनवादी क्रांती घडून आली. त्यातूनच आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेचा अभ्यास अधिक विश्लेषणात्मक, वस्तूनिष्ठ पद्धतीने करण्यात आला. यातूनच व्यवस्थावादी, वर्तनवादी, खेळ सिंध्दात यासारखे दृष्टीकोण पुढे आले. आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेस सैध्दांतिक स्वरूप प्राप्त करून देण्याचे महत्वाचे कार्य ब्रायर्ली, फेनविक हॉल, लाऊटरपक्ट, ओपन टाईम, स्टार्क वेबस्टर, क्विन्सी राईट, हेन्स मॉर्गेथों, मार्टन काप्लान, मॉडेलस्की, स्टॅनले हॉफमन, जे. डब्ल्यू बर्टन इत्यादी विचारवंतानी केले. यातील प्रत्येक शास्त्रज्ञाचा आंतरराष्ट्रीय संबंधाकडे पाहण्याचा स्वतंत्र दृष्टीकोन होता. त्यांनी मांडलेल्या सिंध्दाताचा व दृष्टीकोनांचा वापर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये नव्याने निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्याकरिता होऊ लागला.

एकंदरीत सिंद्धात व दृष्टीकोन या संकल्पना परस्पर संबंधित व परस्पर पूरक आहेत. साधारणत: दृष्टीकोन म्हणजे अभ्यासकाची विषयाकडे पाहण्याची पध्दत होय. विषयाच्या अध्ययना करिता, विश्लेषणा करिता अभ्यासक आकडेवारीची माहितीची जमवाजमव करण्याकरिता ज्या पद्धतीचा अवलंब करतो तो म्हणजे दृष्टीकोन होय. जेव्हा अभ्यासक दृष्टीकोनाच्या आधारे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनास प्रारंभ करतात तेंव्हा स्पष्टीकरणाकरिता सिंध्दातांची निर्मिती केली जाते. सारांश, दृष्टीकोणातून सिंध्दाताचा विकास होतो.

## १.३ आंतरराष्ट्रीय संबंध उदारमतवादी दृष्टीकोन

आंतरराष्ट्रीय संबंधाचा एक स्वतंत्र विषय म्हणून प्रारंभ झाला त्या काळात म्हणजे साधारणत: पहिल्या महायुद्धानंतरच्या प्रारंभीच्या वर्षांमध्ये उदारमतवादाचा प्रभाव होता. प्रामुख्याने अमेरिका व इग्लंडमध्ये या विद्याशाखांचा विकास झाल्याने तेथील उदारमतवादाचा प्रभाव जागतिक राजकारणाच्या अभ्यासावर पडणे स्वाभाविकच होते. १७ व्या शतकातील ब्रिटिश तत्वज्ञ जॉन लॉक यांच्या 'मानवी स्वभाव व निसर्गावस्था' विषयक विचारांमध्ये उदारमतवादाची पायाभरणी होती. मानव हा मूलत: विवेकी असून आपल्या व इतरांच्याही बऱ्यावाईटाचा तो सारासार विचार करण्याची क्षमता बाळगून असतो. स्वहिता प्रमाणेच समाजाच्या इतरांच्या हिताची भावना वा प्रवृत्ती ही मानवा मध्ये निसर्गत: वसत असते. परस्पर सहकार्य, सद्भाव या स्वाभाविक मानवी प्रवृत्ती असून त्यातूनच मानवाचे समाजशिल स्वरूप व्यक्त होत असते. ही समाज शीलता विविध स्वरूपाच्या सामाजिक संघटना निर्माण करण्यासाठी प्रवृत्त करते. या मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ती मधूनच राज्य कायदा यासारख्या व्यवस्था निर्माण झाल्या. या प्रवृत्तीवरच जागतिक व्यवस्था निर्माण करणे ही शक्य आहे हा आंतरराष्ट्रीय संबंधातील उदारमतवादी दृष्टीकोनाचा गाभा आहे. उदारमतवादी सिंध्दात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये राष्ट्र राज्य व्यवस्था नष्ट करण्याचा आग्रह न धरता केवळ राष्ट्र – राज्यांच्या वर्तनाचे कायद्याने नियमन करण्यास प्राधान्य देतो. त्यामुळे उदारमतवादी दृष्टीकोन ही राज्यकेंद्री सिंध्दाताचा स्वीकार करताना दिसतो.

पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादाची मांडणी करण्याचे प्रथम श्रेय अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांना दिले जाते. त्यांच्या बरोबरीने नॉर्मल एंजेल यांनीही आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादी दृष्टीकोनास प्राधान्य दिले. पहिल्या महायुद्धानंतर व्हर्सायचा तह झाला. या तहातील चौदा कलमे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या उदारमतवादी दृष्टीकोणाच्या विकासात महत्वाची ठरली. त्यातही यातील पुढील पाच कलमांनी आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादी दृष्टीकोनाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावलेली दिसते.

१. गुप्त करार व गुप्त राजनयाची पद्धत बंद करने.

२. मुक्त व्यापारावरील बंधने नष्ट करणे.

३. सर्व राष्ट्रांना स्वसंरक्षणाचे संपूर्ण स्वातंत्र्य देणे.

४. सर्व राष्ट्रांनी शस्त्रकपात करून केवळ अंतर्गत सुरक्षेकरिता आवश्यक तेवढीच शस्त्रास्त्रे बाळगणे.

५. वसाहतींचे प्रश्न व भौगोलिक सीमांचे वाद मिटविण्याकरिता स्वयंनिर्णयाच्या तत्वाचा अवलंब करणे.

वुड्रो विल्सन यांनी प्रामुख्याने दोन धारणांवर आंतरराष्ट्रीय संबंधा मध्ये उदारमतवादाची उभारणी करण्यास प्राधान्य दिले. एक म्हणजे लोकशाहीच्या प्रसाराचे तत्व, विल्सन यांच्यामते, लोकशाही राष्ट्रे बव्हंशी शांतता प्रिय असतात. लोकशाही राष्ट्रांमध्ये युद्धाचे प्रसंग वक्वचित घडून येतात. दूसरे तत्व म्हणजे संशक्त आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती वुड्रो विल्सन यांची अशी धारणा होती की, आंतरराष्ट्रीय संघटना व आंतरराष्ट्रीय कायदा

यामाध्यमातून जागतिक संबंधाचे नियमन करून राष्ट्राराष्ट्रा मधील संघर्ष सोडवता येतात. विल्सन यांच्या मते सत्ता संतुलनापेक्षा संघटना व कायदा ही आंतरराष्ट्रीय सुरक्षेची अधिक विश्वासू साधने होत. वुड्रो विल्सन यांच्या उदारमतवादी विचारांना उदारमतवादी आदर्शवाद असे ही संबोधले जाते.

वुड्रो विल्सन यांच्यानंतर आंतरराष्ट्रीय संबंधातील उदारमतवादी दृष्टीकोनाच्या विकासात नॉर्मल एंजेल यांचे योगदान महत्वाचे आहे. 'द ग्रेट इल्यूशन' या ग्रंथामध्ये नॉर्मल एंजेल यांनी आंतरराष्ट्रीय संबंधाचा उदारमतवादी दृष्टीकोन स्पष्ट केला आहे. नॉर्मल एंजेल यांच्या मते, युद्ध हे उपयुक्त असते व युद्धामुळे जेत्या राष्ट्रास मोठा फायदा होतो ही मुलत: गैर समजूत आहे. आधूनिक काळा मध्ये दुसऱ्या राष्ट्राचा प्रदेश जिंकून घेण्याची मोठी किमंत विजेत्या राष्ट्रासही मोजावी लागते. शिवाय युद्धामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर विपरीत परिणाम होऊन नुकसान होते ते वेगळेच. एंजेल यांच्या या मांडणीचा आधार घेवून पुढील काळात उदारमतवादाच्या प्रवर्तकांनी असा विचार मांडला की, 'राष्ट्राराष्ट्रांच्या वाढत्या आर्थिक, व्यापारी परास्परावलंवित्वांमुळे युध्दाची उपयुक्तता आपोआप कमी होत जाईल व आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे व संघटनांचे महत्व वाढेल.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये या उदारमतवादी विचारांच्या प्रभावातूनच १९२० च्या दशकातील सुधारनेचा आदर्शवादी कार्यक्रम तयार झाला. राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. राष्ट्रसंघाच्या माध्यमातून प्रथमच सामूहिक सुरक्षेच्या तत्वाचा स्वीकार जागतिक राष्ट्र समूहाने केला. १९२१ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना ही उद्यास आली. १९२८ च्या केलॉग – क्रिआंद कराराने युद्ध बेकायदेशीर ठरवले गेले. स्वयंनिर्णयाच्या तत्वाच्या आधारे ऑटोमन, जर्मन, रशियन व ऑल्ट्रो हेगरीयन साम्राज्यातील प्रदेशांची पुनर्रचना करून नवीन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण करण्यात आली. या राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनव्यवस्थेची प्रस्थापना करण्यात आली. परंतु उदारमतवादाची ही घौडदौड १९३०च्या घडलेल्या घटनाक्रमाने थांबली. उदारमतवादाची मूल तत्वे मागे सारून परत युरोपमध्ये शस्त्रस्पर्धा व सत्तासंतूलनच्या तत्वाने आक्रमक स्वरूप धारण केले.

दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी प्रामुख्याने अलिप्ततावादाचा पुरस्कार करून परत आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादी दृष्टीकोणास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. भारताने या सर्व प्रक्रियेत पुढाकार घेतला. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधा मध्ये उदारमतवादी दृष्टीकोन विकसित करण्यात प. जवाहरलाल नेहरूंचे योगदान महत्वाचे मानले जाते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर प्रधानमंत्री नेहरूंनी प्रामुख्याने उदारमतवादी तत्वांच्या आधारेच भारताच्या परराष्ट्र धोरणाची उभारणी केली. अलिप्ततावादी धोरणाचा अवलंब असो वा आंतरराष्ट्रीय संघटनांना दिलेले महत्व असो त्यामागे प. जवाहरलाल नेहरूंचा उदारमतवादी दृष्टीकोणच प्रभावी होता हे स्पष्ट दिसते.

१९६० व १९७०च्या पाश्चिमात्य जगतातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडींमुळे परत एकदा आंतरराष्ट्रीय संबंधा मध्ये उदारमतवादी दृष्टीकोणाच्या विकासास चालना मिळाली. या काळात उदारमतवादाच्या नव्या शाखा निर्माण झाल्या त्यास नवउदारमतवाद

या नावाने संबोधले गेले. या काळातील उदारमतवादामध्ये आदर्शवादाचा प्रभाव कमी होऊन त्यास वैज्ञानिक स्वरूप प्राप्त झाल्याचे स्पष्ट दिसते. यादृष्टीने पश्चिम युरोपमधील क्षेत्रीय सहकार्याचा व आर्थिक एकात्मीकरणाचा कार्ल ड्वाईश व सहकाऱ्यांनी वैज्ञानिक पध्दतीने अभ्यास केला. ड्वाईश यांनी अशी मांडणी केली की, 'स्वतंत्र राष्ट्रांदरम्यान सातत्याने चालणाऱ्या विशेषत: आर्थिक, व्यापारी देवाण घेवाणीमुळे त्या राष्ट्रातील नागरिकांमध्ये सामाईक ओळख व सामाईक मूल्यव्यवस्था विकसित होण्यात मदत होते. त्यामुळे शांतता व सहकार्य वाढीस लागते. रॉबर्ट कोहेन व जोसेफ नाथ यांच्या विश्लेषणानुसार पाश्चिमात्य जगातील देशांमध्ये गुंतागुंतीचे परस्परावलंबित्व निर्माण झाले आहे. परस्परावलंबित्व हे दोन देशांच्या शासनातील संबंधापुरतेच मर्यादित नसून जनतेच्या पातळीवरील सामाजिक संबंध, उद्योगधंद्याचे सीमापार अस्तित्व व तद्नुषंगाने येणारे संबंध असा त्याचा विस्तार झाला आहे. लष्करी सामर्थ्य हे परराष्ट्र धोरणाचे प्रमुख साधन राहिलेले नाही. या सगळ्यांमुळे पाश्चिमात्य देशांदरम्यान संघर्षाची व युद्धाची शक्यता अगदीच नगण्य झाली आहे. या विचारांनाच परस्परावलंबित्वाचा उदारमतवाद असे संबोधले जाते.

उतोरान यंग यांनी आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादी दृष्टीकोणाचे महत्व विशद करताना नवउदारमतवादी संस्थावाद विकसित केला. त्यांच्या मते संस्था दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे, आंतरराष्ट्रीय संघटना व दूसरी म्हणजे आंतरराष्ट्रीय नियमव्यवस्था संस्थाच्या वाढत्या जाळ्यांमुळे राजकीय व सामायिकच नव्हे तर आर्थिक, सामाजिक विषयांवरील आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढीस लागले आहे. 'त्यांच्या या विचारांनाच आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये उदारमतवादी संस्थावाद या नावाने संबोधले जाते.

आंतरराष्ट्रीय संबंधातील उदारमतवादी दृष्टीकोणाच्या विकासात मायकल डॉवेल यांचे ही योगदान महत्वाचे मानले जाते. मायकल डॉवेल यांनी लोकशाहीजन्य शांततेचा सिंध्दात मांडला आहे. त्यांच्या मते, 'राष्ट्राराष्ट्रातील विवादाची शांततामय मार्गाने सोडवणूक, सामाईक मूल्यव्यवस्था व आर्थिक सहकार्य या तीन गोष्टींमुळे लोकशाही देशांदरम्यान युद्धे कमी होतात व शांतता नांदते. या सिद्धांताचे समर्थक असे नमूद करतात की, 'जगात लोकशाहीचा जसजसा प्रसार होईल तसतशी युद्धांची शक्यता कमी होऊन शांततेचे क्षेत्र विस्तारत जाईल. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये नवउदारमतवादाचा प्रभाव परत वाढावयास सुरूवात झाल्याचे निदर्शनास येते.

सारांश, आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही प्रामुख्याने सार्वभौम राष्ट्र राज्यांचीच व्यवस्था असली तरी त्यात संघर्ष अटळ नसून राष्ट्र राज्यांचे एकमेकांशी सहकार्य शक्य आहे हे उदारमतवादी दृष्टीकोनाचे प्रमुख गृहीतक आहे. ज्याप्रमाणे व्यक्ती विवेकाने विचार करून व्यवस्था व सुरक्षा प्रस्थापित करू शकतात त्याचप्रमाणे राष्ट्र राज्ये ही व्यवस्था व सुरक्षा प्रस्थापित करू शकतात अशी उदारमतवादी दृष्टीकोणाची धारणा आहे. अभिजात उदारमतवादा मध्ये 'सामूहिक सुरक्षेची संकल्पना' हे सुरक्षेचे प्रमुख साधन मानले गेले आहे. नवउदारमतवादी परस्परावलंवित्वाचा सिंध्दात आर्थिक तसेच इतर पातळ्यांवरील परस्परावलंबित्व जसे वाढते तशी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती वाढते, असे मानतो. नवउदारमतवादी संस्थावादामध्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून

राष्ट्राराष्ट्रातील सहकार्य वाढते असे मानले आहे तर लोकशाहीजन्य शांततेच्या सिंध्दातामध्ये लोकशाहीचा प्रसार हेच सुरक्षेचे व सहकायार्च साधन मानले गेले आहे.

## १.४ आंतरराष्ट्रीय संबंधाचा वास्तववादी दृष्टीकोन

आंतरराष्ट्रीय संबंध या अभ्यासविषयासव्यापक व प्रगल्भ करण्यात वास्तववादी दृष्टीकोणाचे योगदान सर्वाधिक महत्वाचे आहे. वास्तववादी दृष्टीकोण हा तथ्ये व वास्तविकता यावर आधारित असून पूर्व मान्यता वा नैतिक आदर्श याला या सिंध्दातात कोणतेही स्थान नाही. वास्तववादी विचारवंत संरक्षण, शक्ती यांना केंद्रबिंदु ठेवून त्या दृष्टीकोनातूनच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विश्लेषण करतात. वास्तववादी दृष्टीकोणाची मूळ ही १८ व्या व १९ व्या शतकातील विचारवंताच्या लेखनात मोठ्या प्रमाणात दिसत असली तरी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीने या दृष्टीकोनाचा वापर १९३० नंतरच प्रामुख्याने होऊ लागला. प्रो. निकोलस ट्राइट्रश्के, नित्शे, हॅराला, डेव्हीड ईस्टन, इ. एच. कार, क्विन्सी राईट  इत्यादी विचारवंतानी आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाकरिता सत्तावादी दृष्टीकोन स्वीकारला असला तरी या दृष्टीकोणास वास्तविक सैध्दांतिक बैठक देण्याचे कार्य हॅन्स मॉर्गेथों यांनीच पार पाडले असे स्पष्ट दिसते. त्यामुळेच मॉर्गेथों यांना वास्तववादी दृष्टीकोनाचे आद्य प्रवर्तक मानले जाते.

आदर्शवादी दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय राजकारणातील समस्यांची सोडवणूक करण्यात अपयशी व अपूरा ठरल्यानंतर त्याची जागा वास्तववादी दृष्टीकोणाने घेतली. वास्तववादी दृष्टीकोणाचे प्रमुख तत्व असे आहे की, 'प्रत्येक राजकीय पुढारी आपल्या राष्ट्राचे हित साध्य करण्याचा प्रयत्न करीत असतो. हे हित साध्य करण्याकरिता त्यास सत्ता किंवा शक्ती या साधनाचा उपयोग करावा लागतो. या अर्थाने हा दृष्टीकोन सत्ता या घटकास सर्वाधिक प्राधान्य देतो म्हणून त्यास 'सत्तावादी दृष्टीकोन' असे ही संबोधन वापरले जाते. मॉर्गेथों यांनी 'पॉलिटिक्स अमॉंग नेशन (Politics Among Nations)या ग्रंथात वास्तववादी दृष्टीकोनाची मांडणी केली आहे.

आर्थिक तसेच इतर पातळ्यांवरील परस्परावलंबित्व जसे वाढते तशी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती वाढते, असे मानतो. नवउदारमतवादी संस्थावादामध्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांच्या माध्यमातून राष्ट्राराष्ट्रातील सहकार्य वाढते, असे मानले आहे तर लोकशाहीजन्य शांततेच्या सिंध्दातामध्ये लोकशाहीचा प्रसार हेच सुरक्षेचे व सहकार्याचे साधन मानले गेले आहे.

**वास्तववादी सिंध्दात अर्थ –**

वास्तववादी दृष्टीकोणाची मांडणी करतांना काही प्रमुख विचारवंतानी वास्तववादी दृष्टीकोणाचा स्पष्ट केलेला अर्थ अवलोकन करणे आवश्यक ठरते. त्यातील काही प्रमुख विचारवंताचा संदर्भ पुढील प्रमाणे मांडता येईल.

### १. शुमन

'आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे सत्तेसाठी चाललेला संघर्ष होय. वास्तववादी आदर्शवादी तत्वांवर विश्वास ठेवत नाहीत. ते जागतिक शांततेपेक्षा राष्ट्रीय हितास महत्व देतात.'

### २. आय. एल. क्ल्हाड

'आजच्या युगात सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे सत्तेची योग्य व्यवस्था होय.'

### ३. मोर्गेन्था

'सत्ता म्हणजे एका माणसाचे दुसऱ्या माणसाच्या मन व कृतीवरील नियंत्रण होय.'

एकदंरित वास्तववाद्यांच्या दृष्टीने, 'सत्तेची लालसा जी मनुष्यात असते तशीच ती राष्ट्रातही असते. सत्तेची लालसा जोपर्यंत शेवटच्या व्यक्तीवर अधिपत्य स्थापित होत नाही तोपर्यंत कायम असते. प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टदेखील सत्तेच्या माध्यमातून इतरांवर प्रभाव पाडणे हेच असते. सत्तावादी दृष्टीकोनाचे समर्थक राजकीय प्रक्रियेत तीन घटकांना प्राधान्य असल्याचे निदर्शनास आणून देतात. एक म्हणजे, सत्ता संपादन करणे व तीचे जतन करणे, दूसरे सत्तेत सतत वाढ व वृद्धी करणे व तिसरे सत्तेचे सतत प्रदर्शन करणे. वास्तववाद्यांच्या मते, या तीन घटकांमधूनच साम्राज्यवादी धोरण व प्रतिष्ठेचे धोरण निर्माण होते. वास्तविक याच उद्देशाने १९१४ ते १९४५ दरम्यान आंतरराष्ट्रीय राजकारणावर भाष्य करण्याकरिता व दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोव्हिएत रशिया या दोन राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचे समर्थन करण्याकरिता वास्तववादी सिंध्दाताचा वापर शीतयुद्ध काळात झाला.

## वास्तववादी सिंध्दाताची प्रमुख तत्वे :-

वास्तववादी सिंध्दातासंदर्भातील वरील भाष्यांवरून त्याची काही प्रमुख तत्वे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. वास्तववादी दृष्टीकोन विचारांपेक्षा ऐतिहासिक घटनांना अधिक प्राधान्य देतात. ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण करून वास्तववाद आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सत्तेस असलेले केंद्रस्थान स्पष्ट करतात.

२. वास्तववादी दृष्टीकोण व्यक्ती व राष्ट्र यांची तुलनात्मक मांडणी करून ज्या प्रेरणा व्यक्तीच्या वर्तनास प्रभावित करतात त्याच प्रेरणा राष्ट्राच्या वर्तनास देखील प्रभावित करतात हे दाखवून देतात.

३. वास्तववादी दृष्टीकोन एकल विचाराच्या तत्वापेक्षा वैश्विकतेस अधिक प्राधान्य देतो. वास्तववादी हा वैश्विक दृष्टीकोन काही परस्पर संबंधित तत्वांवर आधारलेली असून ही गृहीतत्वे व्यक्तीचे वर्तन व व्यक्तीच्या प्रेरणा, व्यक्ती व सभोवतालची परिस्थिती यांच्यातील परस्परसबंधाशी व उत्तरजिवित्वाशी निगडीत आहे.

४. वास्तववादी दृष्टीकोनाचे प्रवर्तक राष्ट्रकेंद्रित, आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते आंतरराष्ट्रीय व्यवस्था ही राष्ट्रकेंद्रित व्यवस्था असून भविष्यामध्ये ही राष्ट्र हा घटकच केंद्रस्थानी राहिल.

५. वास्तववादी दृष्टीकोनाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अराजकता व संघर्ष या घटकांचे अस्तित्व चिरंतन आहे. या परिस्थितीच्या घटकांतून राष्ट्रे सत्ता प्राप्ती करीता प्रयत्न करीत असतात.

६. वास्तववाद असे प्रतिपादन करतो की, ‘राष्ट्रांमध्ये सत्तास्थान व क्षमतेस अनुसरून अधिकार श्रेणी असते.

७. वास्तववादी दृष्टीकोन सार्वभौम स्वातंत्र्याची संकल्पना प्रस्तुत करतात. त्यांच्या मते, सत्तेच्या आधारावर अधिकार श्रेणी असली तरी कायद्याच्या पातळीवर सर्व राष्ट्रे समान असतात. यालाच वास्तववादी ‘सार्वभौम स्वातंत्र्य’ असे संबोधतात.

८. वास्तववाद देशांतर्गत धोरण व परराष्ट्र धोरण या दोन बाबी स्वतंत्र असल्याचे स्पष्ट करतात.

**मॉर्गेथों यांचा वास्तववादी सिंध्दात –**

हॅन्स मॉर्गेथों यांनी ‘पॉलिटिक्स अमॉग नेशन्स’ या ग्रंथात वास्तववादी सिंध्दाताचे प्रतिपादन प्रमुख सहा तत्वांच्या आधारे केले आहे. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वास्तविक नियमानुसार नियंत्रण**

मॉर्गेथों यांच्या मते, राजकारण मानवी व्यवहारावर आधारित अशा वस्तुनिष्ठ नियमानुसार घडत असते. विशेषत: ज्या नियमाच्या आधारावर मनुष्य व्यवहार करतो ते नियम अंतर्मनावर अवलंबून असतात. त्यामुळे त्यांना विरोध करण्याचा अधिकार कोणासही नसतो. मॉर्गेथों यांच्या मते, सामान्य सामाजिक नियमांप्रमाणे राजकारण देखील काही स्थूल नियमांद्वारे नियंत्रित होत असते. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या राजकीय व्यवहारांची माहिती प्राप्त करण्याकरिता वा त्या सुधारणा करण्यासाठी प्रथम या नियमांचे ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. ‘मॉर्गेथों पुढे हे ही स्पष्ट करतात की,’ हे नियम कोणत्याही नैतिक नियमांद्वारे नियंत्रित होत नसतात. एकंदरीत वास्तववादी सिंध्दाताच्या दृष्टीने बुध्दी व अनुभव यांना राजकीय सिंध्दातास आधारभूत स्थान आहे. उदा. एखाद्या देशाचे परराष्ट्र धोरण अवलोकन करण्याकरिता तेथील घटना व परिणामांचे विश्लेषण करणे आवश्यक असते. राजकीय नेत्यांनी केलेल्या कार्यातून त्यांच्या उद्देशांचा अंदाज लावता येतो व अशा प्रकारे तथ्यांचे तर्कसंगत विश्लेषण करून काही निष्कर्ष काढता येतात व तथ्यांची रचना ही करता येते.

**२. राष्ट्रीय हितासाठी सत्तेचा वापर –**

वास्तववादी सिंध्दाताचा दूसरा मूलभूत आधार म्हणून मॉर्गेथों राष्ट्रीय हितास प्राधान्य देतात. मॉर्गेथों यांनी राष्ट्रीय हिता करिता शक्ती वा सत्ता हा शब्द वापरला

आहे. मॉर्गेथों यासंदर्भात असे प्रतिपादन करतात की, शक्तीकिंवा सत्ता म्हणजे एका व्यक्तीचे अन्य व्यक्तीच्या बुध्दी व कार्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे होय.' वास्तववादी सिंध्दाताअन्वये राजकीय नेतृत्वास नैतिक व अनैतिक अशा बाबींचा विचार न करता राष्ट्राच्या हितास प्राधान्य देऊन विचार व कार्य पार पाडावे लागतात. परिणाम स्वरूप कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण हे त्या राष्ट्राचे हित आवश्यकता या आधारेच सुनिश्चित होते. एकंदरित, वास्तववादी विचारवंत विशुध्द राष्ट्रीय हित व शक्ती किंवा शक्तीद्वारे त्याची प्राप्ती हे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे प्रमुख तत्व मानतात. राष्ट्रीय हित साध्य करण्याकरिता नैतिकतेचा विचार करू नये असे हा सिंध्दात स्पष्ट स्वरूपात प्रतिपादन करतो. जोसेफ फ्रँक्वेल यासंदर्भात म्हणतात, 'राष्ट्रीय हित साधणे हे परराष्ट्र धोरणाचे मूलतभूत तत्व आहे.'

## ३. परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रीय हिताचा विचार –

मॉर्गेथों यांच्या वास्तववादी सिंध्दाताचे तिसरे प्रमुख तत्व म्हणजे राष्ट्रीय हित हे कायम नसून त्यात परिस्थितीनुसार परिवर्तन होत असते. राष्ट्रीय हिताची कल्पना बदलत्या परिस्थितीत भिन्न असू शकते. मॉर्गेथों यासंदर्भात हे स्पष्ट करतात की, 'परिस्थिती राजकीय राष्ट्रीय हित निर्धारण करण्यात महत्वाची भूमिका बजावित असते. तसेच त्या हिताच्या अनुषंगानेच राजकीय व्यवहार निश्चित होत असतात.' याच कारणामुळे बदलती परिस्थिती लक्षात घेऊन राजकिय नेतृत्वास राष्ट्रीय शक्तीचा विचार करून परराष्ट्र धोरण निश्चित करावे लागते. उदा. एखादे अविकसित राष्ट्र विकसनशिल राष्ट्रांच्या गटात सामील होते किंवा एखादे विकसनशिल राष्ट्र आपल्या आर्थिक प्रगतीच्या आधारावर विकसित राष्ट्रांच्या गटात सामील होते. तेंव्हा त्यांच्या गरजांमध्ये बदल होणे स्वाभाविक ठरते. त्यामुळे वास्तववादी दृष्टीकोन बदलत्या परिस्थितीनुसार शक्तीवर आधारित राष्ट्रीय हिताचा विचार करतात.

## ४. नैतिकतेला गौण स्थान –

नैतिकता, नीती, नियम यासारख्या बाबींना वास्तववादाचा प्रखर विरोध नसला तरी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये मात्र राष्ट्राचे हित, गरज व परिस्थिती विचारात घेऊनच निती नियमांचा उपयोग करावा लागतो. आवश्यकता वाटलीच तर अनैतिक मार्गाचा अवलंब ही राष्ट्रहितासाठी करावा असे मॉर्गेथों स्पष्ट करतात. त्यांच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारणात नैतिकतेपेक्षा विवेक व दूरदर्शीपणा यास अधिक महत्व असते. मॉर्गेथों यांच्या मते व्यक्तीचा स्वार्थ, भीती, उत्तरजिवित्वाची चिंता, सत्तेचे आकर्षण या बाबी व्यक्तीमध्ये नैसर्गिक असून व्यक्तींच्या वर्तनाची ती प्रेरणास्थाने आहेत. व्यक्तीप्रभानेच राष्ट्राचे वर्तनदेखील याच प्रेरणा स्थानांवर आधारलेले असते. त्यामुळे राष्ट्रीय हितसंबंधांचे समायोजन वा आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेकरिता राष्ट्रीय हितसंबंधाचा बळी दिला. जावू शकत नाही.

## ५. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामान्य नैतिक नियमात पृथकता –

मॉर्गेथों यांनी वास्तववादाची मांडणी करताना राष्ट्रीय नैतिकता, नितीमत्ता व आंतरराष्ट्रीय नैतिकता यामध्ये कोणत्याही प्रकारचा संबंध वा समन्वय मान्य केलेला

दिसत नाही. मॉर्गेथोंच्या मते, 'आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र राजकीय व्यक्तिमत्व असून स्वत:च्या हिताची पूर्ती करते हेच त्याचे प्रमुख कार्य होय. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नैतिकतेचे नियम त्यावर बंधनकारक असू शकत नाहीत.

वास्तववादी सिंध्दाताच्या दृष्टीने नैतिक नियमांचे अस्तित्व परराष्ट्र धोरणात असता कामा नये. कारण प्रत्येक राष्ट्रातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थिती नुरूप नैतिकतेच्या धारणा या वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वास्तववादी दृष्टीकोन कोणत्याही राष्ट्राच्या नैतिक इच्छा आकांक्षा व जगाला नियंत्रित करणाऱ्या नैतिक नियमांमध्ये समन्वय स्थापन करीत नाही. या दोहोंचे नियम पृथक असतात असे वास्तववादी सिंध्दात स्पष्ट करतो.

**६. राजकिय विचारांची श्रेष्ठता –**

वास्ववादाचा भर राजकिय क्षेत्रात स्वायत्तता प्रस्थापित करण्यावर असल्या कारणाने सिंध्दात कर्त्यांनी राजकीय विचारांना राष्ट्रीय हित, राष्ट्रीय सत्ता व संघर्ष यांना अग्रक्रम देवून वैज्ञानिक व नैतिक दृष्टीकोन पूर्णत: नाकारला आहे. वास्तववादी सिंध्दातात राजकीय विचारांना प्राधान्य दिले जाते. त्यामुळे वास्तववाद आंतरराष्ट्रीय राजकारणा संदर्भात वैज्ञानिक किंवा नैतिक दृष्टीकोणाचे महत्व स्वीकारण्याच्या विरोधात आहे.

सारांश मॉर्गेथों यांनी वास्तववादाची जी सहा मूलभूत तत्वे मांडली आहेत त्यातून मॉर्गेथों प्रामुख्याने पुढील तीन बाबींना अधिक महत्व देत असल्याचे दिसते.

१) राजकीय व्यक्तींची आपल्या राष्ट्राचे हित साध्य करण्याची ईच्छा

२) कोणत्याही राष्ट्राचे हित हे त्या राष्ट्राच्या सीमेसंबंधी तसेच आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक प्रभाव वाढविण्याशी संबंधित असते

३) राष्ट्रीय हिताच्या रक्षणाकरिता किंवा पूर्तीसाठी राज्य शक्तींचा वापर करीत असतात.

**वास्तववादी दृष्टीकोणाचे टिकात्मक परीक्षण –**

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये वास्तववादी सिंध्दाताने आपले अढळ स्थान निर्माण केले असले तरी वास्तववादी सिंध्दातावर प्रामुख्याने पुढील प्रमाणे टिका केली जाते.

**१) अशास्त्रीय सिंध्दात –**

टिकाकारांच्या मते, मॉर्गेथों यांचा वास्तववादी सिंध्दात हा अशास्त्रीय आहे. कारण मॉर्गेथोंने शास्त्रीय निकष आपल्या सिंध्दात विश्लेषणात कोठेही वापरलेले दिसत नाहीत. टिकाकारांच्या मते, तथ्यांच्या अनुभवजन्य संशोधनातून सामान्य विधान काढणे, त्या आधारावर एक निश्चित सिंध्दात प्रस्थापित करणे आवश्यक असते. परंतु मॉर्गोथोंने असे काही न करता सर्व व्यक्ती व सर्व राज्ये सत्तेकरिता संघर्ष करीत असतात असे विधान करून त्यावर सिंध्दाताची उभारणी केली आहे. मॉर्गेथों यांनी ही यासंदर्भात असे प्रतिपादन केले आहे की, त्यांचा सिंध्दात मानवी स्वभावावर

आधारलेला आहे. मात्र त्यांची मानवी स्वभावाची कल्पना वैज्ञानकि नाही. मॉर्गेथों मानवी स्वभावाच्या केवळ सत्ता स्पर्धा याच पैलूवर भर देतात. एकंदरीत मॉर्गेथों यांची सिंध्दात उभारणी केवळ व्यक्तिगत धारणा, अंदाज व अनुमानाच्या आधारावर झालेली असल्याने ती अशास्त्रीय वाटते.

**२) सुंसगतीचा अभाव –**

मॉर्गेथों यांनी आपल्या सिंध्दातास वास्तववादी असे संबोधले असले तरी या सिंध्दातामध्ये खुद्द मॉर्गेथों यांनीच काही आदर्शवादी तत्वे ही प्रतिपादन केली आहेत. राजकीय नेत्यांनी कसे वर्तन ठेवावे, राजनयाने कोणती कार्य करावीत याविषयीची मॉर्गेथों यांची मते आदर्शवादी आहेत. त्यामुळे हा सिंध्दात वास्तववाद व आदर्शवादा बरोबरच मूल्यपूरक आहे. त्यामुळे सुंसगतीचा अभाव हा दोष या सिंध्दातांस लागू होतो असे टिकाकारांना वाटते.

**३) अपूर्ण सिंध्दात –**

टिकाकारांच्या मते अपूर्ण सिंध्दात हा दोष मॉर्गेथोंच्या वास्तववादी सिंध्दातास लागू होतो. कारण, मॉर्गेथों यांनी राज्ये सत्तेसाठी संघर्ष करतात असे मानून आपला दृष्टीकोन विकसित केला आहे. परंतु राज्ये केवळ संघर्षच करीत नाही तर आपल्या गरजांच्या पूर्तीकरिता परस्परांशी सहकार्य ही करतात व त्यातूनच राष्ट्रीय हित साध्य करतात. हेरल्ड स्प्राऊट यांनी यासंदर्भात टिका करताना असे नमूद केले आहे की, मॉर्गेथोंने आपल्या सिंध्दातात राष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टाची चर्चा केली नसल्यामुळे हा सिंद्धात अपूण ठरतो.

**४) वस्तूनिष्ठतेचा अभाव –**

टिकाकारांच्या मते, मॉर्गेथोंच्या वास्तववादाच्या सिंध्दात समकालिन संदर्भात वस्तूनिष्ठतेचा अभाव मोठ्या प्रमाणात दिसतो. कारण आधूनिक काळात अण्वस्त्रांच्या संशोधनामुळे सर्वच राष्ट्रांसमोर सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहिला आहे त्यामुळे आज प्रत्येक राष्ट्र राष्ट्रीय हिताऐवजी सामूहिक सुरक्षिततेस अधिक प्राधान्य देत आहे. रेमण्ड एरीन यासंदर्भात म्हणतात, ‘विचार प्रणाली व नियम यांच्यातील संबंधाकडे हा सिंध्दात दुर्लक्ष करतो. त्यामुळे या सिंध्दातास वस्तुनिष्ठ मानणे चुकीचे ठरेल.

**५) स्वायत्तेतेबाबत संदिग्धता –**

टिकाकारांच्या मते, मॉर्गेथों यांनी राजकीय क्षेत्राच्या स्वायत्ततेवर भर दिला असला तरी स्वायत्तता शब्दाचे स्पष्टीकरण मात्र त्यांनी कोठेच दिलेले नाही. मॉर्गेथोंच्या पुढील विधानाने याबाबत संदिग्धता अधिक वाढवलेली दिसते. ते म्हणतात कि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ध्येय सामान्य असले पाहिजे त्यामुळे त्याला अन्य क्षेत्रातही प्रवेश करता येईल. राजकिय क्षेत्राची स्वायत्तता सांगत असताना इतर क्षेत्रात प्रवेश करण्याचे उद्देश ठेवणे हे परस्पर विसंगत आहे अशी टिका त्यामुळे या सिंध्दातावर होते.

**६) स्थितीशिल सिंध्दात –**

मॉर्गेथोंच्या मते, राजकीय जग हे स्थितीशील असून सत्ता संबंध हे नेहमी सारखेच राहतात असे हा सिंध्दात प्रतिपादन करतो. टिकाकारांच्या मते व्यावहारिक वास्तव मात्र वेगळे आहे. स्टॅन्ले हॉफमन यांनी यासंदर्भात असे म्हटले आहे की, 'या सिंध्दाताच्या स्थितीशील स्वरूपामुळे राज्याच्या वर्तनावर प्रभाव पडून आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये बदल घडवून आणणाऱ्या घटकांची हा सिंध्दात नोंद घेत नाही. एकंदरीत ज्या घटकांमुळे राज्याच्या वर्तनात फरक पडू शकतो त्याची नोंद न घेताच भविष्यकालीन घटनांचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न हा सिंध्दात करीत असल्याकारणाने त्यास मर्यादा पडतात असे दिसते.

**७) स्वप्नवादी सिंध्दात –**

डॉ. ॲडी यासंदर्भात टिका करताना म्हणतात की, 'वास्तववाद एका सिमेपर्यंत ताणला जाणे म्हणजे ते एक अवास्तव बनते. आणि त्यातून तो स्वप्नवाद बनतो. म्हणून वास्तववाद हा सुद्धा प्रत्यक्षात न उतरणारा स्वप्नवाद आहे.

सारांश, मॉर्गेथों यांच्या सिंध्दातावर अनेक विचारवंतानी टिका केल्या आहेत. परंतु मॉर्गेथों यांच्या सिंध्दातामध्ये काही त्रुटी आहेत ते मान्य करूनही आंतरराष्ट्रीय राजकारणात काही प्रश्न नीतिमुल्यांच्या आधारावर सुटू शकत नाहीत. त्यासाठी सत्तेची आवश्यकता असते. त्यामुळे राष्ट्राने अधिकाधिक सत्ता प्राप्त करावयास हवी हे मॉर्गोथोंचे म्हणणे वास्तववादास अनुसरूनच आहे. त्यामुळेच केनेथ चॅम्पिसन म्हणतात. 'आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विद्वानांत मॉर्गेथोंचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे.'

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाचे विविध कालखंड आहेत. प्रत्येक टप्प्यावर एका विशिष्ट दृष्टीकोनाची निर्मिती झालेली दिसते. या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून आपण वास्तववादी दृष्टीकोणाकडे ही पहावयास हवे. १९४० ते १९६० या कालखंडात आदर्शवादानंतर वास्तववादी सिंध्दाताने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे व्यवस्थापन केले आहे. या दृष्टीकोणाचे प्रवर्तक हेन्स मॉर्गेथों यांनी सैध्दांतिक पद्धतीने त्याचे विश्लेषण केले आहे. सामान्यत: कोणत्याही विचारकाचे मूल्यमापन त्याने कोणती तत्वे मांडली नाहीत याचा विचार करून बसण्याऐवजी त्याचे गुणात्मक मूल्य किती यावरून होत असते. मॉर्गेथों यांचे महत्व याच दृष्टीने मान्य करणे आवश्यक आहे या निष्कर्षप्रत आपण येतो.

## १.५ आंतरराष्ट्रीय संघटना मूल्यमापन –

समकालीन जागतिक राजकारणात आंतरराष्ट्रीय संघटना या घटकास अनन्यसाधारण महत्व आहे. या घटकाचे अवलोकन पुढील मुद्दयायंच्या आधारे करता येईल.

**१) आंतरराष्ट्रीय संघटना अर्थ –**

'भिन्न-भिन्न राष्ट्रातील शासकीय यंत्रणानी वा खाजगी व्यक्तींनी एकत्र येऊन काही विशिष्ट हेतु साध्य करण्याकरिता स्थापन केलेली स्थायी स्वरूपाची व्यवस्था किंवा

यंत्रणा म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय.' अश्या आंतरराष्ट्रीय संघटना या घटकाचा सर्वसाधारण अर्थ सांगितला जातो. साधारणत: परस्परांचे हितसंबंध समान असणाऱ्या राष्ट्रांनी समान स्वरूपाची बंधने स्वत:वर घालून घेणे स्वहिताच्या दृष्टीने आवश्यक असते. या प्रकाराच्या गरजेतूनच प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण होत असतात. अशा आंतरराष्ट्रीय संघटनांपैकि काहींची व्याप्ती जागतिक असते तर काही संघटना या विशिष्ट राष्ट्रांपुरत्याच मर्यादित असतात. संयुक्त राष्ट्रे, जागतिक आरोग्य संघटना या संघटना पहिल्या प्रकारातील संघटनांचे उदाहरण होय तर अरब लिग, सार्क या संघटना दुसऱ्या प्रकारातील आंतरराष्ट्रीय संघटनांचे उदाहरण म्हणून सांगता येईल.

**२) आंतरराष्ट्रीय संघटना प्रकार –**

जागतिक व प्रादेशिक आंतरराष्ट्रीय संघटना या प्रकारांबरोबरच आंतरराष्ट्रीय संघटनांचे आणखी प्रमुख दोन प्रकार मानले जातात. ते म्हणजे शासकीय व अशासकीय संघटना हे होत. ज्या संघटनांमध्ये सभासद राष्ट्रातील शासन यंत्रणेचे प्रतिनिधित्व दिलेले असते त्या शासकीय आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये खाजगी व्यक्ती, संस्था यांना सहभागी होता येत नाही. याउलट वेगवेगळ्या देशांतील व्यक्ती वा खाजगी संस्था ज्यामध्ये सहभागी होऊ शकतात त्या सर्व संघटना अशासकीय मानल्या जातात.

**३) आंतरराष्ट्रीय संघटना इतिहास –**

आंतरराष्ट्रीय संघटना ह्या अगदी अलिकडच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका बजावित असल्या तरी आंतरराष्ट्रीय संघटनांचे मूळ प्राचीन ग्रीक नगरराज्यामध्ये आपणास पहावयास मिळते. ग्रीस मध्ये लहान-लहान नगरराज्यांमध्ये करार करून संघ निर्माण करण्याची प्रवृत्ती दिसून येते. यामागे आत्मसंरक्षण हाच उद्देश असला तरी त्यामाध्यमातून दळणवळण व व्यापार यासबंधीच्या योजनांना ही गती दिली जात असे, या प्रक्रियेमुळे आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांचा उगम ग्रीक मधून होण्यास अनुकूल परिस्थिती होती असे दिसते. मध्ययुगीन कालखंडात युरोपमधील मोठया नगरराज्यांनी व्यापार वृद्धी करीता 'हॅन्सीऑटिक लीग' नावाची संस्था स्थापन केली व पुढे काही राजकीय अधिकार ही या संस्थेस प्राप्त झाले. मात्र स्थायी स्वरूपाची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करावी अशा पद्धतीची दृष्टी यामागे नव्हती हे ही निश्चित. त्यानंतरच्याकाळात पवित्र रोमन साम्राज्य किंवा 'ख्रिश्चन चर्च' या सारख्या संस्थाना राजकीय महत्व प्राप्त झाले असले तरी आधूनिक आंतरराष्ट्रीय संघटनांची तत्वे त्यात अंतर्भूत नव्हती.

आंतरराष्ट्रीय संघटनांचा विकास साधारणत: पुढील तीन टप्प्यात मांडला जातो.

**१) प्रथम कालखंड –**

पौर्वात्य रोमन साम्राज्य नष्ट झाल्यापासून नेपोलियनचे साम्राज्य नष्ट होईपर्यंतचा सुमारे तीन-चार शतकांचा कालखंड या प्रथम कालखंड गृहीत धरला जातो. या प्रथम कालखंडामध्ये जागतिक शांतता प्रस्थापित करण्याकरिता व त्या दृष्टीने

आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करण्याकरिता फारशी प्रगती झालेली दिसत नाही. मात्र या विचारास वैचारिक चालना मात्र या कालखंडात मिळाली असे दिसते. जागतिक शांततेकरिता अनेक योजना विचारवंताकडून प्रस्तुत केल्या गेल्या. त्यावर टॉमस सली, विल्यम पेन, रूसो, बेंथम, कांट इत्यादी विचारवंताचा प्रभाव प्रामुख्याने होता. या प्रथम कालखंडात दोन प्रमुख शांततावादी चळवळी उदयास आल्या. यामध्ये १७ व्या शतकाच्या मध्यावर 'सोसायटी ऑफ फ्रेन्डस' व १८ व्या शतकात ब्रिटन व अमेरिकेत लोकप्रिय झालेली 'केकर' या संघटनांचा अंतर्भाव होतो. पाशवी शक्तीच्या बळावर केलेल्या आक्रमणा विरोधात हिंसक प्रतिकार करावयाचा नाही हे या संघटनांचे ब्रीद होते. या संघटनांचा युद्ध थांबविण्याच्या दृष्टीने फारसा प्रभाव पडला नाही तरी सामान्य जनतेस मात्र या संघटना प्रभावित करून गेल्या. एकंदरीत, जागतिक शांततेकरिता २० व्या शतकामध्ये उदयास आलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांमागील तत्वज्ञानाचे बीज त्या काळी पेरले गेले हे मात्र निश्चित.

## २) द्वितीय कालखंड –

नेपोलियनच्या पराभवानंतर भरविण्यात आलेल्या व्हिएन्ना परिषदेपासून (१८१५) प्रथम महायुद्धापर्यंतचा साधारण शंभर वर्षाचा कालखंड हा आंतरराष्ट्रीय संघटनांच्या विकासातील दुसरा टप्पा मानला जातो. नेपोलियनचा पराभव झाल्यानंतर युरोपीय राजकारणात परत सत्तेच्या समतोलपणाचे राजकारण प्रारंभ झाले. व्हिएन्ना काँग्रेस हे त्याचेच एक उदाहरण होय. या परिषदेतून 'कॉन्सर्ट ऑफ युरोप' ही आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झाली. या संघटनेने युरोपची राजकीय घडी परत नीट बसवली. याबरोबरच या संघटनेने सामाजिक व आर्थिक सहकाराची प्रवृत्ती वाढीस लावली, गुलामगिरीची प्रथा नष्ट करण्याचा संकल्प या संघटनेने प्रस्तुत केला, ऱ्हाईन व इतर महत्वाच्या नद्यांवरील वाहतुकीचे नियंत्रण करण्याकरिता लेखी करार करून त्याच्या अंमलबजावणी करीता यंत्रणाही निर्माण करण्यात आली. आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्याकरिता निर्माण झालेला तो पहिला आंतरराष्ट्रीय कायदा मानला जातो. कॉन्सर्ट ऑफ युरोप या संघटनेचा प्रभाव युरोपच्या राजकारणावर शतकभर होता. या कालखंडात या संघटनेने युरोपला अनेक युद्धाच्या प्रसंगातून बाहेर काढण्याचे महत्वाचे कार्य पार पाडले हे जरी खरे असले तरी अनेक आणीबाणीच्या प्रसंगात या संघटनेच्या सभा होऊ शकल्या नाहीत हे ही तेवढेच खरे आहे.

या कालखंडामध्ये आर्थिक व वैज्ञानिक क्षेत्रातील विकासाने प्रत्यक्ष व्यवहारात आंतरराष्ट्रीय भावना जाणवू लागली होती. त्यातूनच १९ व्या शतकात अनेक आंतरराष्ट्रीय संस्था उदयास आल्या. १८५६ साली स्थापन झालेला डॅन्यूब आयोग, १८६५ मध्ये निर्माण झालेली तारसंस्था, १८७४ साली स्थापन झालेली टपाल संस्था ही त्याची काही महत्वाची उदाहरणे होत. या संस्थांना राजकीय महत्व नव्हते. आंतरराष्ट्रीय ऐक्य व शांतता ह्या दृष्टीने या संस्थांना महत्व नसले तरी भविष्यकाळात कशा संस्था निर्माण होणे आवश्यक आहे याचे प्रतिक म्हणून त्यांना नि:संशय महत्व आहे.

### ३) तृत्तीय कालखंड –

प्रत्यक्ष पहिले महायुद्ध व नंतरचा काळ हा तिसरा टप्पा मानला जातो. पहिले महायुद्ध संपल्यानंतर व्हर्सायच्या तहातून राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली. स्वसंरक्षणासाठी कोणत्याही राष्ट्रास केवळ स्वत:च्या बळावर अवलंबून राहण्याचा प्रसंग येऊ नये याकरिता सामूहिक सुरक्षिततेची योजना प्रस्तुत करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या स्थापनेतून भविष्यकाळात युद्ध करण्याची प्रवृत्ती नष्ट होईल अशी आशा जागतिक जनसमूदायामध्ये प्रथमच निर्माण झाली. राष्ट्रसंघाबरोबर या कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणास प्रभावित करणाऱ्या आणखी दोन महत्वाच्या संघटना निर्माण झाल्या. त्यापैकी एक म्हणजे हेग येथे स्थापन झालेले आंतरराष्ट्रीय न्यायालय व दूसरे म्हणजे जिनेव्हा येथे स्थापन झालेली जागतिक कामगार संघटना. दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या लाटे मध्ये राष्ट्रसंघ जरी नष्ट झाला तरी ह्या दोन्ही संस्था अद्याप ही कार्यरत आहेत. यावरून या संघटनांच्या उपयुक्ततेची प्रचिती आपणास होते. राष्ट्रसंघ अपयशी ठरून दुसऱ्या महायुद्धाचा सामना जागतिक जनसमुदायास करावा लागला तरी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात परत एक नव्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचा प्रस्ताव जागतिक धुरीणत्व करणाऱ्या राजकीय नेत्यांनी पुढे केला व त्यातून संयुक्त राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाली. १९४५ नंतर युद्ध व संघर्ष टाळून शांतता व सहकार्याची भावना वाढीस लावण्याकरिता अनेक जागतिक व क्षेत्रिय संघटना निर्माण झाल्या. या आंतरराष्ट्रीय संघटनांनी आंतरराष्ट्रीय संबंध या विद्याशाखेवर आपला स्वतंत्र प्रभाव पाडलेला दिसतो.

### आंतरराष्ट्रीय संघटनांचे परीक्षण –

संयुक्त राष्ट्रे व तत्सम आंतरराष्ट्रीय संघटनांच्या उपयुक्ततेचे प्रामुख्याने एक बाब लक्षात घेणे गरजेचे आहे की, राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रे या दोन्ही संघटनांची निर्मिती अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर झालेली आहे. त्यामुळे या संघटनांच्या घटनेमध्ये युद्ध व संघर्ष यापासून जागतिक समुदायास कसे दूर ठेवता येईल यास प्रथम स्थान आहे. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये संघर्षाचे निवारण करणे यास प्रथम स्थान तर सहकार्याची उपयुक्तता ह्यास दुय्यम स्थान आहे.

जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने होत असलेला विलंब बघून अनेकांना आंतरराष्ट्रीय संघटनांचे औचित्य अप्रस्तुत वाटते. त्यांच्या मते, सर्व स्वतंत्र राष्ट्रांचे एकच जागतिक संघराज्य झाल्याशिवाय हा प्रश्न सुटणे शक्य नाही. सध्या कार्यरत असणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनांमधून घटक राष्ट्रांना बाहेर पडण्याचा अधिकार आहे. जागतिक राज्य निर्माण झाल्यानंतर त्यातून बाहेर पडण्याचा संविधानात्मक मार्ग उपलब्ध असणार नाही. वास्तविक जागतिक राज्य निर्माण होण्याची शक्यता आज तरी जवळपास दिसत नाही. परंतु अस्तितवात असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा पूर्ण लाभ घेण्याचा निश्चय जगातील राष्ट्रांनी केला व त्याकरिता आवश्यक तेथे आपल्या सार्वभौम सभेस मुरड घालण्याची तयारी दर्शविली तर आजच्या आंतरराष्ट्रीय संघटनादेखील जगात शांततेचे व समृध्दीचे राज्य निर्माण करू शकतील हे निश्चित!

## १.६ राष्ट्रसंघ

राष्ट्रसंघ म्हणजे पॅरीस शांतता परिषदेची महत्वपूर्ण देणगी होय. तर अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन हे राष्ट्रसंघाचे प्रमुख शिल्पकार मानले जातात. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर वुड्रो विल्सन यांनी असे विधान केले होते की, America will be Neutral thought as well as in action मात्र नंतर लोकशाहीच्या संरक्षणासाठी त्यांनी महायुद्धात सहभाग घेऊन १४ कलमी कार्यक्रम १८ जानेवारी १९१८ रोजी जाहिर केला. त्यातील शेवटचे १४ वे कलम हे राष्ट्रसंघाच्या स्थापने संबंधीचे होते. एक प्रभावी आंतरराष्ट्रीय स्वरूपाची संघटना असावी या आदर्शवादी विचारांमधून राष्ट्रसंघाच्या स्थापनेची मुहर्तमेढ रोवली गेली. त्याकरिता अनेक बैठकांचे आयोजन करण्यात आले. पॅरीस येथील शांतता परिषदेमध्ये राष्ट्रसंघाची सनद चर्चेस ठेवण्यात आली. त्यात काही किरकोळ दुरूस्त्या करून त्यास मान्यता देण्यात आली. त्यामुळेच व्हर्साय व पॅरीस परिषदांचा उल्लेख राष्ट्रसंघाच्या अभ्यासात अनिवार्यपणे येतो. राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० रोजी झाली. या संघटनेचे मुख्यालय जिनेव्हा येथे स्थापन करण्यात आले होते.

**राष्ट्रसंघाचा उद्देश –**

राष्ट्रसंघाचा प्रधान उद्देश पॅरीस शांतता परिषदेत स्थापन करण्यात आलेली व्यवस्था कायम ठेवणे व शांतता संधीचे पालन करणे हा होता. याबरोबरच डॅन्झिंग शहराची व्यवस्था व सार प्रदेशाचे शासन चालविणे, अल्पसंख्यांकांकडे लक्ष पुरविणे, संरक्षण पद्धतीकडे लक्ष देणे यासारखी प्रशासकीय उद्दिष्ट ही राष्ट्रसंघास देण्यात आली होती.

मानव कल्याण साधने हा ही राष्ट्रसंघाचा एक महत्वाचा उद्देश ठेवण्यात आला होता. या अनुषंगाने रोगराई निर्मूलन, गुलामगिरी प्रथेचे उच्चाटन, देह व्यापार थांबविणे यासारखी कार्य राष्ट्रसंघाकडून अपेक्षित होती.

राष्ट्रसंघाने आपल्या उद्दिष्टांना अनुसरून युद्ध रोखणे व शांततेची स्थापना करणे, आंतरराष्ट्रीय सहकार्य स्थापित करणे, सभासद राज्यांची प्रादेशिक प्रभुसत्ता कायम राखणे व शस्त्रस्पर्धा बंद करून शांततेच्या मार्गाने वाद सोडविणे या बाबींना प्राधान्य दिले.

**राष्ट्रसंघाची रचना –**

राष्ट्रसंघाची रचना पुढील मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

१. **राष्ट्रसंघाची सनद –**

राष्ट्रसंघाची सनद ही राष्ट्रसंघाची रचना ठरवण्यातील सर्वाधिक महत्वाचा घटक आहे. राष्ट्रसंघाचे सनदेचे वर्गीकरण पुढील दहा भागात केले जाते.

१) **कलम १ ते कलम ७ –** कलम १ ते ७ दरम्यान राष्ट्रसंघाची रचना व सदस्यत्व याबाबतीतील तरतुदी आहेत.

२) **कलम ८ ते कलम ९ –** राष्ट्रसंघाच्या सनदेतील कलम ८ व ९ मध्ये जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी आवश्यक नि:शस्त्रीकरणा संदर्भातील तरतुदी आहेत.

३) **कलम १० ते कलम १७ –** या कलमांमध्ये जागतिक स्तरावरील वादग्रस्त प्रश्नांची सोडवणूक करण्यासंदर्भातील तरतुदी आहेत.

४) **कलम १८ ते कलम २० –** या कलमान्वये जागतिक स्तरावर अनेक राज्यांमध्ये होणारे तह, संधी, करार इत्यादी बाबतीतील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

५) **कलम २१ –** कलम २१ अन्वये मन्रो सिंध्दातास जागतिक मान्यता मिळवून देण्यासाठी राष्ट्रसंघ प्रयत्नशील राहिल अशी तरतूद करण्यात आली.

६) **कलम २२ –** कलम २२ नुसार विश्वस्त विवाह पद्धती संबंधीची तरतुद करण्यात आली.

७) **कलम २३ –** कमल २३ अन्वये सामाजिक सुधारणेबाबतीतील तरतुद करण्यात आली.

८) **कलम २४ –** कलम २४ मध्ये राष्ट्रसंघा समवेत इतर आंतरराष्ट्रीय संघटनांचे जे संबंध आहेत त्यासंदर्भातील बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

९) **कलम २५ -** कलम २५ अन्वये ८ मे रोजी होणाऱ्या रेड क्रॉस संघटनेच्या कार्यासंबंधीचे विवेचन करण्यात आले.

१०) **कलम २६ –** कलम २६ अन्वये राष्ट्रसंघाची निर्मिती व राष्ट्रसंघाच्या सनदेतील दुरुस्ती बाबतची प्रक्रिया नमूद करण्यात आली.

## २) सभासद संख्या –

राष्ट्रसंघाच्या संस्थापक राष्ट्रांची सदस्य संख्या ४३ होती. त्यामध्ये पहिल्या महायुद्धात सहभागी असणारी ३० राष्ट्रे व १३ तटस्थ राष्ट्रे यांचा सहभाग होता. ही संख्या पुढील काळात कमी अधिक होत गेली. राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांना पुढील अटींचे पालन करणे बंधनकारक होते.

१. परस्परांच्या सार्वभौमत्वाचा आदर करणे

२. इतर देशांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे

३. राष्ट्रसंघाच्या प्रत्येक कारवाईत सहभागी होणे किंवा त्यास पाठींबा देणे.

४. राष्ट्रसंघाच्या ध्येय धोरणांविरोधात जाणारे तह, करार न करणे.

५. सदस्य राष्ट्रावरील परकीय आक्रमणाचा एकजुटीने प्रतिकार करणे.

६. सदस्य राष्ट्रांमध्ये काही संघर्षाचे प्रसंग, मुद्दे निर्माण झाले तर राष्ट्रसंघामार्फत ते संवादाच्या माध्यमातून सोडवणे.

### ३) राष्ट्रसंघाच्या प्रमुख संस्था –

राष्ट्रसंघाने आपल्या ध्येय धोरणांना प्रत्यक्षात कार्यन्वीत करण्याकरिता काही संस्थाची निर्मिती केली होती. त्याचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

#### १) सभा (Assembly) –

सभा ही राष्ट्रसंघाची प्रमुख संस्था होती. राष्ट्रसंघाचे बहुतांशी कार्य सभा या संस्थेमार्फतच चालवले जात असे. या सभेत प्रत्येक सभासद राष्ट्रास आपले तीन प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार होता. मात्र प्रत्येक सभासद राष्ट्रास एकच मत देण्याचा अधिकार बहाल करण्यात आला होता. सदस्य राष्ट्रे आपल्यामधूनच अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून निवड करीत असत. सभेची सप्टेंबर महिन्यात वार्षिक बैठक जिनेव्हा शहरात आयोजित केली जात असे. या वार्षिक बैठकीचा कालावधी साधारणत: तीन आठवडे असे. सभेचा अध्यक्ष निवडताना तो छोटा राष्ट्रांमधील असावा असा संकेत पाळला जात असे. सदस्य राष्ट्रे सहा उपाध्यक्षांची ही निवड करीत असत. याशिवाय सभेचे कामकाज चालविण्याकरिता सहा समित्या स्थापन केल्या जात. त्यातील १) घटनात्मक व तांत्रिक समिती २) नि:शस्त्रीकरण समिती व ३) अर्थ समिती यांना महत्वाचे स्थान होते.

#### २) समिती (The Council)

राष्ट्रसंघाचे कार्यकारी मंडळ म्हणून समितीचा दर्जा होता. समितीमध्ये प्रारंभी पाच कायम व चार अस्थायी सदस्य अशी रचना होती. १९३४ मध्ये यात बदल करून ही सदस्य संख्या सहा स्थायी व अकरा अस्थायी सदस्य अशी करण्यात आली. राष्ट्रसंघ ज्यावेळी विसर्जित झाले त्यावेळी मात्र दोन स्थायी व अकरा अस्थायी सदस्य संख्या होती. समितीची बैठक वर्षातून चार वेळा होत असे. प्रसंगी विशेष अधिवेशन ही बोलावले जात असे.

#### ३) सचिवालय (Secretariat) –

राष्ट्रसंघाचे दैनंदिन कामकाज चालविणे करिता एका सचिवालयाची स्थापना करण्यात आली होती. या सचिवालयाचे मुख्यालय जिनेव्हा येथे स्थापन करण्यात आले होते ज्यामध्ये सातशेहून अधिक कर्मचारी कार्यरत असत. या सचिवालयाचे प्रशासकिय प्रमुख म्हणून एक सरचिटणीस, दोन सहचिटणीस व दोन उपचिटणीस नियुक्त करण्यात आले होते. सचिवालयाचे कामकाज इंग्रजी व फ्रेंच भाषेत चालत असे.

#### ४) आंतरराष्ट्रीय न्यायालय –

राष्ट्रसंघाच्या स्थापनेमागे जागतिक शांतता व सुव्यवस्था राखणे हा मूळ हेतु होता. या हेतू पूर्ती करिता आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात

आली. राष्ट्रसंघाच्या सनदेतील कलम १४ अन्वये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना झाली. न्यायालया मार्फत जे कायदे, करार राष्ट्र संघाने केले असतील त्यांचे पालन सदस्य राष्ट्रांकडून होते की नाही हे पाहणे व शांतता टिकविण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालयावर सोपविण्यात आलो होते. १९२१ मध्ये स्थायी आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना हेग येथे करण्यात आली. राष्ट्रसंघ विसर्जित झाले तरी आजही आंतरराष्ट्रीय न्यायालय मात्र कार्यरत आहे.

**राष्ट्रसंघाचे कार्य –**

राष्ट्रसंघाने आपल्या स्थापनेपासून विसर्जित होईपर्यंत अनेक महत्वाची कार्य पार पाडली. त्याची विभागणी साधारणत: राजकीय व अराजकिय अशा दोन भागात केली जाते.

**अ) राजकीय स्वरूपाची कार्य –**

राष्ट्रसंघाने पार पाडलेल्या राजकीय स्वरूपाच्या कार्याचा संक्षिप्त आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१) युपेन व मामलंडचे प्रश्न –**

व्हर्सायच्या तहाने असे निश्चित करण्यात आले होते की हे जर्मनीचे दोन्ही प्रदेश बेल्जियमला देण्यात यावेत. याची अमंलबजावणी २० सप्टेंबर १९२० रोजी राष्ट्रसंघाने केली.

**२) हॉलंड बेटाचा प्रश्न –**

हॉलंड बेटा संदर्भात व्हर्सायच्या तहाने फिनलँडला अधिकार देण्यात आला होता. या बेटावर वास्तव्यास असणारी जनता ही स्विडीश होती. त्यामुळे फिनलँड व स्विडन यांच्यात वाद निर्माण झाला. राष्ट्रसंघाने फिनलँडच्या बाजूने निर्णय देतांना स्वीडीश जनतेचे वेगळेपण जपले जावे अशी ही तरतुद केली.

**३) मोसूल सीमारेषा वाद –**

मोसूल या खनिज संपत्तीने संपन्न शहराच्या ताब्यावरून ब्रिटन व तुर्कस्थान मध्ये संघर्ष होता. १९२४ मध्ये ब्रिटनने हा प्रश्न राष्ट्रसंघा समोर मांडला. त्यावर तुर्कस्थान ने हरकत घेतली. राष्ट्रसंघाच्या समितीने याबाबत निर्णय घेण्याकरिता एका मंडळाची स्थापना केली. या मंडळाने वादग्रस्त भागास भेट देवून आपला निर्णय ही दिला मात्र तुर्कस्थानला हा निर्णय मान्य झाला नाही.

**४) ब्रिटन व फ्रान्स संघर्ष –**

१९२१ मध्ये फ्रान्सने नागरिकत्वा संदर्भातील एक कायदा संमत केला होता ज्यावर ब्रिटनने आरोप नोंदवला. नागरिकत्वा संबंधीचा वाद ही फ्रान्सचा

अंतर्गत विषय आहे अशी भूमिका फ्रान्सने घेतली. त्यावर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने फ्रान्सचे म्हणणे फेटाळून लावले. पुढे दोन्हीं देशांनी हा प्रश्न द्विपक्षीय वाटाघाटीतून सोडवला.

**५) व्हिएन्ना समस्या –**

पॅरीसच्या शांतता परिषदेतून नव्याने अस्तित्वात आलेल्या लिओनिया या राज्याची राजधानी व्हिएन्ना होती. परंतु पोलंडने व्हिएन्ना या शहरावर आपला हक्क सांगितला. या वादावर तोडगा काढण्याकरिता राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने एका लवादाची स्थापना करण्यात आली. या लवादाने व्हिएन्ना शहर लिओनियास देण्याचा निर्णय जाहिर केला मात्र पोलंडचे लष्कर प्रमुख जनरल झिलोमो व्हस्की यांनी हा निवाडा नाकारून व्हिएन्ना शहराचा ताबा घेतला. यानंतर सार्वमताचा प्रस्ताव राष्ट्रसंघाकडून देण्यात आला. मात्र पुढे त्यावर कोणताही निर्णय होवू शकला नाही. राष्ट्रसंघाच्या दृष्टीने व्हिएन्ना प्रश्न अर्धवटच राहिला.

**६) ग्रीस – इटली वाद –**

इटली व ग्रीस मध्ये अनेक वर्षापासून सीमावादाचा प्रश्न संघर्षाचे एक प्रमुख कारण होता. यावर तोडगा काढण्याकरिता एका लवादाची निर्मिती करण्यात आली. या लवादातील इटालियन प्रतिनिधीची १९२३ मध्ये ग्रीस येथे हत्या झाली. इटलीचे प्रमुख मुसोलिनीने याबाबत ग्रीसने माफी मागून नुकसान भरपाई द्यावी असा आग्रह धरला. ग्रीसने मुसोलिनीच्या सर्व मागण्या मान्य करावयास नकार दिला. त्यामुळे मुसालिनीने ग्रीसवरह हल्ला करून कोफर्च्यु बेट ताब्यात घेतले. त्यावेळी ग्रीसने राष्ट्रसंघाकडे दाद मागितली. तेव्हा यामध्ये मध्यममार्ग म्हणून राष्ट्रसंघाने ग्रीसकडून इटलीत नुकसान भरपाई पोटी ५ कोटी लिरा इतकी रक्कम द्यावी असा निर्णय दिला व हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला.

**७) ग्रीस – बल्गेरिया वाद –**

ग्रीस – बल्गेरिया वाद ऑक्टोबर १९२५ मध्ये उफाळून आला. ऑक्टोबर १९२५ मध्ये ग्रीसच्या लष्करी तळावरील प्रमुखाचा बल्गेरियाच्या सैनिकाने खून केला. बल्गेरियाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी ग्रीसने केली. मात्र बल्गेरियाने त्यास प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे ग्रीसने बल्गेरियाच्या सरहद्दीत प्रवेश केला. बल्गेरियाने हा प्रश्न राष्ट्रसंघाकडे उपस्थित केला. त्यावेळी राष्ट्रसंघाने युद्धबंदीचा आदेश देऊन ग्रीसला ४२ हजार पौंड दंड सुनावला मात्र ग्रीसने हा निर्णय पक्षपाती असल्याचे जाहीर करत दंड भरण्यास नकार दिला.

### ८) राष्ट्रसंघाकडून नि:शस्त्रीकरणा बाबत झालेले प्रयत्न –

राष्ट्रसंघाच्या स्थापनेमागे व्यापक नि:शस्त्रीकरण प्रक्रिया राबवणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट होते. राष्ट्रसंघाच्या ८ व्या कलमा मध्ये याबाबत व्यापक तरतुदी होत्या. त्या संक्षिप्त स्वरूपात पुढील प्रमाणे मांडता येतील.

१. प्रत्येक राष्ट्राने आपल्या स्वसंरक्षणासाठी आवश्यक तेवढाच शस्त्रसाठा बाळगावा.

२. प्रत्येक देशाच्या भौगोलिक स्थितीचे अध्ययन करून राष्ट्रसंघ त्या राष्ट्रासाठी आवश्यक शस्त्रसाठ्याचा कोटा निश्चित करेल.

३. राष्ट्रसंघाच्या पूर्वसंमती शिवाय कोणत्याही राष्ट्रास शस्त्रसाठा वाढविता येणार नाही.

४. प्रत्येक राष्ट्राने युद्ध पुरक उद्योग व लष्करी सामर्थ्य याबाबतची अद्ययावत माहिती राष्ट्रसघास देणे बंधनकारक असेल.

५. राष्ट्रसंघाने प्रस्तुत केलेल्या शस्त्रकपातीच्या धोरणास पूर्वसंमती घेतल्याशिवाय कोणत्याही नवीन राज्यास राष्ट्रसंघाचे सभासदत्व दिले जावू नये.

६. जर्मनीच्या शस्त्रकपातीनंतर राष्ट्रसंघाची सर्व सभासद राष्ट्रे शस्त्रकपातीच्या धोरणाची अंमलबजावणी करतील.

याप्रमाणे प्रयत्नांचा भाग म्हणून राष्ट्रसंघाने १९२० कायमस्वरूपाचे शस्त्रकपात मंडळ स्थापन केले. पुढे २५ फेब्रुवारी १९२१ रोजी एक अस्थायी संमिश्र मंडळ नेमण्यात आले. १९२५ मध्ये राष्ट्रसंघाने शस्त्रकपातीच्या प्रश्नावर व्यापक चर्चा घडवून आणण्याकरिता एका परिषदेचे आयोजन केले. त्याप्रमाणे १९३२ साली जिनेव्हा येथे ही परिषद संपन्न झाली. त्यात ६० पेक्षा अधिक देशांचे २३० प्रतिनिधी सहभागी झाले होते. राष्ट्रसंघाचे सभासद राष्ट्र नसणाऱ्या अमेरिकेने ही या परिषदेत सहभाग नोंदवला. मात्र युरोपियन राष्ट्रातील परस्पर वाद व संशय यामुळे ही परिषद अपेक्षित निर्णयाप्रत पोहचण्यात अपयशी ठरली.

## ब) अराजकीय स्वरूपाची कार्य –

राष्ट्रसंघाच्या माध्यमातून जी अराजकीय स्वरूपाची कार्य पार पाडली त्याची संक्षिप्त मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.

### १) आर्थिक कार्य –

पहिल्या महायुद्धाने सर्वाधिक आर्थिक क्षेत्रास बाधित केले होते. या महायुद्धाने अनेक राष्ट्रे उध्वस्त झालेली होती. अशा वेळी या राष्ट्रांची परत उभारणी करणे सर्वाधिक गरजेचे होते. युद्धपिडित जनते करीता राष्ट्रसंघाने पुढाकारा घेवून आर्थिक मदत संकलित करण्याकरिता एक समिती गठित केली. या समितीने कर्ज उभारणी केली ज्याचा फायदा ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, ग्रीस इत्यादी देशांना झाला. पुढील काळात ही राष्ट्रसंघाने

वेळोवेळी आर्थिक परिषदा घेवून सदस्य राष्ट्रांना, गरीब राष्ट्रांना आर्थिक मदत मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. १९२७, १९३०, १९३१, १९३९ च्या आर्थिक परिषदांमधून याबाबतीत राष्ट्रसंघाने भरीव योगदान दिलेले दिसते.

**२) सामाजिक व मानवतावादी कार्य –**

पहिल्या महायुद्धानंतर सामाजिक प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झाले ज्यामधून एकूण मानवी मूलभूत हक्क बाधित होत होते. यावर मात करण्यासाठी राष्ट्रसंघाने अनेक योजना कार्यान्वीत करण्यात महत्वाची भूमिका बजावली. निर्वासितांचा प्रश्न सोडविण्याकरिता राष्ट्रसंघाकडून एकत्र हायकमिशनची स्थापना करण्यात आली. १९२१ मध्ये या कमिशनचे प्रमुख म्हणून डॉ. नान्सें यांची नियुक्ती करण्यात आली. या समितीने निर्वासितांचे पुनर्वसन करण्यात महत्वाचे योगदान दिले. या दरम्यानच्या काळात क्षय, मलेरिया, कॉलरा, देवी अशा संसर्गजन्य रोगांची मोठी साथ आलेली होती. या साथींना रोखण्यासाठी ही राष्ट्रसंघाने अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांची मदत घेवून भरीव योगदान दिले.

राष्ट्रसंघाने गुलामगिरी, स्त्रिया - मुले यांचा व्यापार, भेसळयुक्त औषधे, मादक पदार्थांची तस्करी यांचे निर्मूलन करण्याकरिता ही मानवतावादी दृष्टीकोणातून महत्वाचे कार्य पार पाडलेले दिसते.

**३) अल्पसंख्यांक विषयीचे धोरण –**

राष्ट्रसंघाच्या सनदेतील कलमांमध्ये स्वंयनिर्णयाच्या तत्वास ही महत्वाचे स्थान प्रदान करण्यात आले होते. या तत्वास अनुसरूनच पहिल्या महायुद्धानंतर अनेक नवी राष्ट्रे अस्तित्वात आली. मात्र या नव्याने निर्माण झालेल्या राष्ट्रांमध्ये अल्पसंख्यांकाच्या हक्कांचा प्रश्न गंभीर बनला होता. अल्पसंख्यांकाच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्या-त्या देशांवर सोपवण्यात आली होती. मात्र अल्पसंख्यांक समूहांच्या हक्कांना संबंधित राष्ट्रे सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत हे जाणवल्यानंतर विविध देशातील अल्पसंख्याक समूहांनी राष्ट्रसंघाकडे थेट तक्रारी नोंदवण्यास सुरूवात केली. राष्ट्रसंघाने अशा १९२ तक्रारीचे निवारण केल्याची नोंद आहे. जर्मनी मध्ये हिटलरने ज्यू ची ज्या पद्धतीने हत्या करण्यास सुरूवात केली त्यावेळी राष्ट्रसंघाने ज्यू च्या पुर्नवसनासाठी एका कमिशनची स्थापना केली. मात्र याबाबत राष्ट्रसंघास आर्थिक निधी अभावी फारसे योगदान देता आले नाही.

**४) प्रशासकीय कार्य –**

राष्ट्रसंघाने व्हर्सायच्या तहाचे पालन करवून घेण्यासाठी स्वत:कडे काही प्रशासकीय कार्य ही घेतलेली दिसतात. सार प्रातांचा प्रश्न व मुक्त शहर डॅझिंगचा प्रश्न हि त्याची काही महत्वाची उदाहरणे होत.

एकंदरीत राष्ट्रसंघाने राजकीय व अराजकीय अशा दोन्हीं क्षेत्रात भरीव स्वरूपाचे कार्य पार पाडलेले दिसते.

**राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे –**

जागतिक शांतता व सुव्यवस्था राखणे व मानवी समुदायास महायुध्दाच्या संकटापासून मुक्त ठेवणे या उद्दिष्टांसाठी स्थापन झालेले राष्ट्रसंघ अवघ्या २० वर्षाच्या कालावधीत कोलमडून पडले व जगास दुसऱ्या महायुद्धाचा सामना करावा लागला. राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणमिमांसा आपणास पुढील मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

**१) व्हर्सायच्या तहातून निर्मिती –**

राष्ट्रसंघाची सनद ही व्हर्सायच्या तहाशी जोडण्यात आली होती. व्हर्सायच्या तहाने पराभूत राष्ट्रांवर विशेषत: जर्मनीवर अतिशय अपमानास्पद अटी लादण्यात आल्या होत्या. त्यामुळे राष्ट्रसंघा विषयी एक प्रकारची घृणा, द्वेष जर्मन लोकांच्या मनात निर्माण झाला होता. त्यामुळेच जर्मनीने राष्ट्रसंघास 'चोरसंघ', 'मुर्खांची संघटना' या शब्दात हिणवले. जर्मनीच्या प्रचारतंत्रापुढे राष्ट्रसंघास आपली प्रतिमा उंचावणे शक्य झाले नाही. हे एक राष्ट्रसंघाच्या अपयशाचे महत्वाचे कारण ठरले.

**२) अमेरिकेची तटस्थता –**

वास्तविक अमेरिकन राष्ट्रध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या कल्पनेतूनच राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. मात्र अमेरिकन सिनेटने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्वीकारण्यास नकार दिला. राष्ट्रसंघास जन्म देणारी अमेरिका राष्ट्रसंघाच्या पालन पोषणाची जबाबदारी इग्लंड व फ्रान्स वर देवून मोकळी झाली. ही जबाबदारी इग्लंड व फ्रांन्सने ही प्रामाणिकपणे पार पाडली नाही. अमेरिकेसारख्या बडया राष्ट्राची तटस्थता राष्ट्रसंघाच्या अपयशाचे एक कारण ठरले.

**३) जागतिक स्वरूप प्राप्त करण्यात अपयश –**

राष्ट्रसंघाच्या स्थापने पासूनच याबाबतच्या मर्यादा स्पष्टपणे पुढे आलेल्या दिसतात. राष्ट्रसंघाच्या स्थापना प्रक्रियेत पराभूत राष्ट्रे, साम्यवादी रशिया यांना कोणतेही स्थान देण्यात आले नाही. सभासदत्व ही नाकारण्यात आले. त्याचबरोबर सभासद राष्ट्रांचे सभासदत्व ही स्थिर राहिलेले नाही. काही राष्ट्रे आपल्या सोयीप्रमाणे राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्वीकारत होते व गैर सोयीचे झाल्यानंतर बाहेर पडत होते. त्यामुळे राष्ट्रसंघास स्थापने पासूनच जागतिक स्वरूप सिद्ध करता आले नाही व ते टिकवता ही आले नाही.

**४) शांती सैन्याचा अभाव –**

राष्ट्रसंघाकडे स्वत:च्या शांति सैन्याचा अभाव होता. राष्ट्रसंघाच्या सनदेत असे नमूद करण्यात आले होते की, 'राष्ट्रसंघाने विनंती केल्यास सदस्य राष्ट्रांनी शांतिसैन्य जमा करावे. या प्रक्रियेत इंग्लंड व फ्रान्स या प्रमुख राष्ट्रांनीच चालढकल केल्यामुळे इतर सभासद राष्ट्रांनीही त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे राष्ट्रसंघ आक्रमक राष्ट्रांविरोधात कोणतीही लष्करी कारवाई करू शकले नाही. परिणामी राष्ट्रसंघ कोलमडून पडले.

### ५) सभासद राष्ट्रांमधील विरोधी प्रवृत्ती –

सभासद राष्ट्रांमध्ये अनेक बाबतीत परस्परविरोधी प्रवृत्ती सातत्याने प्रत्ययास येत होती. विचारधारा, हितसंबंध, धोरण याबबतीत परस्परविरोध, परस्पर संशय राष्ट्रसंघाच्या अपयशाचे महत्वाचे कारण ठरले. उदा. फ्रान्सला जर्मनी विरुद्ध सुरक्षितता महत्वाची वाटत होती. तर ब्रिटनला मात्र सत्ता समतोल साधणे आवश्यक वाटत होते. साम्यवादी रशिया व अमेरिका यातील वैचारिक विरोध, जर्मनी व पराभूत राष्ट्रांचा राष्ट्रसंघाविरोधी असलेला असंतोष ही सभासद राष्ट्रांची एकूण प्रवृत्ती त्याच्या अपयशाचे कारण ठरली.

### ६) छोटया राष्ट्रांचा अपेक्षाभंग –

राष्ट्रसंघाकडून सर्वाधिक अपेक्षा छोटया राष्ट्रांच्या होत्या. परकिय आक्रमण पासून आपले संरक्षण करण्यात राष्ट्रसंघ आपणास मदत करेल ही छोटया राष्ट्रांची प्रमुख अपेक्षा पूर्ण करण्यात ही राष्ट्रसंघ अपयशी ठरले. छोटया राष्ट्रांनी अनेक तक्रारी राष्ट्रसंघामध्ये मांडल्या मात्र यातील बहुतांश तक्रारीचे निवारण करण्यात राष्ट्रसंघाला अपयश आले. त्यामुळे राष्ट्रसंघाकडून अपेक्षा भंग झालेल्या छोटया राष्ट्रांचा समूह राष्ट्रसंघाप्रती उदासिन झाला हे ही राष्ट्रसंघाच्या अपयशाचे एक कारण ठरले.

### ७) शस्त्रास्त्र स्पर्धा –

जागतिक शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी राष्ट्रसंघाच्या समवेत नि:शस्त्रीकरणा संदर्भात व्यापक तरतुदी होत्या. मात्र प्रत्यक्षात सभासद राष्ट्रांकडून ही त्याची अंमलबजावणी करवून घेण्यात राष्ट्रसंघाला अपयश आले. हिटलरने राष्ट्रसंघाचे आदेश धुडकावून लष्करी सामर्थ्य वाढवावयास सुरवात केली व त्याच्याभीतीपोटी सर्वच राष्ट्रांनी लष्करी सामर्थ्य वाढविण्यास प्राधान्य दिले. परिणामी जगात प्रचंड शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण झाली. ही शस्त्रास्त्र स्पर्धा राष्ट्रसंघाच्या अपयशाचे कारण ठरली.

### ८) आर्थिक मंदी –

१९३० साली जगात आर्थिक मंदीची मोठी लाट आली. या आर्थिक मंदीचा सामना करण्यासाठी सर्वच राष्ट्रे संकूचित स्वरूपाची आर्थिक धोरणे अवलंबू लागली. त्यामुळे परस्पर सहकार्याची भावना सदस्य राष्ट्रांमध्ये लोप पावली. राष्ट्रसंघास आर्थिक मदत करावयास ही कोणतीही राष्ट्रे पुढे आली नाहीत. त्यामुळे राष्ट्रसंघाचा विलय अधिक जवळ आला.

एकंदरीत राष्ट्रसंघ वरील विविध घटकांमुळे अपयशी ठरले. असे असले तरी जागतिक शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी एका प्रभावी जागतिक संघटनेची आवश्यकता आहे हे राष्ट्रसंघाने अधोरेखित केले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाचा उदात्त हेतु संयुक्त राष्ट्रांच्या स्वरूपात परत स्वीकारण्यात आला. संयुक्त राष्ट्रांची उद्दिष्टये, घटक, संख्या, कार्यपद्धती यावर राष्ट्रसंघाच्या तत्वांची व अनुभवाची स्पष्ट छाप पडली आहे. यावरून राष्ट्रसंघाची उपयुक्तता स्पष्ट होते.

## १.७ सारांश

एकंदरीत आंतरराष्ट्रीय संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारण हा एक महत्वाचा अभ्यास विषय आहे. समकालिन संदर्भात तर या विषयाच्या अभ्यासास अधिकच महत्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास म्हणजे सत्तेच्या राजकारणाचे विश्लेषण होय ही धारणा वास्तववादी दृष्टीकोनाच्या अध्ययनापासून निर्माण होते त्याप्रमाणेच उदारमतवादी दृष्टीकोणातून जागतिक शांतता व राष्ट्र राज्याची कल्पना ही प्रत्यक्षात येईल असा आशावाद निर्माण होतो. राष्ट्रसंघाच्या अपयशाने संयुक्त राष्ट्राचे महत्व अधिकच अधोरेखित होते व जगाला तिसऱ्या महायुद्धापासून वाचविण्याकरिता व्यक्ती व राष्ट्रांच्या व्यवहारांचा परिपूर्ण अभ्यास करणे अधिक निकडीचे आहे हे या अभ्यासातून स्पष्टपणे जाणवते.

## १.८ आपण काय शिकलो?

प्र. १ ला. आंतरराष्ट्रीय संबंधाचा उदारमतवादी दृष्टीकोन स्पष्ट करा.

प्र. २ रा. वास्तववादी दृष्टीकोणाचे टिकात्मक परिक्षण करा.

प्र. ३ रा. आंतरराष्ट्रीय संघटनांचे मुल्यामापन करा.

प्र. ४ था. राष्ट्रसंघाच्या कार्यावर टिप लिहा.

प्र. ५ वा. राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारण मिमांसा करा.

**टिपा लिहा**

१) उदारमतवादी दृष्टीकोण

२) मॉर्गेथोंचा वास्तववादी दृष्टीकोण

३) राष्ट्रसंघ

४) आंतरराष्ट्रीय संघटना

## १.९ संदर्भ सूची


१) कोल्हे संतोष शिंदे सुनिल, 'आंतरराष्ट्रीय संबंध, एज्युकेशन पब्लिशर्स, औरंगाबाद २०१४.

२) भोगले शांताराम, 'आंतरराष्ट्रीय संबंध, 'विद्या प्रकाशन, नागपुर, २००१.

३) बोर्जेस जॉन्सन, 'संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०११

४) देवळणकर शैलेंद्र, 'संयुक्त राष्ट्रे', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

५) तोडकर बी. डी., 'आंतरराष्ट्रीय संबंध, 'डायमंड पब्लिकेशन्स, पुणे २०१२

६) रायपुरकर वंसत, 'आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन, नागपूर २००१.


❄❄❄❄❄❄❄

२

# संयुक्तराष्ट्र

**घटक रचना**

२.१ उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद

२.३.१संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील तत्वे

२.४ आमसभा

२.४.१आमसभेची रचना

२.४.२अधिवेशन व कामकाज पद्धती

२.४.३अधिकार व कार्य

२.४.४आमसभेची भूमिका

२.५ सुरक्षा परिषद

२.५.१सुरक्षा परिषदेची रचना

२.५.२सुरक्षा परिषदेचे अधिकार व कार्य

२.५.३सुरक्षा परिषदेच्या समित्या

२.५.४नकाराधिकार

२.५.४.१नकाराधिकाराचे समर्थन

२.५.४.२नकाराधिकाराचा विरोध

२.५.५सुरक्षा परिषदेची भूमिका

२.६ आंतरराष्ट्रीय न्यायालय

२.६.१आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना

२.६.२आंतरराष्ट्रीय न्यायालयाची रचना

२.६.३आंतरराष्ट्रीय न्यायालयाची उद्दिष्टे

२.६.४आंतरराष्ट्रीय न्यायालयाची वैशिष्ट्ये

२.६.५आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिकार व कार्य

२.६.६आंतरराष्ट्रीय न्यायालयाची भूमिका

२.७ संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव

२.७.१महासचिवांची नेमणूक

२.७.२महासचिवांचे अधिकार व कार्य

२.७.३महासचिवांची भूमिका

## २.१ उद्दिष्टे (Objectives):-

१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संसदेमधील तत्त्वांचा अभ्यास करणे.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका अभ्यासणे.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या यंत्रणेतील आमसभा या घटकाचा अभ्यास करणे.

४) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या यंत्रणेतील सुरक्षा परिषद या घटकाची माहिती घेणे.

५) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या यंत्रणेतील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा अभ्यास करणे.

६) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्यपद्धतीमधील महासचिव या पदाविषयी माहिती घेणे.

## २.२ प्रस्तावना (Introduction):-

जागतिक स्तरावर आतापर्यंत झालेल्या दोन महायुद्धामुळे झालेल्या वित्त व जीवित हानीचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित व्हावी, या उद्देशाने राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आलेली होती, परंतु काही बलाढ्य राष्ट्रांनी राष्ट्रसंघाचे नियम पालन न केल्यामुळे जगाला दुसऱ्या महायुद्धाला तोंड द्यावे लागले. दुसरे महायुद्ध रोखण्यात राष्ट्रसंघाला अपयश आल्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या आगीत राष्ट्रसंघ भस्म झाले आणि राष्ट्रसंघाच्या भस्म झालेल्या राखेतूनच अखेर संयुक्त राष्ट्र संघाचा जन्म झाला. दुसऱ्या महायुद्धात पहिल्या महायुद्धापेक्षाही मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाल्यामुळे त्याचे जगावर गंभीर परिणाम झाले. परिणामी अशाप्रकारचे युद्ध भविष्यात होऊ नयेत आणि जगात शांतता नांदावी या उद्देशाने २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. आधुनिक काळात अधिकाधिक विकसित झालेल्या तंत्रज्ञानामुळे राष्ट्रा-राष्ट्रामध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा वाढत गेली. यामुळे जगावर भीतीचे सावट निर्माण झालेले होते, म्हणून शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेची निर्मिती करण्यात आली. जागतिक शांतता प्रस्थापित होऊन राष्ट्रा-राष्ट्रात सहकार्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत, राष्ट्रा- राष्ट्रात निर्माण झालेल्या शस्त्रास्त्र स्पर्धेला आळा बसावा, मानवाला शांततामय पद्धतीने सहजीवन जगता यावे, त्यासाठी मानवाला सुरक्षितता प्राप्त करून देणे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महत्वपूर्ण घटक अंगांचा अभ्यास केला जाणार आहे. यामध्ये विशेषतः संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद, आमसभा, सुरक्षा परिषद, आंतरराष्ट्रीय न्यायालय आणि संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव इत्यादी घटक अंगांची रचना, उद्दिष्टे, अधिकार व कार्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्यांच्या भूमिकेचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## २.३ संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद (United Nation Organizations Charter):-

द्वितीय जागतिक महायुद्धाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने हालचालींनी वेग घेतला. त्याचाच एक भाग म्हणून संयुक्त राष्ट्र संघटना

स्थापन करण्यासंदर्भातील २६ जून १९४५ रोजी सॅनफ्रान्सिस्को येथे झालेल्या परिषदेत ५१ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेवर सह्या केल्या. त्यानुसार २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये १११ कलमे असून १९ परिशिष्टांचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेची सुरुवात 'आम्ही संयुक्त राष्ट्राची जनता' अशा विशिष्ट शब्दरचनेने करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद पुढीलप्रमाणे आहे;

"आम्ही संयुक्त राष्ट्राची जनता-ज्या युद्धाने आमच्या आयुष्यात दोनवेळा मानवजातीला अपरिमीत दुःखाच्या खाईत लोटले, अशा सर्वभक्षक युद्धापासून भावी पिढ्यांचे रक्षण करण्यासाठी-मूलभूत मानवी अधिकार, मानवी जीविताचे मूल्य आणि प्रतिष्ठा, स्त्री-पुरुष आणि लहान-मोठी राष्ट्रे यांच्या समान अधिकारावरील अढळ निष्ठा प्रस्थापित करण्याचा-आंतरराष्ट्रीय तह, करारमदार आणि आंतरराष्ट्रीय विधिनियम या सर्वांमुळे निर्माण होणारी जबाबदारी तत्परतेने स्वीकारण्याचा व प्रत्येकाला न्याय मिळेल, अशी परिस्थिती निर्माण करण्याचा स्वातंत्र्याच्या व्यापक भूमिकेवरून सामाजिक प्रगती व राहणीमानाचा दर्जा वाढविण्याचा निर्धार करीत आहोत. आणि या उद्दिष्टासाठी-सहिष्णुता पाहण्याचा आणि उत्तम शेजार याप्रमाणे शांततेने एकत्र राहण्याचा- आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता कायम राखण्यासाठी आमची सर्व शक्ती एकवटण्याचा- सामूहिक हिताचा अपवाद वगळल्यास लष्करी सामर्थ्य न वापरण्याचा, त्यासाठी काही तत्वे व पद्धती मान्य करण्याचा-सर्व जनतेच्या आर्थिक, सामाजिक प्रगतीच्या उत्तेजनार्थ आंतरराष्ट्रीय यंत्रणा वापरण्याचा आमचा निश्चय आहे व ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करु. त्यानुसार आमची सरकारे आपल्या प्रतिनिधींमार्फत सॅनफ्रान्सिस्को येथे ही सनद मान्य करीत आहोत व 'संयुक्त राष्ट्रे' या नावाने ओळखली जाणारी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाल्याचे आम्ही, याअन्वये जाहीर करतो."

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या या सनदेमध्ये सदस्य राष्ट्रांचे हक्क आणि कर्तव्य नमूद केलेली आहेत. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्याची साधने आणि कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे. ही सनद म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेचे एक प्रमुख उपकरण आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेपासून म्हणजेच २४ ऑक्टोबर १९४५ पासून ही सनद अंमलात आलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील चार कलमांमध्ये आतापर्यंत सुधारणा करण्यात आलेले आहेत. या सनदेत सुधारणा करण्यासाठी सुरक्षा समितीच्या पाच कायम सदस्यांसह संयुक्त राष्ट्रातील सदस्यांपैकी दोनतृतीयांश सदस्यांची मंजुरी मिळणे आवश्यक असते, त्याशिवाय संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये कोणतीही सुधारणा करता येत नाही.

### २.३.१ **संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील तत्वे:-**

२४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील प्रमुख तत्वे पुढीलप्रमाणे आहेत;

१) नि:शस्त्रीकरणाचा स्वीकार करणे.

२) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आर्थिक सहकार्य प्रस्थापित करणे.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना भीतीपासून मुक्त जीवनाची शाश्वती देणे.

४) व्यापक तसेच स्थायी स्वरूपाची आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवस्था निर्माण करणे.

५) आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे.

- **सारांश:-**

  संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेचे एक प्रमुख उपकरण म्हणजे संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद होय. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांचे हक्क आणि कर्तव्य नमूद केलेली आहेत. या सनदेमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्याची साधने तसेच कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेची सुरुवात 'आम्ही संयुक्त राष्ट्राची जनता...' अशा विशिष्ट शब्दरचनेने करण्यात येऊन आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता तसेच सामूहिक हिताच्या सुरक्षिततेचा उल्लेख या सनदेमध्ये करण्यात आलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना या सनदेनुसार करण्यात आलेली आहे. बदलता काळ आणि परिस्थितीनुसार संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये आतापर्यंत काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

- **आपली प्रगती तपासा.**

  १) संयुक्त राष्ट्र संघटनेची सनद स्पष्ट करा.

  २) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील तत्वे स्पष्ट करा.

## २.४ आमसभा (General Assembly):-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रमुख सहा घटकापैकी आमसभा हा एक महत्त्वाचा घटक आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना प्रतिनिधित्व देणारी सभा म्हणून आमसभेकडे बघितले जाते. आमसभा हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे चर्चा आणि विचारविमर्श करणारे एक मंडळ आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय समुदायाकडून आपले विचार, मत किंवा तक्रारी मांडण्यासाठीचे आमसभा हे एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरलेले आहे. आमसभा ही संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व सभासद राष्ट्रांची प्रातिनिधिक सभा असल्यामुळे आमसभेला 'संयुक्त राष्ट्राचे कायदेमंडळ', 'विश्व संसद' (World Parliament) किंवा संपूर्ण जगाची 'ग्रामसभा' असेही संबोधले जाते.

### २.४.१ आमसभेची रचना:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या राज्यघटनेतील चौथ्या प्रकरणात कलम ९ ते २२ मध्ये आमसभेच्या संदर्भातील तरतुदी केलेल्या आहेत. आमसभेला सर्वसाधारण सभा किंवा महासभा असेही म्हटले जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रत्येक सभासद राष्ट्राला आमसभेचे सदस्यत्व दिले जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेच्या वेळी आमसभेची सदस्य संख्या ५० होती, परंतु त्यामध्ये उत्तरोत्तर वाढ होऊन सध्या आमसभेतील सदस्यांची संख्या १९४ पर्यंत पोहोचलेली आहे. आमसभेचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आहे. संयुक्त

राष्ट्र संघटनेच्या प्रत्येक सदस्य राष्ट्राला आमसभेमध्ये आपले पाच प्रतिनिधी पाठवण्याचा अधिकार आहे, परंतु असे असले तरी प्रत्येक सदस्याला मतदानावेळी मात्र केवळ एक मत देण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. आमसभेचे सदस्यत्व देताना सदस्य राष्ट्रांच्या लोकसंख्येचा किंवा भौगोलिक क्षेत्रफळाचा विचार न करता प्रत्येक देशाला समान प्रतिनिधित्व दिले जाते. याचाच अर्थ संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये सर्व सदस्य राष्ट्रांचा दर्जा समान ठेवलेला आहे.

### २.४.२ अधिवेशन व कामकाज पद्धती:-

आमसभेचे अधिवेशन वर्षातून एकदा घेतले जाते. सर्वसाधारणपणे आमसभेचे हे अधिवेशन सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी सुरू होते आणि ते डिसेंबरमध्ये पूर्ण होते. आमसभेच्या या वार्षिक अधिवेशनाशिवाय अतिरिक्त किंवा विशेष अधिवेशन बोलावण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांना दिलेला आहे, परंतु तशाप्रकारची विनंती आमसभेच्या बहुसंख्य सभासदांनी करणे आवश्यक असते किंवा सुरक्षा समितीने तशी शिफारस करणे आवश्यक असते. आमसभेचे विशेष अधिवेशन सर्व सदस्य राष्ट्रांच्या सार्वजनिक हिताची संबंधित असलेल्या विषयावर चर्चा किंवा विचारविनिमय करण्यासाठी बोलावले जाते. आतापर्यंत आमसभेची अशी अधिवेशने काहीवेळा बोलावण्यात आलेली आहेत. उदा. भारत-पाकिस्तान संघर्ष, इस्राईल संघर्ष, फिलिपाईन्सची समस्या इत्यादी वेळी अशी विशेष अधिवेशने घेण्यात आलेली आहेत. आमसभेच्या अधिवेशनामध्ये सदस्य राष्ट्रांच्या संदर्भातील वेगवेगळ्या विषयांवर विचार विमर्श केला जात असल्यामुळे आमसभेला संयुक्त राष्ट्र संघटनेचे 'विचारविनिमय मंडळ' (Deliberative Body) असेही म्हटले जाते.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी प्रत्येक सभासद राष्ट्राला दरवर्षी काही ठराविक रक्कम सदस्य शुल्क म्हणून जमा करावे लागते. हे सदस्य शुल्क ठरविण्याचा अधिकार आमसभेला देण्यात आलेला आहे. आमसभेच्या सदस्य शुल्काच्या माध्यमातून जी वर्गणी जमा होते त्यामधूनच युनोचा पूर्ण खर्च केला जातो. आमसभेच्या सदस्य राष्ट्राने जर सलग दोन वर्ष सदस्य शुल्क भरले नाही, तर अशावेळी त्या सदस्य राष्ट्राचा मतदानाचा अधिकार आमसभा स्थगित करू शकते.

आमसभेच्या प्रत्येक वर्षी सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या अधिवेशनादरम्यान साध्या बहुमताने आमसभेच्या अध्यक्षाची निवड केली जाते. आमसभेच्या अध्यक्षांची निवड ही गुप्त मतदान पद्धतीने केली जाते. अध्यक्षांप्रमाणेच उपाध्यक्ष आणि आमसभेच्या सात प्रमुख समित्यांच्या सभापतींची निवडदेखील अधिवेशनात केली जाते. आमसभेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि वेगवेगळ्या समितीच्या सभापतींचा कार्यकाल हा एक वर्षांचा असतो.

आमसभा आपले कामकाज काही प्रमुख समित्यांमार्फत पार पाडीत असते म्हणजेच आमसभेला मदत करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या गठीत केल्या जातात. यामध्ये राजकीय सुरक्षा समिती, सामाजिक, मानवीय व सांस्कृतिक समिती, आर्थिक आणि वित्तीय प्रश्नासंबंधीची समिती, विश्वस्त राष्ट्रासंबंधीची समिती, विधी समिती, प्रशासन व अंदाज समिती इत्यादी समित्यांचा समावेश आहे. या सर्व समित्यांच्या अध्यक्षांची निवड आमसभेच्या सप्टेंबर महिन्यात होणाऱ्या वार्षिक अधिवेशनादरम्यान केली जाते.

### २.४.३ अधिकार व कार्य:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेमध्ये कलम १० ते १६ यादरम्यान आमसभेच्या अधिकार व कार्याचा उल्लेख केलेला आहे. त्यानुसार आमसभा प्राप्त अधिकारानुसार खालील कार्य पार पाडीत असते;

१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता तसेच राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्याच्या तत्वावर विचार विनिमय करून शिफारशी करणे.

२) संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदे अंतर्गत येणाऱ्या विविध विषय किंवा प्रश्नांवर चर्चा करणे.

३) संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व घटक मंडळांच्या कार्याशीसंबंधित अहवालावर आमसभेत विचारविनिमय करणे.

४) सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांची नियुक्ती करणे.

५) राष्ट्रा-राष्ट्रांमधील मैत्रीपूर्ण संबंधांना कमजोर करणाऱ्या कोणत्याही परिस्थितीवर शांततापूर्ण मार्गाने समझोता करण्यासाठी शिफारशी करणे.

६) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व घटक संस्थांवर नियंत्रण ठेवणे.

७) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकांना मान्यता देणे.

८) आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच आरोग्याच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्यासाठी अध्ययनाला चालना देणे.

९) आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश तसेच संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस यांची सुरक्षा परिषदेच्या सहकार्याने निवड करणे.

१०) विविध आंतरराष्ट्रीय समस्या किंवा प्रश्नांवर सुरक्षा समितीला सल्ला देणे.

११) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेअंतर्गत येणाऱ्या विविध विषयावर चर्चा घडवून आणणे.

१२) अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी विविध क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळविणे.

१३) सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय न्यायालय आर्थिक व सामाजिक परिषद तसेच विश्वस्त समितीने पाठवलेल्या वार्षिक अहवालावर विचारविमर्श करणे.

१४) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अर्थसंकल्पावर नियंत्रण ठेवणे.

१५) आंतरराष्ट्रीय कायदा, मानवी हक्क तसेच मूलभूत स्वातंत्र्याचे संरक्षण व संवर्धन करणे.

१६) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे.

१७) आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या प्रश्न वा समस्यांवर चर्चा करून शिफारशी करणे.

१८) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध घटक संस्थांवर कार्य करणाऱ्या नोकर भरतीचे नियम निर्धारित करणे.

१९) संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व देण्यासाठी सभासद राष्ट्रांचे सदस्य शुल्क निश्चित करणे.

२०) सुरक्षा परिषदेच्या शिफारसीनुसार दोन तृतीयांश बहुमताने नवीन सदस्यांना मान्यता देणे.

२१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभासद राष्ट्रांच्या आर्थिक समस्यांचा विचार करून त्यांच्या शुल्क भरण्याच्या कालावधीत वाढ करणे किंवा विशिष्ट प्रकारची सूट देणे.

२२) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभासद राष्ट्रांनी सतत दोन वर्ष नोंदणी शुल्क न भरल्यास त्यांच्या मतदानाच्या अधिकाराचा स्थगिती देणे.

२३) आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वतीने इतर संस्था किंवा राष्ट्रांशी करण्यात आलेल्या करारांना मान्यता देणे.

२४) सुरक्षा परिषद आणि विश्वस्त परिषदेचे अस्थाई सदस्य तसेच सामाजिक आणि आर्थिक परिषदेच्या सर्व सभासदांची निवड करणे.

२५) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षित ते संदर्भात विचारविनिमय करून शिफारशी करणे.

२६) आंतरराष्ट्रीय शांततेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित झाल्यास त्यासंदर्भातील सूचना सुरक्षा परिषदेला देणे.

२७) संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेच्या कृतीकार्यक्षेत्रातील किंवा संयुक्त राष्ट्राच्या कोणत्याही भागावर परिणाम करणाऱ्या विविध प्रश्न व समस्यांवर विचारविमर्श करून शिफारशी करणे.

२८) राष्ट्रा-राष्ट्रामधील परस्परसंबंध बिघडवणाऱ्या तसेच राष्ट्रांच्या सामूहिक हिताला धोका पोहोचविणाऱ्या परिस्थितीवर शांततेच्या मार्गाने तोडगा काढून आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याच्या दिशेने प्रयत्न करणे.

२९) सदस्य राष्ट्रांकडून घ्यावयाचा निधी ठरवणे.

३०) संयुक्त राष्ट्र संघटनेअंतर्गत विविध क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या संस्था तसेच संघटनांच्या कार्यात समन्वय साधणे.

३१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांच्या राष्ट्रीय प्रतिनिधीमंडळाला अधिस्वीकृती देणे.

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेअंतर्गत आमसभेला आंतरराष्ट्रीय प्रश्न वा समस्यांवर विचारविमर्श करून शिफारशी करण्यासंदर्भात, संयुक्त राष्ट्राच्या अर्थसंकल्पावर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात, संयुक्त राष्ट्राच्या विविध घटक संस्थेवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीबाबत तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या वेगवेगळ्या घटक संस्थांवर पर्यवेक्षण

करण्यासंदर्भात, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये दुरुस्ती करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त झालेले आहेत.

### २.४.४ आमसभेची भूमिका:-

आमसभेला प्राप्त असणाऱ्या अधिकारानुसार जी विविध कार्य आमसभेकडून केली जातात, त्यातून आमसभेची भूमिका अधिक स्पष्ट होते. आमसभेमध्ये जागतिक जनमताचे प्रतिबिंब दिसत असल्यामुळे निश्चितच आमसभेच्या निर्णयाला तसेच भूमिकेला नैतिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून विविध आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर आमसभेमध्ये चर्चा करून त्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला जात असल्यामुळे आमसभा ही 'जगाची ग्रामसभा' किंवा 'संसद' ठरलेली आहे. आमसभेच्या व्यासपीठावरून आंतरराष्ट्रीय स्तरावर मानवी कल्याणाशी संबंधित चर्चा करून शिफारसी केल्या जातात. तसेच या व्यासपीठावरून जागतिक स्तरावर नेत्यांच्या भेटीगाठीतून विचारविमर्श होत असल्यामुळे जागतिक समस्या सोडविण्यासाठी वा प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आमसभेच्या व्यासपीठाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेतील सुरक्षा परिषदेचे वाढते महत्त्व आणि सुरक्षा परिषदेतील राष्ट्रांच्या मतभेदांमुळे आमसभेची भूमिका महत्त्वपूर्ण बनलेली आहे.

आमसभेचे अधिकार आणि कार्य यावरून आंतरराष्ट्रीय स्तरावर आमसभेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली असली तरी आमसभेला प्राप्त असणारे बहुतेक अधिकार हे केवळ विचारविनिमय आणि शिफारशी करण्यासंदर्भातील आहेत. परंतु आमसभेने घेतलेले निर्णय आंतरराष्ट्रीय स्तरावर बंधनकारक मानले जात नसल्यामुळे आमसभेचा प्रभाव कमी होताना दिसतो. त्याचप्रमाणे आमसभेच्या सदस्य संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे तसेच प्रत्येक देशाला पाच प्रतिनिधी आमसभेमध्ये पाठवण्याचा अधिकार असल्यामुळे आमसभेचा आकार दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. त्यामुळे आमसभेत होणाऱ्या चर्चेला योग्य दिशा न मिळता केवळ मेळाव्याचे स्वरूप प्राप्त होत आहे. तसेच आमसभेमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर विभाग व प्रदेशानुसार विविध गट निर्माण झाल्यामुळे सर्वमान्य निर्णयात विविध अडथळे निर्माण झालेले आहेत. त्याचप्रमाणे आमसभेमध्ये घेण्यात येणारे निर्णय बहुमतावर आधारित असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या आमसभेमध्ये सार्वत्रिक पाठिंब्याचा अभाव जाणवतो. परिणामी आमसभेने घेतलेल्या निर्णयाचा पाहिजे तेवढा प्रभाव निर्माण होऊ शकत नाही. असे असले तरीदेखील आंतरराष्ट्रीय शांततेच्या आणि सुरक्षिततेच्या संदर्भात तसेच राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढविण्यासंदर्भात आमसभेची भूमिका आजपर्यंतचा इतिहास पाहता महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. त्यामुळे निश्चितच जगाची 'ग्रामसभा' किंवा 'सर्वसाधारण सभा' म्हणून आमसभेचे महत्त्व नाकारता येणार नाही. कारण आमसभेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना आपले प्रश्न व समस्या मांडण्याचे मुक्त विद्यापीठ आमसभेच्या रूपाने प्राप्त झालेले आहे. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेच्या संदर्भातील विविध प्रश्न संयुक्त राष्ट्र संघटनेमधील बड्या राष्ट्रांमध्ये असणारे परस्पर मतभेद, अविश्वास तसेच बड्या राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे सुरक्षा परिषद सोडवू शकलेली नाही. परिणामी सुरक्षा परिषद प्रश्न सोडवण्यासंदर्भात अकार्यक्षम बनत चाललेली आहे, त्यामुळे सुरक्षा परिषदेच्या काही जबाबदाऱ्या आमसभेला पूर्ण कराव्या लागत आहेत. १९७५ मध्ये आमसभेतील आफ्रिका आणि आशिया खंडातील

सदस्य राष्ट्रांच्या बहुमताने असा ठराव मंजूर करण्यात आलेला होता की, सुरक्षा परिषदेस आमसभेच्या बहूमतानुसार वा इच्छेनुसार निर्णय घेणे आवश्यक करण्यात आले.

- **सारांश:-**

  संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सहा घटक अंगापैकी एक प्रमुख अंग म्हणून आमसभेकडे बघितले जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना आमसभेमध्ये प्रतिनिधित्व देणारे आमसभा हे एकमेव घटक अंग आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या प्रत्येक सदस्य राष्ट्राला आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले मत, विचार, तक्रारी, प्रश्न वा समस्या मांडण्याचे आमसभा हे एक उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. आमसभा हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा एक चर्चात्मक भाग आहे, कारण आमसभेमध्ये राष्ट्रा-राष्ट्रांमधील वाद किंवा समस्यांवर चर्चा केली जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेचे धोरण ठरविण्याचा अधिकार आमसभेला असल्यामुळे आमसभेच्या उल्लेख 'संयुक्त राष्ट्र संघटनेचे कायदेमंडळ' किंवा संपूर्ण 'जगाची ग्रामसभा' म्हणूनही केला जातो. सुरक्षा परिषदेला प्राप्त असणारा नकाराधिकार तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बड्या कायमस्वरूपी सदस्य राष्ट्रांच्या अडवणुकीचे धोरणामुळे अनिर्णीत राहिलेले प्रश्न सोडविण्याच्या महत्त्वाच्या कार्यात आमसभेत साध्या बहुमताने निर्णय घेतले जाऊ लागले आहेत, त्यामुळे सहाजिकच आमसभेच्या अधिकारात वाढ होत आहे. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या संकटकालीन सेनादलाच्या निर्मितीमुळे देखील आमसभेचे महत्त्व वाढलेले आहे. थोडक्यात महासभेत होणारी खुली व मुक्त चर्चा, लहान-मोठ्या समानता, बहुमताने घेतले जाणारे निर्णय, सामूहिक कार्यवाही तसेच शांततेसाठी एकता या ठरावाने सुरक्षा परिषदेला पर्यायी ठरलेली सुरक्षा उपाययोजना समितीची स्थापना इत्यादी मुळे आमसभेचे महत्व वाढलेले आहे. आंतरराष्ट्रीय अभ्यासक मॉर्गैंथा यांनी आमसभेचे वाढते महत्त्व विशद करताना म्हटले आहे की,"आंतरराष्ट्रीय स्तरावर आमसभा ही संयुक्त राष्ट्र संघटनेची अत्यंत प्रभावी शाखा म्हणून उदयास येत आहे." यावरून आंतरराष्ट्रीय स्तरावर आमसभेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत आहे, हे स्पष्ट होते.

- **आपली प्रगती तपासा.**

  १) आमसभेचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

  २) आमसभेची भूमिका स्पष्ट करा.

  ३) आमसभेची रचना सविस्तर लिहा.

## २.५ सुरक्षा परिषद (Security Council):-

संयुक्त राष्ट्र संघटनेचे सुरक्षा परिषद हे एक महत्त्वाचे अंग असून या सुरक्षा परिषदेची स्थापना १९४५ मध्ये करण्यात आलेली आहे. सुरक्षा परिषदेचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आहे. सुरक्षा परिषद संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्यकारी मंडळ म्हणून ओळखले जाते. कारण आमसभेने घेतलेल्या विविध निर्णयावर तसेच केलेल्या कायद्यांना प्रत्यक्षात

आणण्याचे कार्य सुरक्षा परिषदेमार्फत केले जाते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यामध्ये सुरक्षा परिषदेची भूमिका महत्त्वाची असते. त्याचपद्धतीने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या राष्ट्राविरुद्ध कारवाई करण्याची मुख्य जबाबदारीदेखील संयुक्त राष्ट्र संघटनेने सुरक्षा परिषदेवर टाकलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांवर सुरक्षा परिषदेने घेतलेले निर्णय हे बंधनकारक असतात. आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात आल्यास तेथे शांतिसैन्य पाठवून त्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला देण्यात आलेला आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता कशामुळे धोक्यात आलेली आहे ? ती कोणत्या राष्ट्राकडून धोक्यात आलेली आहे ? आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्राविरूद्ध कोणती कारवाई करायला हवी? यामध्ये प्रत्यक्ष लष्करी कारवाई करायची की त्या राष्ट्रावर आर्थिक किंवा व्यापारी दृष्टिकोनातून बहिष्कार घालायचा ? हे ठरविण्याचा अधिकार पूर्णपणे सुरक्षा परिषदेला आहे. थोडक्यात आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा परिषद हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.

### २.५.१सुरक्षा परिषदेची रचना:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदी मधील तरतुदीनुसार सुरक्षा परिषदेमध्ये ०५ स्थायी आणि ०६ अस्थायी सदस्य होते. परंतु १९६५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेमध्ये करण्यात आलेल्या घटनादुरुस्तीनुसार सुरक्षा परिषदेची एकूण सदस्यसंख्या ११ वरून १५ करण्यात आलेली आहे. थोडक्यात या घटनादुरुस्तीनुसार स्थायी सदस्यांच्या संख्येत वाढ करण्यात आलेली नसून केवळ अस्थायी सदस्यांची संख्या वाढवून ती १० करण्यात आली आहे. सुरक्षा परिषदेच्या ०५ स्थायी सदस्यांमध्ये अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स आणि इंग्लंड या देशांचा समावेश आहे. सुरक्षा परिषदेतील १० अस्थायी सदस्यांची नियुक्ती ०२ वर्षांच्या कार्यकालासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेकडून दोनतृतीयांश बहुमताने केली जाते. सुरक्षा परिषदेचे स्थायी सदस्यत्व निश्चित करताना सदस्यत्वासाठी कोणतेही भौगोलिक निकष ठरण्यात आलेले नव्हते, परंतु सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यांची निवड करताना मात्र भौगोलिक निकषांनुसार ही नियुक्ती केली जाते. अस्थायी सदस्यांची निवड करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांची विभागणी पाच गटांमध्ये करण्यात आलेली आहे. यानुसार अस्थायी सदस्यांची निवड करताना आशिया-आफ्रिका खंडातील देशांमधून ०५ प्रतिनिधी, पूर्व युरोप मधून ०१ प्रतिनिधी, लॅटिन अमेरिकेतून ०२ प्रतिनिधी तर पश्चिम युरोप मधून ०२ प्रतिनिधींची निवड केली जाते. अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये अस्थायी सदस्यांची नियुक्ती करताना जगाचे भौगोलिकदृष्ट्या संतुलन राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सभासद राष्ट्रांना अनुक्रमे सुरक्षा परिषदेमध्ये सदस्यत्व प्राप्त व्हावे, या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्य राष्ट्रांना सलग दुसऱ्यांदा सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्यत्व देता येत नाही. सुरक्षा परिषदेच्या प्रत्येक सदस्य राष्ट्रांना आपला केवळ एकच प्रतिनिधी सुरक्षा

परिषदेमध्ये पाठवता येतो. अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना सुरक्षा परिषदेमध्ये क्रमाक्रमाने प्रतिनिधित्व दिले जाते.

सुरक्षा परिषदेच्या ५ स्थायी सदस्य असणाऱ्या राष्ट्रांना नकाराधिकाराचा (Veto Power) विशेष अधिकार देण्यात आलेला आहे. त्यामुळे या नकाराधिकारानुसार ०५ पैकी एका सदस्याने जरी सुरक्षा परिषदेसमोर आलेल्या ठरावाबाबत नकाराधिकाराचा वापर केल्यास तो ठराव मंजूर होऊ शकत नाही. मात्र सुरक्षा परिषदेसमोर विचारार्थ आलेल्या ठरावावरील मतदानावेळी स्थायी सदस्यांपैकी एखादा सदस्य गैरहजर राहिल्यास तो त्या राष्ट्राचा नकाराधिकार मानला जात नाही. त्यामुळे नकाराधिकार वापरण्यासाठी स्थायी सदस्य राष्ट्राने मतदानाच्यावेळी प्रत्यक्षपणे उपस्थित राहूनच मतदान करणे आवश्यक असते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी सुरक्षा परिषदेतील पाचही स्थाई सदस्यांचे एकमत असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या एखाद्या युद्धखोर राष्ट्राविरुद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वाअंतर्गत कारवाई करण्यासाठी सुरक्षा परिषदेच्या पाच स्थायी राष्ट्रांची सर्वसहमती अपेक्षित असते. या उद्देशानेच स्थायी राष्ट्रांना सुरक्षा परिषदेमध्ये नकाराधिकार बहाल केलेला आहे. सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यांच्या या नकाराधिकारामुळे जगातील बड्या राष्ट्रांचे वर्चस्व टिकवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. कारण कोणत्याही आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाच्या प्रश्नावर या पाच बड्या राष्ट्रांचे एकमत झाल्याशिवाय संयुक्त राष्ट्र संघटनेची सुरक्षा परिषद कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ शकत नाही. त्याचप्रमाणे या स्थायी सदस्यांनी नकाराधिकाराचा वापर केव्हा करावा आणि कितीवेळा करावा याबाबतदेखील या स्थायी राष्ट्रावर कोणतेही बंधन टाकण्यात आलेले नाही. सुरक्षा परिषदेच्या अस्थायी राष्ट्रांना मात्र अशाप्रकारचा नकाराधिकार देण्यात आलेला नाही. २०१८ पर्यंत भारताने सात वेळा सुरक्षा परिषदेचे अस्थायी सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. तसेच वर्तमान स्थितीत भारत संयुक्त राष्ट्र संघटनेचा सदस्य म्हणून कार्यरत आहे.सध्या सुरक्षा परिषदेचे  अल्बानिया, ब्राझील, गबान, घाना, भारत, आयर्लंड, केनिया, मेक्सिको, नॉर्वे आणि संयुक्त अरब अमिराती हे राष्ट्र अस्थायी सदस्य म्हणून कार्यरत आहेत.

सुरक्षा परिषदेची सर्व सदस्य राष्ट्रे आपल्या मधूनच इंग्रजी आद्याक्षराप्रमाणे एकाची अध्यक्ष म्हणून बहुमताने निवड करतात. म्हणून निवड झाल्यानंतर अध्यक्षांचा कार्यकाल हा एक महिन्याचा असतो. त्यामुळे सहाजिकच सुरक्षा परिषदेतील प्रत्येक सदस्याला रसाला १५ महिन्या मधून एकदा सुरक्षा परिषदेचे अध्यक्षपद मिळते. म्हणजे सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष पद हे सतत चक्रीय पद्धतीने फिरते असते. सुरक्षा परिषदेची बैठक ही साधारणपणे पंधरा दिवसातून एक वेळा होत असते. सुरक्षा परिषदेच्या महिन्यातून सर्वसाधारणपणे दोन बैठका झाल्या पाहिजेत असा संकेत आहे. या दोन बैठकामधील अंतर १४ दिवसांपेक्षा जास्त असू नये असा संकेत आहे.

सुरक्षा परिषदेतील प्रत्येक सदस्य राष्ट्राला एक मत देण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. सुरक्षा परिषदेसमोर येणारे प्रश्न व ठरावावर घेतले जाणारे निर्णय हे बहुमताने ठरवले

जातात. सुरक्षा परिषदेच्या एकूण १५ सदस्यांपैकी ९ सदस्यांचे मत हे बहुमत मानले जाते. सुरक्षा परिषदेच्या दैनंदिन कामकाजासंबंधीच्या निर्णयासाठी सुरक्षा परिषदेच्या १५ पैकी ९ सदस्यांचे होकारार्थी मत आवश्यक असते. कार्यपद्धतीसंदर्भात घेतल्या जाणाऱ्या निर्णयामध्ये सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांना नकाराधिकार नसतो. मात्र आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या संदर्भात घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही निर्णयामध्ये ९ सदस्यांचे होकारार्थी मत आवश्यक असते. यामध्ये पाचही स्थायी सदस्यांचे होकारार्थी मत असणे अत्यंत आवश्यक असते.

### २.५.२ सुरक्षा परिषदेचे अधिकार व कार्य:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये सुरक्षा परिषदेच्या कार्याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. या सनदेमधील कलम २४ नुसार संयुक्त राष्ट्र संघटनेचे प्रमुख उद्दिष्ट साध्य करण्याची जबाबदारी पार पाडत असताना सुरक्षा परिषदेला विविध तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे लागते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम २४ ते २६ मध्ये सुरक्षा परिषदेच्या अधिकार व कार्याची सविस्तर नोंद केलेली आहे, यानुसार सुरक्षा परिषदेचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे आहेत;

**१) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता कायम राखणे:-**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याची प्रमुख जबाबदारी सुरक्षा परिषदेची असते. आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या प्रश्न व समस्यांमुळे आंतरराष्ट्रीय शांतता भंग पावणार नाही आणि त्यातून आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेला धोका निर्माण होणार नाही, याची खबरदारी सुरक्षा परिषदेला घ्यावी लागते. त्यासाठी निर्माण झालेले प्रश्न व समस्यांची सोडवणूक शांततामय मार्गाने करण्याचा प्रयत्न सुरक्षा परिषद करीत असते. त्यासाठी संबंधित राष्ट्रांशी चर्चा करणे, वाटाघाटी करणे, मध्यस्थी करणे, उभय राष्ट्रांचे मनोमिलन करण्यासाठी त्यांच्यात करार करणे, तडजोड करणे इत्यादी मार्गांचा वापर सुरक्षा परिषदेमार्फत केला जातो. थोडक्यात शक्यतोवर आंतरराष्ट्रीय प्रश्न किंवा समस्या सोडविण्यासाठी सुरक्षा परिषद शांततामय मार्गांना प्राधान्यक्रम देत असते, परंतु शांततामय मार्गाने एखादा आंतरराष्ट्रीय प्रश्न किंवा समस्या सुटू शकत नसेल तर, अशावेळेस संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ३९ ते ५१ मधील केलेल्या तरतुदीनुसार संबंधित राष्ट्राविरोधात बलप्रयोगाचा वापर करून कठोर कारवाई करण्याचा अधिकार सुरक्षा परिषदेला देण्यात आलेला आहे. बलप्रयोगाचा वापर करताना सुरक्षा परिषद संबंधित प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी सर्वप्रथम बिनलष्करी प्रयोगाचा वापर करत असते. बिनलष्करी प्रयोगाचा वापर करताना सुरक्षा परिषद संबंधित राष्ट्राशी राजकीय संबंध तोडणे, आर्थिक बहिष्कार टाकणे, आर्थिक नाकेबंदी करणे, संचार व दळणवळण माध्यमांची नाकेबंदी करणे, आंतरराष्ट्रीय बँकांमध्ये संबंधित राष्ट्रांच्या असलेल्या खात्यांना सील करणे इत्यादी मार्गांचा वापर करीत असते. बिनलष्करी प्रयोगाचा वापर करून संबंधित समस्या वा प्रश्न सोडवण्यात यश येत नसल्यास शेवटचा मार्ग म्हणून सुरक्षा परिषद लष्करी बळाचा वापर आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता कायम राखण्यासाठी करीत असते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि

सुरक्षितता राखण्यासाठी शेवटचा पर्याय म्हणून सुरक्षा परिषदेकडून लष्करी बळाचा वापर केला जातो. लष्करी कारवाई करण्यासाठी सुरक्षा समितीला अधिकार दिलेले असले तरीदेखील संयुक्त राष्ट्र संघटनेकडे किंवा सुरक्षा परिषदेकडे स्वतःचे सैन्य नसते, अशावेळी लष्करी कारवाई करण्यासाठी सदस्य राष्ट्रांकडून सुरक्षा समितीच्या मागणीनुसार तात्पुरते सैन्य उभारण्यात येते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ४३ नुसार लष्करी बळाचा वापर करण्यासाठी सुरक्षा परिषद संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांची मदत घेत असते. लष्करी बळाचा वापर करीत असताना सुरक्षा परिषदेला मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ४४ नुसार मिलिटरी स्टाफ समितीची तरतूद करण्यात आलेली आहे.

**२) संयुक्त राष्ट्र संघटनेत नवीन राष्ट्रांना प्रवेश देणे:-**

संयुक्त राष्ट्र संघटनेचे नवीन सदस्य होण्यासाठी सुरक्षा परिषदेचे अनुमोदन मिळणे आवश्यक असते. त्याशिवाय सदस्य होणारे नवीन राष्ट्र हे शांतताप्रिय तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेशी वचनबद्ध असणेही आवश्यक असते. सुरक्षा परिषदेच्या अनुमोदना बरोबरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेचे दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व नवीन राष्ट्रांना बहाल केले जाते. सुरक्षा परिषदेच्या पाच स्थायी सदस्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नवीन सदस्य राष्ट्रांना सदस्यत्व देण्यासाठी अनुमती देणे आवश्यक असते. संयुक्त राष्ट्र संघटनेने नवीन राष्ट्राला सदस्यत्व देण्याबाबतची शिफारस सुरत परिषद आमसभेला करीत असते, त्यानुसार आमसभा नवीन राष्ट्राच्या सदस्यत्वासंबंधी निर्णय घेत असते.

**३) निवडणूक विषयक कार्य:-**

संयुक्त राष्ट्र संघटनेत नवीन राष्ट्राला सदस्यत्व देण्याची शिफारस सुरक्षा परिषद करीत असते. याशिवाय आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांच्या निवडीमध्ये सुरक्षा परिषदेची भूमिका महत्त्वाची असते. सुरक्षा परिषद आणि आमसभा यांच्या शिफारशीनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड होत असते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करण्यासाठी सुरक्षा परिषद आणि आमसभा येथे स्वतंत्रपणे एकाचवेळी मतदान घेतले जाते आणि त्यानुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड होते. न्यायाधीशांची निवड होताना मात्र सुरक्षा परिषदेच्या ५ स्थायी सदस्यांची अनुमती असणे आवश्यक असते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांची निवड आमसभा करीत असली तरी महासचिवांच्या निवडीला सुरक्षा परिषदेचे अनुमोदन असणे आवश्यक असते. तसेच महासचिवांच्या नावावर सुरक्षा परिषदेच्या पाचही स्थायी सदस्य राष्ट्रांचे एकमत होणे आवश्यक असते. थोडक्यात सुरक्षा परिषदेला संयुक्त राष्ट्र संघटनेचे नवीन राष्ट्रांना सदस्यत्व देणे, आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करणे तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांची निवड करण्यासंदर्भातील महत्त्वाचे अधिकार प्राप्त आहेत.

## ४) इतर अधिकार व कार्य:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटक संस्थांमध्ये सुरक्षा परिषद ही अत्यंत प्रबळ घटक संस्था आहे, म्हणून सुरक्षा परिषदेला इतर बाबतीतही काही प्रमुख अधिकार प्राप्त झालेले आहेत, ते पुढीलप्रमाणे;

१) आमसभेला वार्षिक अहवाल सादर करणे.

२) आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष त्वरित थांबवण्याचा आदेश देणे.

३) राष्ट्रा-राष्ट्रांमधील प्रश्न, समस्या, संघर्ष किंवा आंतरराष्ट्रीय कायद्यांचे उल्लंघन झालेले असल्यास त्याची चौकशी करण्यासाठी सुरक्षा परिषदेला चौकशी आयोग नेमण्याचा अधिकार आहे.

४) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम २९ नुसार आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी सुरक्षा परिषदेला हंगामी लवाद(Ad hoc Tribunal) नेमण्याचा अधिकार आहे. या हंगामी लवादांना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असून त्यांनी दिलेला निर्णय संबंधित राष्ट्रांवर बंधनकारक असतो.

५) आंतरराष्ट्रीय कायद्याविषयी निर्माण झालेल्या समस्येवर आंतरराष्ट्रीय न्यायालयाला सल्ला देणे.

६) राष्ट्रा-राष्ट्रांमधील स्थानिक वाद शांततेच्या मार्गाने सोडवण्यासाठी प्रादेशिक व्यवस्था निर्माण करणे.

७) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता कायम राखण्यासाठी बळाचा वापर करणे किंवा बळाचा वापर करण्यास अधिकृत मान्यता देणे.

८) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी शस्त्रास्त्रांवर नियंत्रण असणारी व्यवस्था निर्माण करणे.

९) वाद निर्माण झालेल्या उभय राष्ट्रांना शांततेच्या मार्गाने संबंधित समस्या किंवा प्रश्नावर तोडगा काढण्याचे आवाहन करणे.

१०) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका उत्पन्न करणाऱ्या आक्रमक राष्ट्राविरोधात कारवाई करण्याची शिफारस करणे.

११) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या संदर्भात आक्रमक किंवा गंभीर परिस्थिती रोखण्यासाठी काही तात्पुरत्या उपाययोजना करणे.

१२) संयुक्त राष्ट्र संघटनेची संलग्नित असणाऱ्या इतर घटक संस्थांना वेळोवेळी सहकार्य करणे.

१३) विविध आंतरराष्ट्रीय प्रश्न किंवा समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी विविध समित्या किंवा आयोगाची नियुक्ती करणे.

१४) आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामाजिक न्याय, मानवी हक्क, स्वातंत्र्य तसेच राहणीमानाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी आमसभेला सल्ला देणे.

१५) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेचे उल्लंघन करणाऱ्या सदस्य राष्ट्रांना काढून टाकण्याची आमसभेला शिफारस करणे.

१६) सुरक्षा परिषदेच्या अधिकारा अंतर्गत येणाऱ्या विविध विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आंतरराष्ट्रीय परिषदा अथवा संमेलनाचे आयोजन करणे.

१७) आमसभेला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य आणि शैक्षणिक इत्यादी संदर्भातील कार्याचा अहवाल सादर करणे.

१८) वादग्रस्त स्थळाचे निरीक्षण करण्यासाठी निरीक्षक किंवा आयोग पाठवणे.

१९) लष्करीदृष्ट्या महत्त्वाच्या असणाऱ्या विश्वस्त प्रदेशासंबंधी केलेल्या विविध करारांना मान्यता देणे तसेच अशा विश्वस्त प्रदेशावर देखरेख ठेवणे.

अशाप्रकारे सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता कायम राखण्याच्या संदर्भामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेनुसार काही महत्त्वाचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्या अधिकारानुसार महत्त्वपूर्ण कार्य सुरक्षा परिषदेला करावी लागतात.

### २.५.३ सुरक्षा परिषदेच्या समित्या:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेला तिच्या कार्यामध्ये मदत करण्यासाठी तसेच सल्ला देण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. सुरक्षा परिषदेअंतर्गत कार्य करणाऱ्या विविध समित्या पुढीलप्रमाणे आहेत;

१) मिलिटरी स्टाफ कमिटी

२) अणुशक्ती आयोग समिती

३) नि:शस्त्रीकरण आयोग समिती

४) नवीन सदस्यांना प्रवेश देणारी समिती

५) प्रासंगिक समिती

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेला सैनिकी कारवाई, अणूशक्ती, शस्त्रास्त्र तसेच इतर बाबतीमध्ये सल्ला देण्यासाठी वरील समित्या कार्यरत आहेत.

### २.५.४नकाराधिकार (Veto Power):-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेमध्ये अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन या राष्ट्रांची भूमिका प्रमुख ठरलेली आहे. या ०५ राष्ट्रांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये कायम सदस्यत्व बहाल करून नकाराधिकार देण्यात आलेला आहे. या राष्ट्रांना सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व देण्यापाठीमागे संहारक ठरलेल्या दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी आहे. सुरक्षा परिषदेतील या कायम सदस्य असणाऱ्या दोस्त राष्ट्रांनी एकत्रित येऊन लोकशाहीच्या रक्षणासाठी हुकूमशाही राष्ट्राविरुद्ध लढा दिलेला होता. तसेच लोकशाहीचे रक्षण करण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याच्या कार्यात या रस्त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका उत्पन्न झाल्यास या पाच कायम सदस्य राष्ट्रांनी आपले सैन्य एकत्रित करून संघटितपणे प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा ठेवून या पाच राष्ट्रांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेचे कायम सदस्यत्व देण्यात आलेले आहे. थोडक्यात या पाच सदस्य राष्ट्रांना कायम सदस्यत्व बहाल करून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवलेली आहे.

अशाप्रकारे सुरक्षा परिषदेच्या या पाच कायम सदस्य राष्ट्रांना नकाराधिकार देण्यात आलेला आहे. सुरक्षा परिषदेसमोर आलेल्या कोणत्याही ठरावाबाबत किंवा प्रश्नावर या पाचपैकी एका सदस्यानेही नकाराधिकाराचा वापर केल्यास तो ठराव मंजूर होऊ शकत नाही. कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नावर किंवा ठरावार या पाच कायम सदस्य राष्ट्रांचे एकमत झाल्याशिवाय सुरक्षा परिषद कोणताही महत्त्वाचा निर्णय घेऊ शकत नाही. नकाराधिकाराचा वापर केव्हा आणि किती वेळा करावा या संदर्भात कायम सदस्य राष्ट्रांवर कोणतेही बंधन टाकण्यात आलेले नाही. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी या पाच कायम सदस्य राष्ट्रांचे एकमत असणे आवश्यक आहे, त्या हेतूनेच या राष्ट्रांना कायम सदस्यत्व बहाल करण्यात आलेले आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही राष्ट्राविरुद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वाअंतर्गत कारवाई करण्यासाठी या पाच कायमस्वरूपी सदस्य राष्ट्रांची सर्वसहमती असणे आवश्यक असते. आजपर्यंत सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्राकडून २५० पेक्षा अधिकवेळा नकाराधिकाराचा वापर करण्यात आलेला आहे. पाच कायम सदस्य राष्ट्रांपैकी सर्वात जास्त वेळा नकाराधिकाराचा वापर रशियाने केलेला आहे, तर चीनने सर्वात कमी वेळा नकाराधिकार वापरलेला आहे. अशाप्रकारे सुरक्षा परिषदेच्या पाच कायमस्वरुपी सदस्य असणाऱ्या राष्ट्रांना प्रश्न ठरावावर नकार देण्यासाठी देण्यात आलेल्या विशेष अधिकाराला 'नकाराधिकार' (Veto Power) म्हणून ओळखले जाते. सुरक्षा परिषदेच्या स्थापनेपासून ते १९९० पर्यंत म्हणजेच शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांकडून नकाराधिकाराचा वापर शीतयुद्धातील राजकारणाचे साधन म्हणून करण्यात आलेला आहे.

#### २.५.४.१ नकाराधिकाराचे समर्थन:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये कायम सदस्य असणाऱ्या अमेरिका, सोवियत रशिया, चीन, फ्रान्स आणि ब्रिटन या पाच राष्ट्रांना नकाराधिकाराचा विशेष अधिकार

देण्यात आलेला आहे. या राष्ट्रांना देण्यात आलेल्या नकाराधिकाराचे समर्थन खालील मुद्द्यांच्या आधारे केले जाते;

१) जगातील सर्व राष्ट्रे तत्वतः समान असली तरी काही राष्ट्रे ही सामर्थ्यवान, तर काही राष्ट्रे ही दुर्बल असतात, हे निसर्गतः मान्य करावे लागते. म्हणून या निसर्ग तत्वानुसार सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांना दिलेल्या नकाराधिकाराचे समर्थन करण्यात येते.

२) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना दिलेल्या नकाराधिकारामुळे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याच्या कार्यात अडथळा निर्माण होतो, असा आरोप केला जात असला तरीदेखील सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये परिणामकारकपणे भूमिका पार पाडता यावी, तसेच जगातील लहान राष्ट्रांना आक्रमक, हुकूमशाही आणि साम्राज्यवादी राष्ट्रापासून परावृत्त करता यावे, त्याचपद्धतीने आंतराष्ट्रीय क्षेत्रातील राष्ट्रांच्या स्वार्थी प्रवृत्तीला नियंत्रणात ठेवता यावे, जगाला दुसऱ्या महायुद्धापासून वाचवता यावे या उद्देशाने सुरक्षा परिषदेतील सदस्य राष्ट्रांना नकाराधिकार देण्यात आलेला आहे आणि त्याचे समर्थन देखील करण्यात आलेले आहे.

३) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना देण्यात आलेल्या नकाराधिकारामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेत लोकशाही व्यवस्था मजबूत होण्यास मदत झालेली आहे. कारण कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे या राष्ट्रांना मुक्तपणे आणि स्वतंत्रपणे आपले मत सुरक्षा परिषदेमध्ये नोंदवण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे.

४) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकाराच्या व्यवस्थेमुळे गुप्त राजनयाऐवजी खुल्या राजनय पद्धतीचा स्विकार करण्यात आलेला असल्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला अनुकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे.

५) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये एकाधिकारशाही निर्माण होण्याऐवजी सत्ता संतुलन निर्माण झालेले आहे. या सत्ता संतुलनामुळे जागतिक युद्धाची शक्यता बऱ्याच अंशी कमी झालेली आहे.

६) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अस्तित्वासाठी सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्य राष्ट्रांना नकाराधिकार असणे महत्त्वाचे मानले जाते. कारण जर या बड्या शक्तिशाली राष्ट्रांना नकाराधिकार दिला नसता, तर या बड्या राष्ट्रांनी इतर मार्गांनी आपले आणि आपल्या गटाचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला असता आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता अधिक होती.

७) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना दिलेल्या नकाराधिकारामुळेच संयुक्त राष्ट्र संघटनेला आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांती कार्यात, संघर्ष निवारणात तसेच विविध समस्या व प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडता आली. नकाराधिकाराशिवाय कायम सदस्य राष्ट्रांनी अशी भूमिका पार पाडण्यात निश्चितच

प्रयत्न केला नसता आणि त्यामुळे वैयक्तिक हितसंबंधांसाठी या राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर गटबाजी केली असती, परिणामी ही गटबाजी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोकादायक ठरली असती.

८) जगातील बड्या राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळेच ही राष्ट्रे संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य राहिलेली आहेत. जर अशा बड्या राष्ट्रांना सुरक्षा परिषदेचा नकाराधिकार मिळाला नसता, तर कदाचित ही बडी राष्ट्रे संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य राहिली नसती, परिणामी बड्या राष्ट्रांच्या अभावी संयुक्त राष्ट्र संघटना प्रभावी ठरली नसती.

९) राष्ट्र संघाप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटना प्रभावहीन ठरू नये, म्हणून पाच बड्या शक्तींच्या नकाराधिकाराची समर्थन केले जाते.

### २.५.४.२ नकाराधिकाराचा विरोध:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये पाच बड्या राष्ट्रांना देण्यात आलेल्या नकाराधिकाराचा विरोध खालील कारणांमुळे केला जातो;

१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्र स्वतःचे आंतरराष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी नकाराधिकाराचा उपयोग करीत असतात. त्यामुळे अनेक महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भामध्ये सुरक्षा परिषद निष्क्रिय ठरलेली अनेकवेळा दिसून आलेली आहे. त्यामुळे बड्या राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकाराचा विरोध केला जातो.

२) सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेत कायम सदस्य राष्ट्र आणि अस्थायी सदस्य राष्ट्र असा भेदभाव केला जात असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर विषमता निर्माण झालेली आहे. त्यामुळे बड्या शक्तींना प्राप्त असणाऱ्या नकाराधिकाराचा विरोध केला जातो.

३) सुरक्षा परिषदेतील पाच बड्या आणि कायम सदस्य राष्ट्रांनी स्वहितासाठी म्हणजेच स्वार्थासाठी नकाराधिकाराचा वापर केल्याचे अनेकवेळा सिद्ध झालेले आहे. या बड्या राष्ट्रांनी नकाराधिकाराचा वापर करून आपले प्रभुत्व आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामुळे नकाराधिकाराचा विरोध करण्यात येतो.

४) सुरक्षा परिषदेची कायम सदस्य राष्ट्र त्यांना प्राप्त झालेल्या नकाराधिकाराचा वापर वेळोवेळी करत असल्यामुळे सुरक्षा परिषदेच्या कार्यामध्ये अडथळे निर्माण होतात. त्यामुळे सुरक्षा परिषदेकडून अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्न व समस्यांची सोडवणूक केली जाऊ शकत नाही, त्यामुळे देखील बड्या राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारास विरोध केला जातो.

५) सुरक्षा परिषदेतील कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राष्ट्रांची सामूहिक सुरक्षितता धोक्यात आलेली आहे, तसेच सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वावरील राष्ट्रांची आस्थादेखील कमी होत आहे.

६) सुरक्षा परिषदेतील पाच बड्या सदस्य राष्ट्रांनी नकाराधिकाराचा वापर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी करावा, अशी अपेक्षा असते, मात्र वास्तवात या बड्या स्थायी सदस्य राष्ट्रांनी नकाराधिकाराचा वापर परस्परांवर कुरघोडी करण्यासाठी केल्याचे अनेकवेळा निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेची सुरक्षा परिषद ही संघटना शीतयुद्धाचे मैदान झालेली आहे.

(७) सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्य राष्ट्रांनी नकाराधिकाराचा वापर स्वःतहिताबरोबरच आपल्या मित्र राष्ट्रांच्या हितासाठी तसेच त्यांना संरक्षण प्राप्त व्हावे यासाठी अनेकवेळा केलेला आहे. त्यामुळे भेदभावाची भावना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात या नकाराधिकारामुळे निर्माण झालेली आहे.

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेमध्ये जगातील पाच बड्या शक्तींना कायम सदस्यत्व बहाल करून दिलेल्या नकाराधिकाराचे समर्थन तसेच विरोध देखील अनेक अंगांनी केला जातो, परंतु आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या संदर्भात संयुक्त राष्ट्र संघटनेची वास्तव भूमिका फलद्रूप होण्यासाठी वास्तवात नकाराधिकाराच्या संदर्भात काही सुधारणा होणे आवश्यक आहे.

### २.५.५ सुरक्षा परिषदेची भूमिका:-

संयुक्त राष्ट्र संघटनेची कार्यकारी सत्ता आणि अधिकार सुरक्षा परिषदेच्या हाती असतात. म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध समस्या किंवा प्रश्न सुटणे अथवा न सुटणे हे सर्वस्वी सुरक्षा परिषदेच्या भूमिकेवर अवलंबून असते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्याची जबाबदारी सुरक्षा परिषदेवर असते म्हणून आंतरराष्ट्रीय संबंध तसेच राजकारणामध्ये सुरक्षा परिषदेच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. सुरक्षा परिषदेच्या एकूण भूमिकेवरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्याचे यशापयश अवलंबून असते. परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणातील बड्या राष्ट्रांमध्ये असलेले मतभेद, परस्पर अविश्वास तसेच सुरक्षा परिषदेतील पाच बड्या राष्ट्रांना मिळालेला नकाराधिकार यामुळे सुरक्षा परिषदेला विविध आंतरराष्ट्रीय प्रश्न समाधानकारकपणे सोडविता आलेले नाहीत. कारण पाच बड्या राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकारामुळे या राष्ट्रांनी स्वतःचे हितसंबंध किंवा मित्र राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित ठेवलेले आहेत. त्यामुळे सुरक्षा परिषद दुबळी होत आहे.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी सुरक्षा परिषदेतील पाच बड्या कायम सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेल्या नकाराधिकाराचा वापर स्वहीत किंवा स्वगटातील राष्ट्रहितासाठी होऊ लागल्यामुळे तसेच दुहेरी स्वरूपामध्ये नकाराधिकाराचा वापर झाल्यामुळे सुरक्षा समिती कारवाई करण्यात अपयशी ठरत आहे. प्राथमिक स्तरावर वापरण्यात येणारा नकाराधिकार आणि प्रस्तावावरील चर्चेच्यावेळी वापरण्यात येणारा नकाराधिकार असा दुहेरी स्वरूपाचा नकाराधिकार पाच बड्या सदस्य राष्ट्रांना प्राप्त झालेला आहे. पर्यायाने अशा दुहेरी नकाराधिकारामुळे सुरक्षा परिषदेला आपली भूमिका प्रभावीपणे बजावता आलेली नाही. १९६५ मध्ये सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्य राष्ट्रांची संख्या वाढवण्यात आलेली असली तरीदेखील संयुक्त राष्ट्रसंघाच्या लहान सदस्य राष्ट्रांना सुरक्षा परिषदेमध्ये कार्य करण्याची संधी खूप कमी वेळा मिळालेली आहे. ६० पेक्षा अधिक लहान सदस्य राष्ट्रांना सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व अद्यापपर्यंत मिळालेले नाही.

म्हणून ही सदस्यसंख्या वाढविण्यासाठी तसेच लहान सदस्य राष्ट्रांना सुरक्षा परिषदेचे सदस्यत्व देणे यासाठी सुरक्षा परिषदेवर आणि महासभेवर मोठा दबाव निर्माण झालेला आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध प्रश्न सोडवत असताना कोणते प्रश्न राष्ट्रीय आणि कोणते प्रश्न आंतरराष्ट्रीय संदर्भातील आहेत यावर आंतरराष्ट्रीय न्यायालय निर्णय देताना असमर्थ ठरलेले आहे. त्यामुळे सुरक्षा परिषदेलादेखील संबंधित प्रश्न हे राष्ट्रीय आहेत की, आंतरराष्ट्रीय हे ठरविण्यात समस्या निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेनुसार सुरक्षा परिषदेला कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात किंवा प्रश्नात हस्तक्षेप करण्याचा अधिकार तोपर्यंत प्राप्त होत नाही, जोपर्यंत संबंधित राष्ट्र सुरक्षा परिषदेकडे तो प्रश्न ठेवत नाही. थोडक्यात जोपर्यंत सुरक्षा परिषदेसमोर प्रश्न व समस्या मांडली जात नाही, तोपर्यंत सुरक्षा परिषदेला कोणतीही कारवाई करता येत नाही. थोडक्यात बड्या शक्तींना प्राप्त झालेला नकाराधिकार, संयुक्त राष्ट्र संघटनेची घटनात्मक बंधने, प्रश्नाचे स्वरूप राष्ट्रीय की आंतरराष्ट्रीय हे ठरवणे कठीण, गटबाजीचे राजकारण तसेच इतर काही कारणांमुळे सुरक्षा परिषदेला समाधानकारकपणे आपली भूमिका पार पाडता आलेली नाही. मात्र असे असले तरीदेखील आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुरक्षा परिषदेच्या कार्यात आणि भूमिकेत काही उणिवा असल्या तरीदेखील आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेच्या संदर्भात सुरक्षा परिषदेचे महत्त्व नाकारता येत नाही.

- **सारांश:-**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता यासंदर्भातील सुरक्षा परिषदेची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. सुरक्षा परिषद ही संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्यकारी मंडळ असून या परिषदेला प्राप्त असणाऱ्या अधिकारामुळे या परिषदेला आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्त्व प्राप्त झालेले आहे. परंतु सुरक्षा परिषदेतील पाच बड्या कायम सदस्य राष्ट्रांना देण्यात आलेल्या नकाराधिकारामुळे आंतरराष्ट्रीय प्रश्न वा समस्या सोडविण्यामध्ये सुरक्षा परिषदेला समाधानकारकपणे भूमिका बजावणे शक्य होत नाही, कारण अंतर्गत गटबाजीचे राजकारण, बड्या शक्तींचे स्वहित आणि स्वगटाचे हीत याला अनुसरून करण्यात येणाऱ्या राजकारणामुळे सुरक्षा परिषद प्रश्न सोडवण्यामध्ये आणि आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यामध्ये समाधानकारक काम करू शकलेली नाही.

- **आपली प्रगती तपासा.**

१) सुरक्षा परिषदेचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

२) सुरक्षा परिषदेच्या नकाराधिकाराविषयी सविस्तर लिहा.

३) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेमधील सुरक्षा परिषदेची भूमिका स्पष्ट करा.

## २.६ आंतरराष्ट्रीय न्यायालय (International Court of Justice):-

आंतरराष्ट्रीय न्यायालय हे एक संयुक्त राष्ट्र संघटनेचे प्रमुख अंग असून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अधिपत्याखाली कार्य करीत असते. संयुक्त राष्ट्र संघटनेअंतर्गत कार्य करणारी आंतरराष्ट्रीय न्यायालय ही एक कायमस्वरूपी आणि महत्त्वपूर्ण घटक संस्था आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची एक स्वतंत्र घटना असून या घटनेनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्य चालते. पहिल्या जागतिक महायुद्धानंतर राष्ट्र संघाअंतर्गत आंतरराष्ट्रीय न्यायालयाची निर्मिती करण्यात आलेले होती, परंतु हे न्यायालय राष्ट्र संघाचा घटक अंग म्हणून कार्य करीत नव्हते, तर तेव्हा ती एक स्वायत्त संस्था होती, परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर स्थापन करण्यात आलेले आंतरराष्ट्रीय न्यायालय हे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आधिपत्याखाली कार्य करते.

### २.६.१ आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना:-

प्रथम महायुद्धाच्या समाप्तीनंतर राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्षांचे निवारण करण्यासाठी राष्ट्र संघाअंतर्गत कार्य करणाऱ्या न्यायालयाची निर्मिती करण्यात आलेली होती, परंतु ते न्यायालय राष्ट्र संघाच्या अधिपत्याखाली कार्य करीत नव्हते, तर ती एक स्वायत्त संस्था होती. म्हणून राष्ट्रा-राष्ट्रातील प्रश्नांचे संघर्ष निवारण करण्यात या न्यायालयाला फारसे यश आलेले नव्हते. हा अनुभव विचारात घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन केले जावे, अशा प्रकारचा प्रस्ताव डंबार्टन ओक्स परिषदेमध्ये विचारार्थ ठेवण्यात आलेला होता. त्याचप्रमाणे १९४५ मध्ये झालेल्या याल्टा परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेली घटना तयार करण्यासंदर्भात पावले उचलण्यात आली. तयार करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेसंदर्भात १९४५ मध्ये सॅनफ्रान्सिस्को येथे झालेल्या परिषदेमध्ये चर्चा करण्यात येऊन उपस्थित असलेल्या सदस्य राष्ट्रांची मान्यता मिळविण्यात आली आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयाची निर्मिती करण्यासंदर्भात शिक्कामोर्तब करण्यात आले. यानुसार १८ एप्रिल १९४६ रोजी आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मुख्यालय नेदरलॅंडमधील हेग याठिकाणी आहे.

### २.६.२ आंतरराष्ट्रीय न्यायालयाची रचना:-

आंतरराष्ट्रीय न्यायालयामध्ये १५ न्यायाधीशांचा समावेश होता, परंतु अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढवून ती १६ करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड ही स्वतंत्रपणे संयुक्त राष्ट्र संघटनेची आमसभा आणि सुरक्षा परिषदेकडून एकाचवेळी केली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांचा कार्यकाल हा ९ वर्षांचा असतो, कारण दर ३ वर्षांनी १/३ न्यायाधीश निवृत्त होतात आणि तेवढ्याच न्यायाधीशांची नव्याने निवड केली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील निवड झालेल्या न्यायाधीशांमधून एका न्यायाधीशांची निवड अध्यक्ष म्हणून, तर एका न्यायाधीशांची निवड उपाध्यक्ष म्हणून केली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा कार्यकाल प्रत्येकी ३ वर्षांचा असतो. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कामकाज चालवण्यासाठी १६ पैकी किमान ९ न्यायाधीश उपस्थित असणे आवश्यक आहे. म्हणजेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाची ९ ही गणसंख्या

आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या कामकाजाची फ्रेंच आणि इंग्रजी ही अधिकृत भाषा आहे, परंतु एखाद्या राष्ट्राने आपली बाजू स्वतःच्या राष्ट्रभाषेतून मांडण्याची विनंती केल्यास त्या देशाला राष्ट्रभाषेतून आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयात एका राष्ट्रातून एकावेळी केवळ एकच व्यक्ती न्यायाधीश म्हणून निवडली जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशांची निवड करताना सुरक्षा परिषदेच्या कायम सदस्य राष्ट्राचे प्रत्येकी एक सदस्य न्यायाधीशपदी निवडले जातात. १९८५ ते १९८८ या कार्यकाळात भारताचे श्री नागेंद्र सिंग हे आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीश होते. तसेच २०१२ मध्ये भारताचे श्री दलवीर भंडारी यांनीदेखील आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून कार्य केलेले आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालयातील निवृत्त होणाऱ्या न्यायाधीशांना त्याच पदावर पुन्हा निवडले जाऊ शकते. प्रत्येक देशातील सर्वोच्च न्यायाधीशासाठी जी पात्रता आवश्यक असते, ती पात्रता आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायाधीशांची असणे आवश्यक असते. संयुक्त राष्ट्र संघटनेची सर्व सदस्य राष्ट्रे ही आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्य असतात. परंतु जी राष्ट्र संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य राष्ट्र नाहीत, अशा राष्ट्रांनादेखील आमसभा आणि सुरक्षा परिषदेने निश्चित केलेल्या अटीनुसार आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्यत्व स्विकारता येते.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्राला आपले प्रश्न, संघर्ष किंवा समस्या आंतरराष्ट्रीय न्यायालयातून सोडवून घेणे बंधनकारक नसले, तरी जेव्हा संबंधित राष्ट्र आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला दाखल करते, तेव्हा न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य करणे संबंधित राष्ट्राला बंधनकारक असते. आंतरराष्ट्रीय न्यायालयात राष्ट्रांशी संबंधित खटले चालवले जातात. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय हा त्या खटल्याशी संबंधित राष्ट्रावरच बंधनकारक असतो. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय हा अंतिम स्वरूपाचा असल्यामुळे त्या निर्णयाच्या विरोधात अन्य दुसरीकडे कुठेही दाद मागता येत नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पालन जर संबंधित राष्ट्राकडून होत नसेल, तर अशावेळी ही बाब सुरक्षा परिषदेच्या लक्षात आणून दिल्यानंतर सुरक्षा परिषद त्या राष्ट्रावर कोणती कारवाई करायची याचा निर्णय घेत असते. थोडक्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठीची स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात आलेली नाही किंवा तशी नोंद आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेत करण्यात आलेली नाही. त्यामुळे सुरक्षा परिषद त्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेतील कलम ९४(२) नुसार कारवाई करीत असते.

आंतरराष्ट्रीय न्यायालयातील निर्णय हे बहुमताच्या तत्त्वावर घेण्यात येतात. आंतरराष्ट्रीय खटल्याचा निवाडा करीत असताना आंतरराष्ट्रीय न्यायालय सर्व निवाडे हे साध्या बहुमताने घेत असते. जेव्हा एखाद्या निवाड्यामध्ये समर्थनार्थ आणि विरोधात मतांची बरोबरी होत असते, अशावेळी आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या अध्यक्षांचे मत निर्णायक मत (Casting Vote) म्हणून स्विकारले जाते. आंतरराष्ट्रीय न्यायालय हे केवळ राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष सोडविण्याचे कार्य करते, त्यामुळे कोणतीही व्यक्ती या न्यायालयाचा सदस्य बनू शकत नाही किंवा कोणत्याही व्यक्तीवर या आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटला दाखल करता येत नाही.

### २.६.३ आंतरराष्ट्रीय न्यायालयाची उद्दिष्टे:-

१८ एप्रिल १९४६ रोजी विशिष्ट उद्देशानुसार संयुक्त राष्ट्र संघटनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची उद्दिष्टे ही संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांना पूरक आहेत. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत;

१) संयुक्त राष्ट्र संघटनेपुढे येणारे कायदेशीर प्रश्न सोडवणे.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी मांडलेले प्रश्न व समस्या सोडवणे.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभा आणि सुरक्षा परिषद या घटक अंगांनी सल्ला मागितल्यास त्यांना तो सल्ला देणे.

### २.६.४ आंतरराष्ट्रीय न्यायालयाची वैशिष्ट्ये:-

आंतरराष्ट्रीय न्यायालय ही संयुक्त राष्ट्र संघटनेची एक महत्त्वाची घटक संस्था असून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमधील विविध प्रश्न वा समस्या सोडविण्यासंदर्भात या न्यायालयाची भूमिका महत्त्वाची असते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या उद्दिष्टांच्या चौकटीत राहून कार्य करणाऱ्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत;

**१) अंतिम न्यायालय:-**

राष्ट्रा-ष्ट्रामधील विविध प्रश्न व समस्यांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय हा अंतिम स्वरूपाचा असतो, कारण आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात कोणत्याही ठिकाणी दाद मागण्याची व्यवस्था नाही, म्हणून आंतरराष्ट्रीय न्यायालय हे अंतिम न्यायालय आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे काटेकोरपणे पालन करणे हे संबंधित राष्ट्रावर बंधनकारक असते, परंतु जर एखादे राष्ट्र आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पालन करीत नसेल, तर अशावेळी संयुक्त राष्ट्र संघटनेची सुरक्षा परिषद याठिकाणी हस्तक्षेप करीत असते. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे पालन संबंधित राष्ट्र करीत नसल्यास ही बाब सुरक्षा परिषदेच्या लक्षात आणून दिल्यानंतर सुरक्षा परिषद संबंधित राष्ट्रांवर करावयाच्या कारवाईसंदर्भात निर्णय घेत असते. थोडक्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय हा अंतिम स्वरूपाचा असल्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालय हे अंतिम न्यायालय आहे.

**२) निर्णयाची बंधनकारकता:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये निर्माण झालेले प्रश्न किंवा समस्येसंदर्भात जेव्हा संबंधित राष्ट्र आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे खटला दाखल करीत असते, तेव्हा त्या खटल्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य करणे, हे संबंधित राष्ट्रावर बंधनकारक असते. निर्णयाशी संबंधित राष्ट्र वगळता आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय इतर राष्ट्रांवर मात्र बंधनकारक नसतो.

**३) आंतरराष्ट्रीय कायद्याचा अर्थ लावणे:-**

आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या घटनेतील कलम ३६ नुसार आंतरराष्ट्रीय कायद्यांचा अर्थ लावण्याचा अंतिम अधिकार हा आंतरराष्ट्रीय न्यायालयाला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यांशी संबंधित प्रश्न किंवा समस्यांच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालय आंतरराष्ट्रीय कायद्यातील तरतुदींचा अर्थ लावत असते.

**४) केवळ राष्ट्रांवरील खटल्यांची सुनावणी:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रा-राष्ट्रामध्ये असणारे विविध प्रश्न किंवा समस्यांच्या संदर्भातील खटले आंतरराष्ट्रीय न्यायालयात दाखल केले जातात. म्हणजेच आंतरराष्ट्रीय न्यायालयात केवळ राष्ट्रांवर खटले दाखल करता येऊ शकतात, मात्र व्यक्तींवरील खटले दाखल करता येत नाहीत. कारण आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे सदस्यत्व केवळ राष्ट्रांना मिळत असते, मात्र व्यक्तीला सदस्यत्व मिळत नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना राष्ट्रा-राष्ट्रांमधील प्रश्न सोडवण्यासाठी झालेली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय न्यायालयात राष्ट्रावरील खटल्यांची सुनावणी होत असते.

**५) निर्णयाच्या अंमलबजावणीची यंत्रणा नाही:-**

आंतरराष्ट्रीय न्यायालयाने विविध प्रश्न वा समस्यांच्या संदर्भामध्ये दिलेला निर्णय हा संबंधित राष्ट्रावर बंधनकारक असतो. परंतु आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय जर एखादे संबंधित राष्ट्र अंमलात आणत नसेल, तर त्या राष्ट्राविरुद्ध निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायालयाची कोणतीही स्वतंत्र व्यवस्था किंवा यंत्रणा निर्माण करण्यात आलेली नाही किंवा यासंदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाला कोणताही अधिकार देण्यात आलेला नाही. पर्यायाने आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये ही उणीव दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये एखादे राष्ट्र आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करीत नसल्यास तसे सुरक्षा परिषदेच्या निदर्शनास आणून दिल्यास सुरक्षा परिषद त्या राष्ट्राविरोधात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेतील कलम ९४ (२) नुसार कारवाई करते.

**२.६.५आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिकार व कार्य:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील तत्त्वानुसार राष्ट्रांमधील विविध प्रश्न किंवा समस्यांच्या संदर्भातील दाखल करण्यात आलेल्या खटल्यांच्या संदर्भामध्ये महत्त्वाचे अधिकार आंतरराष्ट्रीय न्यायालयाला प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार आंतरराष्ट्रीय न्यायालय खालील कार्य करते;

**१) कायदेशीर प्रश्न सोडवणे:-**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेपुढे येणारे विविध कायदेशीर प्रश्न सोडविण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालय करते.

आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या संदर्भात सुयोग्य मार्ग काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय न्यायालयाची भूमिका महत्त्वाची असते.

**२) राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्षाचे निवारण करणे:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये असणारे विविध प्रश्न किंवा समस्यांचे निवारण करण्याचे प्रमुख कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालय करते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमध्ये असणारे सीमाप्रश्न, नद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न, समुद्री सीमारेषा निर्धारित करण्याची समस्या, राष्ट्रीयत्वाचा प्रश्न, निर्वासितांची समस्या, प्रादेशिक सार्वभोमत्वासंदर्भातील प्रश्न, सैनिक किंवा नागरिकांना ओलिस ठेवण्याचा प्रश्न इ. विविध प्रश्न किंवा समस्यांचे शांततापूर्ण मार्गाने निवारण करण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय न्यायालय करीत असते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांकडून आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे दाखल करण्यात आलेल्या खटल्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालय संघर्ष निवारण करते. तसेच आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला निर्णय त्या खटल्यातील संबंधित राष्ट्रांवरच बंधनकारक असतो, मात्र तो इतर राष्ट्रावर बंधनकारक नसतो.

**३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटक अंगांना सल्ला देणे:-**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभा आणि सुरक्षा परिषद या महत्त्वाच्या घटकांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयाला सल्ला मागितल्यास तो सल्ला देण्याचा अधिकार आंतरराष्ट्रीय न्यायालयाला आहे. आमसभा किंवा सुरक्षा परिषदेने सल्ला देण्याची विनंती केल्यासच आंतरराष्ट्रीय न्यायालय सल्ला देत असते अन्यथा नाही. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेला सल्ला आमसभा किंवा सुरक्षा परिषदेवर मात्र बंधनकारक नसतो. थोडक्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे आमसभा किंवा सुरक्षा परिषदेने मागितलेला सल्ला आंतरराष्ट्रीय न्यायालय देत असते, परंतु न्यायालयाने दिलेल्या सल्ल्याचे पालन करणे हे आमसभा अथवा सुरक्षा परिषदेवर सक्तीचे नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने स्थापना झाल्यापासून विविध प्रश्नांच्या संदर्भात सल्ला दिलेला आहे. उदा. पॅलेस्टाइन प्रदेशातील भिंत बांधण्याचा कायदेशीर परिणाम, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्यत्वासाठी प्रवेश, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सेवेत जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई इ.

**४) आंतरराष्ट्रीय कायद्याचा व करारांचा अर्थ लावणे:-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रा-राष्ट्रांमधील विविध प्रश्न किंवा समस्या सोडवण्यासंदर्भात जे आंतरराष्ट्रीय कायदे किंवा करार निर्माण करण्यात आलेले आहेत, त्या कायद्यातील किंवा करारातील विविध तरतुदींचा अर्थ लावण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून केले जाते. थोडक्यात आंतरराष्ट्रीय कायदे तसेच करारांचा अर्थ लावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडून केले जाते.

### २.६.६ **आंतरराष्ट्रीय न्यायालयाची भूमिका:-**

संयुक्त राष्ट्र संघटनेचे महत्त्वाचे अंग असलेल्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांमधील विविध प्रश्न किंवा समस्या सोडवण्यामध्ये स्थापनेपासून ते

आजपर्यंत म्हणजेच जवळपास गेल्या ७५ वर्षात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेपुढे येणाऱ्या विविध कायदेशीर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तसेच आंतरराष्ट्रीय कायद्यांचा आणि करारांचा अर्थ लावण्यात देखील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषद तसेच आमसभेला अनेकवेळा महत्त्वाच्या मुद्द्यांवर आंतरराष्ट्रीय न्यायालयाने सल्ला दिलेला आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने मागील ७५ वर्षांमध्ये आमसभा आणि सुरक्षा परिषद या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटकांना २४ वेळा महत्त्वपूर्ण विषयांवर सल्ला दिलेला आहे. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर आलेल्या विविध ७६ पेक्षा अधिक खटल्यांमध्ये न्यायनिवाडा करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केलेले आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर येणाऱ्या विविध राष्ट्रा-राष्ट्रातील प्रश्न वा समस्यांमध्ये भूसीमा व समुद्री सीमा निर्धारित करण्यासंदर्भातील वाद, आर्थिक आणि व्यापारी स्वरूपाचे वाद, राष्ट्रीयत्वाचा प्रश्न, आश्रयाचा अधिकार, विम्बल्डन खटला, दादरा नगरहवेलीबाबत पोर्तुगीजांनी दाखल केलेला खटला, कच्छच्या रणाबाबतीतील वाद, बल्गेरिया, हंगेरी आणि रुमानियाच्या तहाच्या स्पष्टीकरणाचा दावा अशा प्रकारच्या प्रश्न वा समस्यांवर न्यायनिवाडा केलेला आहे. आजपर्यंतचा आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या न्यायनिवाड्याचा ईतिहास पाहता अमेरिका आणि कॅनडा, इंग्लंड आणि डेन्मार्क, लिबिया आणि याल्टा या देशांमधील वादग्रस्त प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केलेला आहे. शीतयुद्ध तसेच शीतयुद्धोतर काळात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने काही महत्त्वाच्या जागतिक समस्यांवर महत्त्वपूर्ण निर्णय दिलेले आहेत. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी दिलेल्या निर्णयाबरोबरच आंतरराष्ट्रीय न्यायालयाने मानवी जीवन व संस्कृतीला अनुसरून पर्यावरणाचे संरक्षण, मानवी हक्क व अनुशक्तीच्या शस्त्रास्त्र प्रसारावर मर्यादा इत्यादीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिलेले आहेत. थोडक्यात आंतरराष्ट्रीय न्यायालयाने राष्ट्-राष्ट्रातील वादग्रस्त प्रश्न किंवा समस्या सोडविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने वादग्रस्त प्रश्नांच्या निर्णयामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडलेली असली तरीदेखील आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था अथवा यंत्रणा निर्माण करण्यात आलेली नाही, त्यामुळे यासंदर्भात आंतरराष्ट्रीय न्यायालयाची बाजू अपंग असलेली दिसून येते. कारण आंतरराष्ट्रीय न्यायालयाने दिलेले निर्णय अंमलात आणणारी स्वतंत्र अशी पोलीस किंवा लष्करी यंत्रणा संयुक्त राष्ट्र संघटनेकडे अद्यापतरी अस्तित्वात आलेली नाही.

- **सारांश:-**

आंतरराष्ट्रीय न्यायालय हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे एक महत्त्वाचे घटक अंग असून या न्यायालयाने स्थापनेपासून ते आतापर्यंतच्या ७५ वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रातील महत्त्वाच्या व वादग्रस्त प्रश्न वा समस्या सोडविण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. राष्ट्रा-राष्ट्रामधील संघर्ष सोडविण्यामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटक अंगाना सल्ला देण्यामध्ये, आंतरराष्ट्रीय कायद्यांचा आणि करारांचा अर्थ लावण्यामध्ये, तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेसमोर येणारे विविध कायदेशीर प्रश्न सोडविण्यामध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे.

- **आपली प्रगती तपासा.**

    १) आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना आणि रचनेविषयी सविस्तर लिहा.

    २) आंतरराष्ट्रीय न्यायालयाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

    ३) आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

    ४) आंतरराष्ट्रीय न्यायालयाची भूमिका स्पष्ट करा.

## २.७ संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव (Secretary General):-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्य निश्चित आणि सुसंघटितपने चालण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने एका नियमित कार्यालयाची निर्मिती केलेली आहे, हे कार्यालय संयुक्त राष्ट्र संघटनेचे 'सचिवालय' म्हणून ओळखले जाते. या सचिवालयामार्फत संयुक्त राष्ट्र संघटनेचा दैनंदिन प्रशासकीय कारभार चालविला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयाची स्थापना १९४५ मध्ये करण्यात आलेली असून या सचिवालयाचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे आहे. सचिवालयाला संयुक्त राष्ट्र संघटनेची एक घटक संस्था असा दर्जा देण्यात आलेला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील १५ व्या प्रकरणामध्ये कलम ९७ ते १०१ मध्ये सचिवालयाच्या रचनेसंबंधीच्या तरतुदी केलेल्या आहेत. सचिवालयाच्या प्रमुखास 'महासचिव' असे संबोधले जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ९७ नुसार 'महासचिव' हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे 'प्रमुख प्रशासकीय अधिकारी' असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव हे सचिवालयाचे प्रमुख म्हणून कार्य करीत असतात. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एकूण कार्यावर देखरेख ठेवणे, तसेच कार्यात समन्वय साधण्याचे प्रमुख कार्य सचिवालयामार्फत महासचिव करीत असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयात महासचिवांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी ९ उपमहासचिव, प्रशासकीय अधिकारी, सहाय्यक तसेच विशेषज्ञ आणि सुमारे पाच हजार कर्मचारी वर्ग असतो. सचिवालयातील सर्व कर्मचारी वर्गाची नेमणूक महासचिवाकडून केली जाते, परंतु ही नेमणूक करताना आमसभेने ठरवून दिलेल्या नियमानुसार महासचिव ती करीत असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयात अनेक विभाग निर्माण करण्यात आलेले असून त्या प्रत्येक विभागाचे प्रशासकीय नेतृत्व उपमहासचिवांकडे देण्यात आलेले असते. या सर्व विभागांवर महासचिवांचे नियंत्रण असते. महासचिव हे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयाचे मुख्य समन्वयक असतात. म्हणून समन्वयक या नात्याने सचिवालयाच्या कार्यावर देखरेख ठेवण्याबरोबरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेनुसार निर्धारित केलेली कार्य महासचिवांकडून केली जातात.

### २.७.१ महासचिवांची नेमणूक:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार आमसभेकडून महासचिवांची नेमणूक करण्यात येते. महासचिव पदासाठीच्या उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी सुरक्षा परिषदेची विशेष बैठक बोलावण्यात येत असते. या बैठकीमध्ये महासचिवपदी कोणास नियुक्त करायचे यासंबंधी सुरक्षा परिषदेमधील पाच कायम सदस्य

राष्ट्रांचे एकमत झाल्याशिवाय महासचिवपदी नियुक्त होणाऱ्या नावाची शिफारस सुरक्षा परिषद आमसभेकडे करीत नाही. सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांचे एकमत महासचिव पदाच्या निवडीसंदर्भात होण्यासाठी आतापर्यंतचा इतिहास पाहता हेच स्पष्ट होते की, तटस्थ व्यक्तींची नेमणूक महासचिव या पदावर करण्यात आलेली आहे. महासचिव या पदासाठी सुरक्षा परिषदेने ज्या नावाची शिफारस केलेली असेल ते नाव नाकारण्याचा अधिकार आमसभेला आहे. सुरक्षा परिषदेने शिफारस केलेले नाव आमसभेने नाकारल्यास सुरक्षा परिषद अशावेळी महासचिव पदासाठी नवीन नावाचा विचार करीत असते. आमसभा सुरक्षा परिषदेने महासचिव पदासाठी शिफारस केलेल्या उमेदवाराचे नाव नाकारून स्वतः महासचिव पदासाठी दुसरे नाव सुचवू शकत नाही. कारण महासचिव म्हणून नावाची शिफारस करण्याचा अधिकार हा फक्त सुरक्षा परिषदेलाच आहे. म्हणून सुरक्षा परिषदेकडून महासचिव पदासाठी नावाची शिफारस करण्यात आल्यानंतर आमसभेकडून गुप्त मतदान पद्धतीने महासचिवाची निवड केली जाते. आमसभेमध्ये उपस्थित असणाऱ्या सदस्य राष्ट्रांच्या साध्या बहुमताने महासचिवांची निवड केली जाते. महासचिवांची निवड करण्यासाठी आमसभेच्या विशेष बहुमताची आवश्यकता नसते. महासचिवांचा कार्यकाल ५ वर्षांचा असल्यामुळे आमसभेकडून त्यांची निवड ५ वर्षांसाठी केली जाते. महासचिव पदावर पुनर्नियुक्ती केली जाऊ शकते, परंतु दोन कार्यकालापेक्षा म्हणजेच १० वर्षापेक्षा अधिक कार्यकालासाठी महासचिवाची नियुक्ती करता येत नाही. आमसभा महासचिव पदाचा कार्यकाल वाढवू  शकते, तसा अधिकार आमसभेला देण्यात आलेला आहे. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी इंग्लंडचे ग्लॅडवीन जेब यांची संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्यकारी महासचिव (हंगामी) नेमणूक करण्यात आलेली होती. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयाचे पहिले महासचिव म्हणून नॉर्वेचे ट्रिग्वे ली यांची निवड २ फेब्रुवारी १९४६ रोजी करण्यात आलेली होती. १ जानेवारी २०१७ पासून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिव म्हणून पोर्तुगालचे ऑटीन्यूओ गुड्रेस हे कार्यरत आहेत.

- **संयुक्त राष्ट्र संघटनेचे आजपर्यंत झालेले महासचिव-**

| Sr. No. | Name of the Secretary General | Tenur |
|---|---|---|
| ०१ | Gladwyn Jebb (UK)-Acting | २४th Oct. १९४५ to ०१st Feb. १९४६ |
| ०२ | Trygve Lie (Noeway) | ०२nd Feb. १९४६ to १०th Nov. १९५२ |
| ०३ | Dag Hammrskjold (Sweden) | १०th April १९५३ to १८th Sept. १९६१ |
| ०४ | U Thant (Burma) | ३०th Nov. १९६१ to ३१st Dec. १९७१ |
| ०५ | Kurt Waldheim (Austria) | ०१st Jan. १९७२ to ३१st Dec. १९८१ |
| ०६ | Javier Perer de cwllar (Perm) | ०१st Jan. १९८२ to ३१st Dec. १९९१ |
| ०७ | Boutros Boutros-Ghali (Egypt) | ०१st Jan. १९९२ to ३१st Dec. १९९६ |

| | | |
|---|---|---|
| ०८ | Kofi Annan (Ghana) | ०१st Jan. १९९७ to ३१st Dec. २००६ |
| ०९ | Ban-ki-moon (South Korea) | ०१st Jan. २००७ to ३१st Dec. २०१६ |
| १० | Antonio Guterres (Portugal) | ०१st Jan. २०१७ to Present date |

**२.७.२ महासचिवांचे अधिकार व कार्य:-**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ९७ नुसार सचिवालयाचे 'महासचिव' हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे 'प्रमुख प्रशासकीय अधिकारी' असतात. सचिवालयाचे मुख्य प्रशासकीय अधिकारी या नात्याने महासचिवांचे कार्यक्षेत्र व्यापक बनलेले आहे. महासचिव हे सचिवालयाचे ‘मुख्य समन्वयक’ असतात. सचिवालयाच्या एकूण कार्यावर देखरेख करणे व नियंत्रण ठेवण्याबरोबरच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील निर्धारित केलेली पुढील कार्य महासचिवांकडून पार पाडली जातात;

१) आंतरराष्ट्रीय संघर्षामध्ये राष्ट्रा-राष्ट्रातील तणावाची परिस्थिती निवारण करण्यामध्ये महासचिव मध्यस्थीची भूमिका बजावतात. सचिवालयाच्या मदतीने महासचिव आंतरराष्ट्रीय संघर्षातील उभय पक्षांना राजनयाच्या तसेच वाटाघाटीच्या माध्यमातून संघर्षावर तोडगा काढण्यासाठी मदत करीत असतात. थोडक्यात आंतरराष्ट्रीय संघर्षाचे करण्यामध्ये महासचिवांना मध्यस्थीची भूमिका पार पाडावी लागते.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेने केलेल्या वार्षिक कार्याचा अहवाल आमसभेच्या वार्षिक अधिवेशनात सादर करणे.

३) आमसभेचे अधिवेशन बोलावणे तसेच आमसभेच्या कार्याचा तपशील तयार करणे.

४) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना त्यांच्या कार्यामध्ये मदत करण्यामध्ये सचिवालय आणि सचिवालयाच्या महासचिवांची भूमिका महत्त्वाची असते. थोडक्यात महासचिव संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांना मदत आणि सहकार्य करीत असतात.

५) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने तसेच सुरक्षा परिषदेने घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करणे.

६) संयुक्त राष्ट्र संघटनेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून आमसभेच्या तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटक अंगांच्या होणाऱ्या विविध सभांना उपस्थित राहणे तसेच त्या सभांची व्यवस्था करणे.

७) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेतील कलम ९९ नुसार आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून एखाद्या महत्त्वाचा प्रश्न वा विषय, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहोचवणारी बाब किंवा प्रश्न सुरक्षा परिषदेच्यापुढे आणण्याचा, त्याचप्रमाणे संबंधित समस्या व प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधण्याचा अधिकार महासचिवांना आहे. महासचिवांना प्राप्त असणाऱ्या या अधिकारामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून विविध समस्या किंवा प्रश्न सोडविण्याचा मार्ग मोकळा होत असतो, म्हणून

महासचिवांची भूमिका ही प्रशासकीय नाही, तर अशाप्रसंगी त्यांची राजकीय भूमिकादेखील महत्त्वपूर्ण ठरत असते.

८) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांनी वेळोवेळी केलेल्या विविध सूचनांची दखल घेणे तसेच या सुचना आमसभा आणि सुरक्षा परिषदेकडे पाठवणे.

९) संयुक्त राष्ट्र संघटनेशी संलग्नित सर्व सदस्य राष्ट्रांच्या संदर्भात केलेल्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

१०) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या लहान तसेच मोठ्या सदस्य राष्ट्रांमधील समतोल साधण्याचे कार्य महासचिवांना करावे लागते. या माध्यमातून संयुक्त राष्ट्र संघटनेची आंतरराष्ट्रीय स्तरावरील नि:पक्षपाती प्रतिमा निर्माण करण्यात आणि ती टिकविण्यात महासचिवांची भूमिका महत्त्वाची असते. ही भूमिका पार पाडताना महासचिवांना बलाढ्य व मोठ्या राष्ट्रांचे हितसंबंध न दुखवता लहान राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्र संघटनेवरील विश्वास टिकविण्यासाठी मोठी कसरत करावी लागते.

११) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात एखाद्या ठिकाणी वादग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली असल्यास अशा वादग्रस्त ठिकाणाची पाहणी करणे आणि त्या ठिकाणचा पूर्ण अहवाल आमसभा तसेच सुरक्षा परिषदेला सादर करण्याचे कार्य महासचिवांना करावे लागते.

१२) आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध वाद मिटविण्यात सहकार्य करणे.

१३) आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या संदर्भातील व्यवस्थापन करणे.

१४) विविध महत्त्वपूर्ण विषयांवर आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करणे.

१५) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य राष्ट्रांबरोबर विविध महत्त्वाच्या विषयांवर विचारविनिमय करणे.

१६) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध घटक अंगांनी महासचिव यांच्यावर सोपवलेली जबाबदारी महासचिवांना पूर्ण करावी लागते.

### २.७.३ महासचिवांची भूमिका:-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयाचे 'मुख्य प्रशासकीय अधिकारी' या नात्याने महासचिवांची कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक बनलेले आहे. सचिवालयाचे मुख्य समन्वयक म्हणून संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये महासचिवांचे स्थान आणि भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. महासचिवांना प्राप्त झालेल्या अधिकारामुळे एखाद्या देशाच्या पंतप्रधानाप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ९८ नुसार महासचिव आमसभेला संयुक्त राष्ट्र संघटनेचा वार्षिक अहवाल सादर करत असतात. महासचिव सादर करत असलेल्या अशा अहवालामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेची भविष्यातील दिशा आणि प्रवास निश्चित होत असतो. संयुक्त राष्ट्र संघटनेचे माजी महासचिव बुत्रोस घी यांनी शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या भावी वाटचालीसंबंधी 'An Agenda for Peace' आणि 'An Agenda for Development' असे दोन वार्षिक अहवाल आमसभेला सादर केलेले होते. त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्र संघटनेचे माजी महासचिव कोफी अन्नान यांनी २१व्या शतकात संयुक्त राष्ट्र संघटनेपुढे

आव्हान म्हणून उभ्या राहिलेल्या विविध प्रश्न व समस्यांवरील उपाययोजनांचा सर्वसमावेशक आढावा घेणारा वार्षिक अहवाल आमसभेसमोर २००० मध्ये सादर केला होता. हा अहवाल 'We the People: The Role of United Nations in the २१st Century' या नावाने ओळखला जातो. थोडक्यात अशाप्रकारचे अहवाल आमसभेत सादर करण्यामध्ये महासचिवांची भूमिका महत्त्वपूर्ण असते. राजकीय अभ्यासक मॉर्गेंथा यांच्या मते, संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये महासचिवांना प्राप्त असणाऱ्या अधिकारामुळे त्यांचे स्थान संयुक्त संघटनेमध्ये एखाद्या देशाच्या पंतप्रधानाप्रमाणे निर्माण झालेले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने कारवाई करण्याबाबत जी नवीन जबाबदारी महासचिवांवर टाकलेली आहे, त्यामुळे निश्चितच महासचिवांचे संयुक्त राष्ट्र संघटनेतील महत्त्व आणि भूमिकेला महत्व प्राप्त झालेले आहे. या शिवाय आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यामध्येदेखील महासचिवांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्र संघटनेची सुरक्षा परिषद आणि महासभा या महत्त्वाच्या घटक अंगांनी करावयाची सर्व राजकीय कार्य महासचिवांच्या कार्यालयातून केली जात असल्यामुळे यामध्येदेखील महासचिवांच्या भूमिकेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. महासचिवांना प्राप्त असणारे अधिकार, त्यांची व्यक्तिगत प्रतिष्ठा त्याचप्रमाणे महासचिवांचे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयातील कायम कार्यालयीन अस्तित्व यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्णय आणि कारवाईच्या केंद्रस्थानी महासचिव हे पद आलेले आहे. राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष सोडविण्यात आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. कारण आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी जरी सुरक्षा परिषदेची असली तरी, या कार्यात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांनी आतापर्यंतचा इतिहास पाहता महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे, हे स्पष्ट होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिवांनी राजनय, संघर्षात मध्यस्थी करणे आणि विशिष्ट संघर्षाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधणे या तीन साधनांचा वापर करून संघर्ष व्यवस्थापन करण्यात आणि प्रश्न सोडवण्याचे कार्य करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदेमधील कलम ९९ नुसार महासचिवांनी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्याचा प्रयत्न करताना महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका पोहोचविणाऱ्या विशिष्ट घटनांकडे महासचिव यांनी सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधून अशा घटनांची दखल घेण्यास सुरक्षा परिषदेला भाग पाडलेले आहे. उदा. माजी महासचिव कुर्ट वाल्डेम यांनी इराणच्या प्रश्नाकडे तर डॅग हॅमरशिल्ड यांनी कांगो देशातील परिस्थितीकडे आणि त्यामुळे आफ्रिका खंडातील धोक्यात आलेल्या परिस्थितीकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष वेधलेले आहे.

- **सारांश:-**

  संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सचिवालयाचे 'मुख्य प्रशासकीय अधिकारी' तसेच सचिवालयाचे 'मुख्य समन्वयक' या नात्याने महासचिव या पदाचे महत्त्व वाढलेले आहे. सचिवालयातील महासचिवांमार्फत संयुक्त राष्ट्र संघटनेचा दैनंदिन प्रशासकीय कारभार चालविला जातो. त्याचप्रमाणे सचिवालयाच्या एकूण कार्यावर देखरेख ठेवणे आणि नियंत्रण ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी महासचिवांकडून पार पाडली जाते. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यात तसेच राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष सोडविण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या महासचिव या पदाला महत्त्व प्राप्त झालेले आहे.

राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्षाचे व्यवस्थापन आणि निवारण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका महासचिवांनी आतापर्यंत पार पाडलेली आहे.

- **आपली प्रगती तपासा.**

१) महासचिवाचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेमधील महासचिवाची भूमिका स्पष्ट करा.

३) महासचिवांची नेमणूक यावर निबंध लिहा.

- **अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ:-**


१) Malhotra V. K., International Relations, New Delhi, २००१.

२) Roskin Berry, International Relations: The New World of International Relations, New Delhi, २००२.

३) Bhuinya Niranjan, United Nations Problems and ProspectsCulcutta, १९८०.

४) Palmerr and Parkin's, International elations Culcutta, १९७०.

५) शर्मा प्रभूदत्त, अंतरराष्ट्रीय संघठन, जयपुर, २००३.

६) प्रेमदेव जयप्रकाश, अंतरराष्ट्रीय संघठन, मेरठ, १९९७.

७) सिंहल एस. सी., आंतरराष्ट्रीय राजनीति, आगरा, २००१.

८) वघवा एस., आंतरराष्ट्रीय राजनीति के आधार, नई दिल्ली, २००१.

९) पाटील आर. एन., जागतिक संघटना, पुणे, १९९९.

१०) कदम य.ना., समकालीन आधुनिक जग-१९४५ ते २०००, कोल्हापूर, २००१.

११) पाटील वा. भा., संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, पुणे, २०११.

१२) वसंत रायपूरकर, आंतरराष्ट्रीय संबंध, नागपुर, १९९४.

१३) वराडकर र. घ., आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, नागपूर, १९९१.

१४) बोर्जस जॉन्सन, संयुक्त राष्ट्र आणि इतर आंतरराष्ट्रीय संघटना, पुणे, २०११.

१५) रासम वासंती, खापरे करियप्पा, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण, कोल्हापूर, २००५.

१६) तोडकर बी. डी., भारत आणि जग, पुणे, २०१०.

१७) देवळाणकर शैलेंद्र ,संयुक्त राष्ट्रे, पुणे, २००८.

१८) श्रीराम येरणकर, निवडक संविधाने आणि आंतरराष्ट्रीय संघटना, जळगाव, २०१८.


❄❄❄❄❄❄❄

# ३

# संयुक्तराष्ट्रांची भूमिका

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.३.१ संयुक्त राष्ट्रसंघ व भूमिका

३.३.२ संयुक्त राष्ट्रसंघाचे वेगवेगळे अंग

३.३.३ संयुक्त राष्ट्रसंघाचे वेगवेगळे उपांगे

३.३.४ संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेचे मूल्यांकन

## ३१. उद्दिष्टे

"संयुक्त राष्ट्रांची भूमिका" या घटकाच्या अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. संयुक्त राष्ट्र म्हणजे काय हे सांगता येईल.

२. संयुक्त राष्ट्राच्या भूमिका सांगता येतील.

३. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेचे स्वरूप समजावून सांगता येईल.

४. मानवी हक्क संरक्षण आणि संवर्धन या संदर्भात संयुक्त राष्ट्राची भूमिका सांगता येईल

५. संयुक्त राष्ट्र संघाच्या वेगवेगळ्या उपक्रमांचे स्वरूप समजावून सांगता येईल.

## ३२. प्रस्ताविक

जागतिक राजकारणाचा विचार करता शांतता आणि सुरक्षितता या दोन बाजू अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील ठरताना दिसून येतात. कारण जागतिक पातळीवर झालेली दोन महायुद्ध पाहता जागतिक शांतता आणि सुरक्षितता मोठ्या प्रमाणात भंग झाली होती. दोन्ही महायुद्धात झालेली जीवित आणि वित्तहानी पाहता जागतिक शांतता व सुरक्षिततेचे महत्व जगातील सर्व राष्ट्रांना वाटू लागले.पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय पातळीवर एक संस्था स्थापन करण्यात आली. राष्ट्रसंघाच्या निर्मितीचे श्रेय वुड्रो विल्सन यांना जाते.वुड्रो विल्सन यांनी जगातील शांततेसाठी चौदा कलमी कार्यक्रम हा घोषित केला होता. परंतु राष्ट्रसंघ ही संघटना जगात शांतता निर्माण करण्यासाठी अनेक कारणांनी निष्प्रभ ठरली होती. त्यातूनच संयुक्त राष्ट्रसंघाची दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाच्या जागी देशा-देशांमधील जागतिक शांतता,

सुरक्षितता आणि सहकार्य यांकरिता दि. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापना झाली.आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे,मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन राखण्यासाठी तसेच आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक संघटना आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय विधी, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती, मानवाधिकार या बाबींमध्ये सहकार्य करण्यासाठी कटिबद्ध आहे.

## ३.३. विषय विवेचन

राष्ट्रसंघाचा प्रमुख उद्देश म्हणजे पॅरिस शांतता संमेलनात स्थापन करण्यात आलेली व्यवस्था कायम ठेवणे व शांतता राखण्याच्या संदर्भात ज्या काही संधी असतील त्या संधीचे पालन करणे हा होता. युद्ध थांबवणे व शांततेची स्थापना करणे, आंतरराष्ट्रीय सहकार्य स्थापन करणे, सभासद राज्याचे प्रादेशिक सार्वभौमत्व कायम ठेवून शस्त्र स्पर्धा बंद करून शांततेच्या मार्गाने वाद सोडवण्यावर राष्ट्रसंघाचा भर राहिला असला तरी राष्ट्रसंघात परस्पर सहकार्याच्या ऐवजी परस्परात मतभेद मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. त्यातूनच प्रत्येक राष्ट्र आपल्या सैनिक शक्तीत वाढ करू लागले. वास्तविक पाहता मोठ्या राज्याच्या भांडणात राष्ट्रसंघ हस्तक्षेप करू शकला नाही. राष्ट्रसंघाच्या संविधानामध्ये युद्ध बंद करण्याच्या संदर्भात अधिकृत असे काही नियम नव्हते. अमेरिका रशिया ही शक्तिशाली राष्ट्र राष्ट्रसंघाच्या बाहेर असल्यामुळे राष्ट्रसंघाला शक्तिशाली राष्ट्राची मदत मिळू शकली नाही. एकंदरीतच राष्ट्र संघ अपयशी होण्यामध्ये सभासद राष्ट्राच्या संदिग्ध भूमिका ह्याच त्याच्या अपयशासाठी कारणीभूत ठरल्या. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाच्या काळातच मित्र राष्ट्रांना पुन्हा एकदा नवीन जागतिक संघटनेची गरज भासू लागली. वास्तविक पाहता राष्ट्रसंघ हा अनेक कारणांनी अपयशी ठरल्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झालेली आहे आणि त्याची स्थापना करण्याचे श्रेय अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांना जाते. संयुक्त राष्ट्र संघटनेने जी काही आपली उद्दिष्ट निश्चित केलेली आहेत त्यामध्ये प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय सुरक्षितता व शांतता राखण्यावर भर दिलेला आहे. तसेच सभासद राष्ट्रांमध्ये परस्परात मित्रत्वाचे संबंध जोपासण्याचे काम संयुक्त राष्ट्रसंघाच्या माध्यमातून केल्या जात आहे. सोबतच आंतरराष्ट्रीय पातळीवरील समकालीन सामाजिक आर्थिक समस्यांचे स्वरूप लक्षात घेता आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवी प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रसंघ कटिबद्ध आहे.

### ३.३.१ संयुक्त राष्ट्रसंघ व भूमिका

दुसऱ्या महायुद्धापूर्वीच राष्ट्रसंघ ही संघटना अनेक कारणांनी निष्प्रभ ठरली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या सुरूवातीस (१९३९) इंग्लंड,यूएसएच्या तत्कालीन नेत्यांनी युद्धोत्तर काळातील निर्माण होणाऱ्या समस्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टिकोनातून विचार करण्यास सुरुवात केली होती. रशिया व फ्रान्स या राष्ट्रांचे नेतेही या प्रक्रियेत सहभागी झाले होते. ब्रिटीश पंतप्रधान विन्स्टन चर्चिल आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँक्लिन रूझवेल्ट यांची अटलांटिक महासागरातील एका युद्धनौकेवर दि. १४ ऑगस्ट १९४१ रोजी भेट झाली.रूझवेल्ट यांनी या भेटीत संयुक्त राष्ट्र हा शब्द प्रथम वापरला.त्यामुळे संयुक्त राष्ट्राच्या निर्मितीत अटलांटिक सनद हा प्रमुख टप्पा मानला जातो.

शत्रू-राष्ट्रांविरूद्ध एकत्रित आलेल्या सव्वीस मित्र-राष्ट्रांनी अटलांटिक सनदेला पाठिंबा दर्शविला आणि दि. १ जानेवारी १९४२ ला अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये प्रेसिडेंट रूझवेल्ट, पंतप्रधान विस्टन चर्चिल यांच्या सोबत सोव्हिएट संघ व चीनच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्राच्या घोषणापत्रकावर सह्या केल्या. म्हणजेच दि. १ जानेवारी १९४२ रोजी प्रथमच 'संयुक्त राष्ट्रे' या संस्थेच्या अधिकृत स्थापनेस सहमती दर्शविली गेली होती. या घोषणापत्रकावर सह्या करणाऱ्या राष्ट्रांनी परस्परात सहकार्याने वागण्याची व शत्रुराष्ट्राशी कोणतेही गुप्त करार न करण्याची शपथ घेतली होती. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघाच्या निर्मितीत मास्को संमेलन (३० ऑक्टोंबर १९४३), तेहेरान परिषद (१ डिसेंबर १९४३),डंबार्टन ओक्स संमेलन,याल्टा परिषद (११ फेब्रुवारी १९४५) ही संमेलने आणि परिषदा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तसेच दिनांक २२ एप्रिल १९४५ ते २६ जून १९४५ या कालावधीत सॅनफ्रान्सिस्को येथे एक परिषद भरवण्यात आली या परिषदेत जवळपास ५० राष्ट्र उपस्थित होते. ही परिषद म्हणजे संयुक्त राष्ट्रसंघाच्या संविधान निर्मिती मधली एक महत्त्वाची परिषद मानली जाते. ह्याच परिषदेमध्ये संयुक्त राष्ट्राच्या संविधान निर्मितीचा मसुदा तयार करण्यात आला. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मितीतला शेवटचा टप्पा म्हणून सॅनफ्रान्सिस्को परिषदेकडे पाहिल्या जाते.


शांतता, सन्मान आणि समानता या त्रिसूत्रीच्या आधारावर संयुक्त राष्ट्र संघाची निर्मिती झाली आहे.दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शांतता, सुरक्षितता आणि सहकार्य यांकरिता दि. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झालेली ही आंतरराष्ट्रीय संघटना आहे. या संघटनेचे मुख्यालय न्यूयॉर्क येथे आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाचे १९४५ मध्ये सदस्यत्व स्वीकारलेले मूळ ५१ सदस्य होते.आज संयुक्त राष्ट्रसंघाची सदस्य राष्ट्रांची संख्या १९३ आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या संरचनेचे मुख्य भाग म्हणजे महासभा, सुरक्षा परिषद, आर्थिक आणि सामाजिक परिषद, विश्वस्त परिषद, आंतरराष्ट्रीय न्यायालय, आणि सचिवालय या सर्वांची स्थापना १९४५मध्ये झाली आहे.

**संयुक्त राष्ट्राची सनद (Charter of the united Nations)**

सनदेच्या प्रारंभी उद्देशिका देऊन संयुक्त राष्ट्राच्या सनदेमध्ये एकोणीस प्रकरणे व १११ कलमे आहेत. सध्याची सनद, चिनी, फ्रेंच, रशियन, इंग्रजी आणि स्पॅनिश भाषेमध्ये उपलब्ध आहे.

**यूएन चार्टर:(संयुक्त राष्ट्राची सनद)**



**प्रस्तावना**

प्रकरण I : उद्देश आणि तत्त्वे (कलम 1-2)

प्रकरण II: सदस्यत्व (कलम 3-6)

प्रकरण III: सुरक्षा राष्ट्राचे अंगे( कलम 7-8)

प्रकरण IV: महासभा ( कलम 9-22)

प्रकरण V: सुरक्षा परिषद ( कलम 23-32)

प्रकरण VI: विवादांचे पॅसिफिक सेटलमेंट ( कलम 33-38)

प्रकरण VII: शांततेला धोका, शांततेचा भंग आणि आक्रमकतेच्या कृतींबाबत कृती ( कलम 39-51)

प्रकरण VIII : प्रादेशिक व्यवस्था ( कलम 52-54)

प्रकरण IX: आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि सामाजिक सहकार्य ( कलम 55-60)

प्रकरण X : आर्थिक आणि सामाजिक परिषद ( कलम 61-72)

प्रकरण XI: स्वयं-शासित प्रदेशांबाबत घोषणा ( कलम 73-74)

प्रकरण XII: आंतरराष्ट्रीय विश्वस्त प्रणाली ( कलम 75-85)

प्रकरण XIII: विश्वस्त परिषद ( कलम 86-91)

प्रकरण XIV: आंतरराष्ट्रीय न्यायालय ( कलम 92-96)

प्रकरण XV: सचिवालय ( कलम 97-101)

प्रकरण XVI: विविध तरतुदी ( कलम 102-105)

प्रकरण XVII:संक्रमणकालीन सुरक्षा व्यवस्था ( कलम 106-107)

प्रकरण XVIII: सुधारणा ( कलम 108-109)

प्रकरण XIX:अनुमोदन आणि स्वाक्षरी ( कलम 110-111)

कलम२३,२७,६१,१०९ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

१९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाल्यापासून, संस्थेचे ध्येय आणि कार्याबद्दल चार्टरमध्ये मार्गदर्शन केले गेले आहे. ज्यात १९६३, १९६५ आणि १९७३ मध्ये तीन वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे.

**संयुक्त राष्ट्राच्या सनदेची उद्देशिका:**

संयुक्त राष्ट्राच्या सनदेची सुरुवात 'आम्ही संयुक्त राष्ट्राची जनता' अशा शब्दात करण्यात आलेली आहे.

"संयुक्त राष्ट्राचे आम्ही लोक जगात शांतता स्थापन करण्यासाठी, मानवाच्या प्रतिष्ठेचा व योग्यतेचा आदर राखण्यासाठी, राष्ट्राराष्ट्रात सहकार्य वाढवण्यासाठी, दैनंदिन आर्थिक व सामाजिक जीवन सुधारण्यासाठी प्रयत्न करू असा निश्चय करतो आणि या उद्देशाच्या

पूर्ततेसाठी सहिष्णुतेचे आचरण करून चांगल्या शेजाऱ्याप्रमाणे शांततेने एकत्र राहण्याचे आणि आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी आपले बळ एकटवयाचे आहे, सोबतच सर्वांच्या हितसंबंधाच्या संरक्षणार्थ शस्त्रास्त्राचा वापर करण्याखेरीज इतर वेळी शस्त्र व सैन्याचा वापर कोणीही करणार नाही अशी शाश्वती निर्माण करून देण्याची आणि सर्व लोकांची आर्थिक आणि सामाजिक प्रगती व्हावी यासाठी ही आंतरराष्ट्रीय यंत्रणा उपयोगात आणावयाची आहे."

**संयुक्त राष्ट्राची उद्दिष्टे (भूमिका):**

संयुक्त राष्ट्राच्या चार्टर कलम १ मध्ये पुढील उद्दिष्ट निश्चित करण्यात आली आहेत.

१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी आणि शांततेला धोका निर्माण करणाऱ्या आक्रमक कृत्याना दडपण्यासाठी किंवा शांततेच्या इतर उल्लंघनासाठी प्रभावी सामूहिक उपाययोजना करून शांततापूर्ण मार्गाने उपाय योजना करणे.

२. समान हक्क आणि लोकांच्या आत्मनिर्णयाच्या तत्त्वाच्या आधारावर राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध विकसित करणे आणि सार्वत्रिक शांतता मजबूत करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे.

३. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा मानवी प्रश्नाच्या निराकरनासाठी आणि वंश, लिंग, भाषा किंवा धर्म असा भेद न करता सर्वांसाठी मानवी हक्क आणि मूलभूत स्वातंत्र्यांचा आदर आणि प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

४. या समान उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी संयुक्त राष्ट्रास केंद्र मानून राष्ट्र राष्ट्राच्या व्यवहारांमध्ये सुसंवादीत्व स्थापन करण्यासाठी, राष्ट्रांच्या कृतींमध्ये सामंजस्य साधण्यासाठी संयुक्त राष्ट्रास केंद्र बनवणे.

**संयुक्त राष्ट्राच्या सनदेचे मूलभूत तत्वे:**

कलम २ मध्ये कलम १ मध्ये नमूद केलेल्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ आणि त्याचे त्याचे सदस्य पुढील तत्त्वांनुसार कार्य करतील.

१. संयुक्त राष्ट्राची रचना सर्व सदस्यांच्या सार्वभौम समानतेच्या तत्त्वावर आधारित आहे.

२. सर्व सदस्य राष्ट्रांना सदस्यत्वामुळे मिळणारे हक्क आणि फायदे प्राप्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या कर्तव्याचे पालन करतील.

३. सर्व सदस्य राष्ट्रांनी आपले आंतरराष्ट्रीय विवाद शांततापूर्ण मार्गाने अशा प्रकारे सोडवले पाहिजेत की ज्याद्वारे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा आणि न्याय धोक्यात येणार नाही.

४. सर्व सदस्य राष्ट्रांनी त्यांच्या आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये कोणत्याही राज्याच्या प्रादेशिक अखंडतेला किंवा राजकीय स्वातंत्र्याविरुद्ध किंवा संयुक्त राष्ट्रांच्या उद्दिष्टांशी विसंगत वर्तन किंवा शक्तीचा वापर करू नये.

५. सर्व सदस्य राष्ट्र संयुक्त राष्ट्र संघाला सध्याच्या सनदेनुसार केलेल्या कोणत्याही कृतीला सहाय्य करतील आणि संयुक्त राष्ट्र संघ प्रतिबंधात्मक कारवाई करत असलेल्या कोणत्याही विरोधक राज्याला सभासद राष्ट्र मदत करणार नाहीत.

६. गैरसभासद राष्ट्र देखील आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याचा प्रयत्न करतील.

७. संयुक्त राष्ट्र संघ सभासद राष्ट्राच्या अंतर्गत व्यवहारांमध्ये हस्तक्षेप करणार नाही परंतु जेव्हा एखादे राष्ट्र आंतरराष्ट्रीय शांतता भंग करीत असेल किंवा आक्रमक कारवाई करत असेल त्यावेळी मात्र संयुक्त राष्ट्र संघ हस्तक्षेप करेल.

**सदस्यत्व मिळवण्यासाठी केल्या जाणाऱ्या कृती:**

संयुक्त राष्ट्र संघटनेचे मूळ सदस्य अशी राज्ये असतील ज्यांनी सॅनफ्रान्सिस्को येथे संयुक्त राष्ट्र संघाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या परिषदेत भाग घेतला असेल किंवा यापूर्वी १ जानेवारी १९४२च्या संयुक्त राष्ट्रांच्या घोषणा पत्रकावर स्वाक्षरी केली असेल तसेच सध्याच्या सनदेवर ज्या राष्ट्रांनी स्वाक्षरी केली असेल त्यानुसार त्याला मान्यता दिली जाईल.

नवीन सदस्यत्व मिळवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाकडे अर्ज करावा लागतो. सुरक्षा समितीतील पाच बड्या राष्ट्रांचे होकारार्थी मत त्यासाठी आवश्यक असते. त्यानंतर हा प्रस्ताव आमसभेकडे पाठवला जातो. आमसभा देखील सदस्यत्व बहाल करू शकते परंतु त्यासाठी आमसभेच्या दोन तृतीयांश बहुमताची गरज असते.तसेच सभासदत्व घेणाऱ्या राष्ट्रास संयुक्त राष्ट्र संघाच्या अटीचे पालन करण्याची तयारी दाखवून ती स्वीकारावी लागते. तसेच सुरक्षा समितीने केलेल्या शिफारशीनुसार आमसभा एखाद्या राष्ट्राचे सभासदत्व काही काळासाठी किंवा कायमस्वरूपी रद्द करू शकते. तसेच सुरक्षा समिती ज्या राष्ट्राविरुद्ध आक्रमक स्वरूपाची कार्यवाही करते त्या राष्ट्राचे सभासदत्व तात्पुरते स्वरूपात रद्द केल्या जाते.

संयुक्त राष्ट्राचे कामकाज पाच भाषा मधून चालते ते म्हणजे चिनी, इंग्रजी, फ्रेंच, रशियन आणि स्पॅनिश.

संयुक्त राष्ट्रांच्या कार्यामध्ये पाच मुख्य क्षेत्रे समाविष्ट आहेत ती पुढील प्रमाणे:

**१. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखणे**

दुसऱ्या महायुद्धाच्या विध्वंसानंतर १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यात आली होती, ज्यामध्ये एक केंद्रीय मुद्दा होता तो म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे. संयुक्त राष्ट्र संघाच्या स्थापनेनंतर संयुक्त राष्ट्र संघ हे संघर्ष रोखण्यासाठी काम करते, संघर्षातील पक्षकार राष्ट्रांना शांतता प्रस्थापित करण्यास

मदत करते, संघर्षग्रस्त प्रदेशात शांततारक्षक तैनात करून आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी परिस्थिती निर्माण करते.

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेची जबाबदारी आहे. जनरल असेंब्ली आणि सेक्रेटरी-जनरल तसेच इतर संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्यालये आणि संस्थांसह प्रमुख, महत्त्वपूर्ण आणि पूरक भूमिका बजावतात.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांतता अभियानांतर्गत केवळ शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठीच प्रयत्न केले जात नाही तर राजकीय प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी, नि:शस्त्रीकरणात मदत करण्यासाठी, संवैधानिक प्रक्रिया आणि निवडणुकांचे संघटन, मानवी हक्कांचे संरक्षण आणि प्रोत्साहन आणि कायद्याचे राज्य पुनर्संचयित करण्यात आणि कायदेशीर राज्याचे अधिकार वाढविण्यास मदत करते. शांतता अभियानाला संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेकडून आदेश प्राप्त होताच शांतता अभियानाची कार्यवाही केली जाते.

## सुरक्षा परिषद

जागतिक शांततेला निर्माण होणारा धोका किंवा एखाद्या राष्ट्राच्या शांततेला बाधा आणणाऱ्या आक्रमक वर्तनाचे अस्तित्व ठरवण्यासाठी सुरक्षा परिषद पुढाकार घेते. सुरक्षा परिषद विवादातील पक्षकारांना शांततेच्या मार्गाने विवाद सोडवण्याचे आवाहन करते आणि समायोजनाच्या पद्धती किंवा समझोत्याच्या अटींची शिफारस करते. संयुक्त राष्ट्रसंघाच्या चार्टरच्या अध्याय VII अंतर्गत, सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्याची अंमलबजावणी व उपाय करू शकते.



**सुरक्षा परिषद फोटो**

**संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा कशी राखते?**

## प्रतिबंधात्मक मुत्सद्दीपणा आणि मध्यस्थी

आंतरराष्ट्रीय राजकारणातील जागतिक संघर्षाच्या स्वरूपाची चर्चा करताना आपल्याला दोन जागतिक महायुद्ध आठवावी लागतात. दोन्ही महायुद्धात झालेली प्रचंड मनुष्यहानी आणि वित्तहानी पाहता मानवी दुःख कमी करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग पाहता प्रथमतः संघर्ष टाळणे हा आहे. त्याचाच विचार करून जागतिक शांतता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून संयुक्त राष्ट्र संघ मुत्सद्देगिरी आणि मध्यस्थीचा वापर करून संघर्ष रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. महासचिवांचे विशेष आणि वैयक्तिक प्रतिनिधी, दूत आणि सल्लागाराच्या माध्यमातूनही शांतता राखण्याचे प्रयत्न केले जातात.

## दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी प्रयत्न

दहशतवादाविरुद्धच्या जागतिक लढ्यात समन्वय साधण्यासाठी संयुक्त राष्ट्रांकडून वेळोवेळी आवाहन केले जात आहे. विशिष्ट दहशतवादी कारवायांशी संबंधित संयुक्त राष्ट्र संघ कार्य प्रणालीच्या चौकटीत आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरुद्ध अठरा सार्वत्रिक साधने स्पष्ट केली गेली आहेत. सप्टेंबर २००६ मध्ये, संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांनी युनायटेड नेशन्स ग्लोबल काउंटर-टेररिझम स्ट्रॅटेजी स्वीकारली आहे.

## नि:शस्त्रीकरण

जनरल असेंब्ली आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या इतर संस्था, निःशस्त्रीकरणाच्या माध्यमातून अण्वस्त्रे आणि इतर मोठ्या प्रमाणावर विनाश करणारी शस्त्रे आणि पारंपारिक शस्त्रांचे संदर्भात वेगवेगळे कायदे करून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी कार्य करतात.

## पश्चिम आफ्रिकेसाठी संयुक्त राष्ट्र संघ कार्यालय

डकार, सेनेगल येथील पश्चिम आफ्रिकेसाठी हे संयुक्त राष्ट्रांचे पहिले प्रादेशिक संघर्ष प्रतिबंध आणि शांतता निर्माण करणारे कार्यालय होते. पश्चिम आफ्रिकेतील शांतता आणि सुरक्षितता साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाचे योगदान वाढवणे आणि पश्चिम आफ्रिकेतील स्थिरतेवर परिणाम करणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी एकात्मिक प्रादेशिक दृष्टिकोनाला प्रोत्साहन देणे हे त्याचे उद्दिष्टे होते.

## संयुक्त राष्ट्रसंघाने प्रदेशानुसार तयार केलेले शांतता अभियान

### आफ्रिका

वेस्टर्न सहारामधील सार्वमतासाठी संयुक्त राष्ट्र मिशन (MINURSO)

युनायटेड नेशन्स मल्टीडायमेंशनल इंटिग्रेटेड स्टॅबिलायझेशन मिशन इन माली (MINUSMA)

मध्य आफ्रिकन रिपब्लिकमध्ये संयुक्त राष्ट्र बहुआयामी एकात्मिक स्थिरीकरण मिशन (MINUSCA)

युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशन स्टॅबिलायझेशन मिशन इन द डीआर काँगो (MONUSCO)

अबेईसाठी संयुक्त राष्ट्र अंतरिम सुरक्षा दल (UNISFA)

दक्षिण सुदानमधील संयुक्त राष्ट्र मिशन (UNMISS)

आशिया आणि पॅसिफिक

भारत आणि पाकिस्तानमधील संयुक्त राष्ट्र लष्करी निरीक्षक गट (UNMOGIP)

युरोप आणि मध्य आशिया

कोसोवोमधील संयुक्त राष्ट्र अंतरिम प्रशासन मिशन (UNMIK)

युनायटेड नेशन्स पीसकीपिंग फोर्स इन सायप्रस (UNFICYP)

**मध्य पूर्व**

युनायटेड नेशन्स डिसेंगेजमेंट ऑब्झर्व्हर फोर्स (UNDOF)

युनायटेड नेशन्स अंतरिम फोर्स इन लेबनॉन (UNIFIL)

युनायटेड नेशन्स ट्रूस पर्यवेक्षण संस्था (UNTSO)

## २. मानवी हक्कांचे रक्षण

संयुक्त राष्ट्राच्या सनदीमध्ये "मानवाधिकार" या शब्दाचा सात वेळा उल्लेख करण्यात आला आहे,ज्यामुळे मानवी हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण हा संघटनेचा मुख्य उद्देश आणि मार्गदर्शक तत्त्व आहे.१९४८ मध्ये मानवी हक्कांच्या घोषणापत्राने मानवी हक्कांना आंतरराष्ट्रीय कायद्याच्या कक्षेत आणणारी तत्त्वे मांडली गेली. तेव्हापासून संयुक्त राष्ट्र संघाने कायदेशीर आणि ऑन-द-ग्राउंड कृती कार्यक्रम आखून मानवी हक्कांचे  संरक्षण केले आहे.

### संयुक्त राष्ट्र संघ मानवाधिकारांची जपणूक आणि संरक्षण कसे देते?

संयुक्त राष्ट्र संघाचे वेगवेगळे अंग मानवी हक्काच्या अनेक समस्यांचे परीक्षण करतात. त्यामध्ये प्रामुख्याने महिलांची प्रगती, मुलांचे संरक्षण, स्थानिक समस्या, निर्वासितांना वागणूक, वर्णद्वेष आणि वांशिक भेदभावाचे निर्मूलन, तसेच महत्त्वाच्या सामाजिक विकासाच्या माध्यमातून मानवी हक्काची जपणूक करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ कटिबद्ध आहे. मानवधिकाराच्या जपणुकीसाठी व संरक्षणासाठी  संयुक्त राष्ट्रसंघाची कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे आहे.

### मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालय Office of the High Commissioner for Human Rights (OHCHR)

मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाचे जिनेव्हा येथे मुख्यालय आहे. तसेच या कार्यालयाचे अनेक प्रादेशिक कार्यालये आहेत. मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाने मानवाधिकारांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यप्रणालीस

जबाबदारी दिलेली आहे. मानवी हक्कांसाठीचे उच्चायुक्त नियमितपणे मानवी हक्कांच्या समस्यांशी संबंधित परिस्थितींवर भाष्य करतात परिस्थितीची चौकशी करतात आणि त्यावरील अहवाल प्रकाशित करतात.

**मानवाधिकार उच्चायुक्त कार्यालयाचे प्रादेशिक कार्यालये**

**आफ्रिका**

चार प्रादेशिक कार्यालय आणि केंद्रांसह आफ्रिकेत कार्यालये आहेत.

**अमेरिका**

न्यूयॉर्क शहरात संपर्क कार्यालय आहे .

दक्षिण अमेरिका प्रादेशिक कार्यालय सॅंटियागो, चिली येथे आहे.

मध्य अमेरिकेसाठी प्रादेशिक कार्यालय पनामा सिटी, पनामा येथे आहे.

**आशिया आणि पॅसिफिक**

सुवा, फिजी येथे पॅसिफिक क्षेत्रीय कार्यालय आहे .

दक्षिण-पूर्व आशियासाठी प्रादेशिक कार्यालय बॅंकॉक, थायलंड येथे आहे.

**युरोप आणि मध्य आशिया**

बेल्जियममध्ये युरोपसाठी प्रादेशिक कार्यालय आणि बिश्केक,किर्गिस्तानमध्ये मध्य आशियासाठी एक प्रादेशिक कार्यालय आहे .

**मध्य पूर्व**

बेरूत, लेबनॉन येथे मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिकेसाठी प्रादेशिक कार्यालय आहे .

**उत्तर आफ्रिका**

उत्तर आफ्रिकेसाठी प्रादेशिक कार्यालय ट्युनिसमध्ये आहे .

**मानवाधिकार परिषद**

२००६ मध्ये स्थापन झालेल्या मानवाधिकार परिषदेची जिनिव्हा येथे बैठक झाली. या परिषदेने मानवी हक्कांसाठी जबाबदार असलेल्या संयुक्त राष्ट्राच्या कमिशन ऑन ह्युमन राइट्सची जागा घेतली आहे.

**मानवी हक्क करार संस्था**

मानवाधिकार करार संस्था या स्वतंत्र तज्ञांच्या समित्या आहेत. ज्या मूलभूत आंतरराष्ट्रीय मानवाधिकार करारांच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवतात. संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांना करारातील नमूद केलेल्या अधिकारांचा उपभोग घेता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्याचे त्यांच्यावर बंधनकारक आहे.

**मानवी हक्क कार्य गट (UNDG) Human Rights Working Group**

मानवी हक्क कार्य गट संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकास प्रणालीमध्ये मानवी हक्कानां मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो.

**महिलांच्या स्थितीबाबत आयोग COMMISSION ON THE STATUS OF WOMEN**

२०१० मध्ये स्थापन झालेल्या कमिशन ऑन द स्टेटस ऑफ वुमन (CSW) ही प्रमुख जागतिक आंतरराष्ट्रीय संस्था आहे जी लैंगिक समानता आणि महिलांच्या प्रगतीसाठी समर्पित आहे.

### ३. मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य

संयुक्त राष्ट्र संघाच्या उद्देशाप्रमाणे "आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा मानवतावादी समस्यांचे निराकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य प्राप्त करणे" हे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टिकोनातून संयुक्त राष्ट्र संघाने आपली सुरुवातीपासून ते आजपर्यंत वाटचाल केलेली आहे. संयुक्त राष्ट्र संघाने दुसऱ्या महायुद्धानंतर उद्‌ध्वस्त झालेल्या युरोप खंडाच्या पुनर्बांधणीसाठी मदत केली आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींमुळे आपत्कालीन परिस्थितीत मानवतावादी मदतीसाठी संयुक्त राष्ट्र संघटना आंतरराष्ट्रीय समुदायावर अवलंबून आहे.

संयुक्त राष्ट्र संघाच्या सचिवालयाचे मानवतावादी व्यवहार समन्वयाचे कार्यालय आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसादांचे समन्वय साधण्यासाठी जबाबदार आहे. गरजूंना जलद आणि कार्यक्षमतेने मदत देण्यासाठी मानवतावादी मदतीसाठी एक समन्वित, प्रणाली-व्यापी दृष्टीकोन आवश्यक आहे. त्यासाठी office of coordination of humanitarian affairs चा आदेश डिसेंबर १९९१ च्या सर्वसाधारण सभेच्या ठराव ४६/१८२ द्वारे नैसर्गिक आपत्तीसाठी गरजूंना जलद व व सुसंगत प्रतिसाद देण्याच्या दृष्टिकोनातून महासचिवांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे असा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

OCHA द्वारे व्यवस्थापित केलेला सेंट्रल इमर्जन्सी रिस्पॉन्स फंड (CERF) हा नैसर्गिक आपत्ती आणि सशस्त्र संघर्षामुळे प्रभावित झालेल्या लोकांसाठी मानवतावादी प्रतिसादाला पाठिंबा देण्यासाठी सर्वात जलद आणि प्रभावी मार्गांपैकी एक आहे.

न्यूयॉर्क येथे मानवतावादी व्यवहाराच्या समन्वयासाठी कार्यालय आहे. तसेच प्रादेशिक आणि देश कार्यालये पश्चिम आणि मध्य आफ्रिका, मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका, आशिया आणि पॅसिफिक, दक्षिणी भागात आहेत आणि पूर्व आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन आणि अनेक देशांमध्ये मानवतावादी सल्लागार संघ कार्यरत आहेत.

**संयुक्त राष्ट्र संघ मानवतावादी मदत वितरित कशा पद्धतीने करते?**

मानवतावादी मदत वितरीत करण्याची प्राथमिक जबाबदारी असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्था पुढील प्रमाणे आहेत.

### संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम,युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP)

युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) नैसर्गिक आपत्ती थांबवण्यासाठी तसेच मदत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून कृती कार्यक्रम तयार करण्याची जबाबदारी युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रामची आहे. जेव्हा आपत्कालीन परिस्थिती उद्भवते, तेव्हा UNDPचे निवासी समन्वयक राष्ट्रीय स्तरावर मदत आणि पुनर्वसन करण्यासाठी समन्वय साधतात.

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाचे (UNDP) मुख्यालय न्यूयॉर्क शहरात आहे.

### संयुक्त राष्ट्र निर्वासित संस्था / युनायटेड नेशन्स रिफ्यूजी एजन्सी (UNHCR)

युएन रेफ्युजी एजन्सी ही (UNHCR) दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर संघर्षामुळे विस्थापित झालेल्या युरोपियन लोकांना मदत करण्यासाठी उदयास आली आहे. या एजन्सीद्वारे निर्वासितांचे संरक्षण करण्यासाठी आणि जगभरातील निर्वासितांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कारवाईचे नेतृत्व आणि समन्वय साधन्याची जबाबदारी पार पाडली जाते.

संयुक्त राष्ट्र निर्वासित संस्थेचे (UNHCR) मुख्यालय जिनिव्हा येथे आहे.

### युनिसेफ,युनायटेड नेशन्स चिल्ड्रन्स फंड (UNICEF)

युनिसेफ वंचित मुले आणि पौगंडावस्थेतील मुलांपर्यंत आणि प्रत्येक मुलाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जगात काम करते. प्रत्येक मुलाच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी युनिसेफ १९० हून अधिक देश आणि प्रदेशांमध्ये कार्य करते.बाल आरोग्य आणि पोषण, सुरक्षित पाणी आणि स्वच्छता, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य निर्माण, माता आणि बाळांसाठी HIV प्रतिबंध आणि उपचार आणि हिंसा आणि शोषणापासून मुले आणि किशोरवयीन मुलांचे संरक्षण यासाठी युनिसेफ काम करते.

युनिसेफचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात आहे.

### जागतिक अन्न कार्यक्रम (WFP)

UNHCR द्वारे निर्वासितासाठी अन्न आणि वाहतुकीसाठी निधी संकलित करून जागतिक अन्न कार्यक्रमातंर्गत (WFP) लाखो लोकांना अन्न पोहचवण्याची जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे.तसेच पूर, पशुधन, रोगाचा प्रादुर्भाव आणि तत्सम आपत्कालीन परिस्थितींनंतर शेतकऱ्यांना पुन्हा उत्पादन घेण्यासाठी जागतिक पातळीवरून मदत करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेला (FAO) मदत केली जाते.

जागतिक अन्न कार्यक्रमाचे (WFP) मुख्यालय रोम, इटली येथे आहे.तसेच संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटनेचे (FAO) मुख्यालय रोम, इटली येथे आहे.

**जागतिक आरोग्य संघटना (WHO)**

जागतिक आरोग्य संघटना (WHO) रोगाच्या प्रादुर्भावापासून निर्माण होणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी व रोगराई घालवण्यासाठी कटिबद्ध असते.तसेच नैसर्गिक आपत्तीच्या काळात निर्माण होणाऱ्या रोगराईच्या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोनातून चांगल्या आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधते.जागतिक आरोग्यविषयक बाबींवर नेतृत्व प्रदान करणे, आरोग्य संशोधन धोरण तयार करणे, आरोग्याचे निकष आणि मानके निश्चित करणे, तसेच प्रत्येक देशांना तांत्रिक सहाय्य प्रदान करणे आणि आरोग्य प्रवाहाचे निरीक्षण आणि मूल्यांकन यासाठी WHO जबाबदार आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचे (WHO) मुख्यालय जिनेव्हा, स्वित्झर्लंड येथे आहे

**४. शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण**

संयुक्त राष्ट्र संघाने २०१५ मध्ये आपले शाश्वत विकास धोरण जाहीर केले आहे.ज्यामध्ये भविष्यातील पिढ्यांसाठी एक विकास मॉडेल देऊन जगातील गरिबी कमी करण्यासाठी आणि सर्वत्र लोकांचे जीवन सुधारण्यासाठी सर्वोत्तम मार्ग प्रदान करते.

बदलत्या हवामानाचा मानवी दृष्टिकोनातून विचार केला तर मानवावर त्याचे गंभीर परिणाम पडताना आपल्याला दिसून येत आहेत.आज जागतिक समुद्राची पातळी वाढत आहे, प्रलयकारी हवामानाच्या घटनांमध्ये भयंकर वाढ होत आहे, जगातील कोणताही देश हवामान बदलाच्या प्रभावापासून सुरक्षित नाही.

त्यासाठी शाश्वत जागतिक अर्थव्यवस्थेची उभारणी केल्यास हवामान बदलास कारणीभूत असणारे हरितगृह वायू उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. या दृष्टीने संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांची पूर्तता करणे आणि २०२५ च्या पॅरिस हवामान करारामध्ये उत्सर्जन कमी करण्याचे लक्ष्य साध्य करण्यावर भर दिला जात आहे

**शाश्वत विकास अजेंडा**

विकसनशील जगातील जवळपास ४० टक्के लोकसंख्या दोन दशकांपूर्वीच अत्यंत गरिबीत जगत होती. तेव्हापासून, जगाने अत्यंत गरिबी निम्म्यावर आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत त्या दृष्टीने संयुक्त राष्ट्रसंघाच्या मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स (MDGs) ने या मोठा हातभार लावला आहे.

MDG चे यश आणि गरिबी निर्मूलनाचे काम पूर्ण करण्याची गरज संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासासाठी महत्त्वाकांक्षी २०३० अजेंडा स्वीकारला आहे ज्यामध्ये गरीबी समाप्त करणे , शून्य भूक, चांगले आरोग्य आणि कल्याण, दर्जेदार शिक्षण,लिंग समानता, स्वच्छ पाणी आणि स्वच्छता, परवडणारी आणि स्वच्छ ऊर्जा, सभ्य काम आणि आर्थिक वाढ,उद्योग, नवकल्पना आणि पायाभूत सुविधा, कमी असमानता,

टिकाऊ शहरे आणि समुदाय, जबाबदार वापर आणि उत्पादन, हवामान क्रिया, पाण्याखालील जीवन, जमिनीवर जीवन, शांतता, न्याय आणि मजबूत संस्था यासाठी शाश्वत विकासाची १७ उद्दिष्टे तयार केलेली आहेत.

संयुक्त राष्ट्रांनी हवामान बदलाच्या वाटाघाटींना पाठिंबा दिला ज्यामुळे पॅरिस करार झाला.पॅरिस कराराचे महत्त्वाचे उद्दिष्ट हे आहे की जागतिक तापमान वाढ पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा २ अंश सेल्सिअसपेक्षा कमी किंवा १.५ अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवून हवामान बदलाच्या धोक्याला जागतिक प्रतिसाद मजबूत करणे. याव्यतिरिक्त, पॅरिस कराराचा उद्देश हवामान बदलाच्या प्रभावांना सामोरे जाण्यासाठी देशांची क्षमता मजबूत करणे हा आहे. तसेच ही उद्दिष्टे गाठण्यासाठी वित्तपुरवठा, नवीन तंत्रज्ञान आणि वर्धित क्षमता-निर्माण करणारे फ्रेमवर्क तयार केले जाईल.

**शाश्वत विकास आणि हवामान कृतीला समर्थन देण्यासाठी काम करणारे प्रमुख कार्यक्रम व संस्था**

शाश्वत विकासासाठी उच्च-स्तरीय राजकीय मंच

High-level Political Forum on Sustainable Development

इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज (IPCC)

Intergovernmental Panel on Climate Change

जागतिक पर्यावरणीय कार्यक्रम UNEP

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम UNDP

युनिसेफ

संयुक्त राष्ट्र निर्वासित संस्था,युनायटेड नेशन्स रिफ्यूजी एजन्सी (UNHCR)

इकॉनॉमिक कमिशन फॉर लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन (ECLAC)

प्रादेशिक सहकार्य आणि एकात्मता साध्य करण्यासाठी

आफ्रिकेसाठी आर्थिक आयोग ECA

युरोपासाठी आर्थिक आयोग ECE

आशिया आणि पॅसिफिकसाठी आर्थिक आणि सामाजिक आयोगाने (ESCAP)

वेस्टर्न एशिया साठी आर्थिक आणि सामाजिक आयोग ESCWA

शाश्वत भविष्य सुनिश्चित करण्यासाठी UNDRR

युनायटेड नेशन्स ऑफिस फॉर पार्टनरशिप (UNOP)

जागतिक हवामान संघटना WMO

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

जागतिक बँक

संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी UNFPA

शाश्वत मानवी वसाहतींच्या विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी UN-HABITAT

जागतिक अन्न कार्यक्रम

संयुक्त राष्ट्राची अन्न व कृषी संघटना

आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

आंतरराष्ट्रीय सागरी संघटना

आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना UNESCO

संयुक्त राष्ट्र औद्योगिक विकास संघटना UNIDO

जागतिक पर्यटण संघटना UNWTO

जागतिक आरोग्य संघटना

जागतिक बौद्धिक संपदा संघटना

संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय प्रादेशिक गुन्हे आणि न्याय संशोधन संस्था UNICRI

शाश्वत विकास आणि हवामान कृतीला समर्थन देण्यासाठी काम करणाऱ्या ह्या प्रमुख संघटना व कार्यक्रम आहेत. तसेच शाश्वत विकास आणि हवामान कृतीला समर्थन देण्यासाठी आणखीही जागतिक पातळीवर काही संघटना आणि कार्यक्रम काम करताना आपल्याला दिसून येतात.

## ५. आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन

आंतरराष्ट्रीय पातळीवरील करार आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्त्रोतांमुळे उद्भवलेल्या बाबींचा विचार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास आणि आदर करणे हे एक महत्त्वाचे कार्य संयुक्त राष्ट्र संघाचे आहे.

न्यायालये, न्यायाधिकरण, बहुपक्षीय करार आणि सुरक्षा परिषद, जे शांतता मोहिमांना मान्यता देऊ शकते, निर्बंध लादू शकते किंवा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका असल्यास बळाचा वापर करण्यास अधिकृत करू शकते. यासाठी संयुक्त राष्ट्र संघाचे सदस्य राष्ट्रे त्यास बांधील आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य न्यायिक अंग हे आंतरराष्ट्रीय न्यायालय (ICJ) आहे. संयुक्त राष्ट्र संघाची ही मुख्य संस्था आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार राज्यांनी सादर केलेल्या कायदेशीर विवादांचे निराकरण करून राज्य राज्यातील वाद सोडवण्याचा प्रयत्न करते. हे न्यायालय १५ न्यायाधीशांचे बनलेले आहे, ज्यांची सर्वसाधारण सभा आणि सुरक्षा परिषदेद्वारे नऊ वर्षांसाठी निवड केली जाते.

### ३.३.२ संयुक्त राष्ट्रसंघाचे वेगवेगळे अंग

**संयुक्त राष्ट्राची आमसभा किंवा महासभा(General Assembly)**

संयुक्त राष्ट्रसंघाची जनरल असेंब्ली (UNGA) ही मुख्य धोरण ठरवणारी संस्था आहे. आमसभेलाच जागतिक संसदही म्हटल्या जाते कारण सर्व सदस्य राष्ट्रांचा समावेश करून, हे संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरमध्ये समाविष्ट असलेल्या आंतरराष्ट्रीय समस्यांच्या संपूर्ण बहुपक्षीय चर्चेसाठी एक अद्वितीय मंच उपलब्ध करून देते. त्यामुळे जागतिक समस्यांच्या बाबतीत जनमताचा दृष्टिकोन आणि वेगवेगळ्या भूमिका स्पष्ट होताना दिसतात त्यामुळे जगाचे भवितव्य ठरवणारी ही संयुक्त राष्ट्र संघाची महत्त्वाची संस्था आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९३ सदस्य राष्ट्रांपैकी प्रत्येकाला समान मत देण्याचा अधिकार आहे. महासभेचे अधिवेशन वर्षातून एकदा नियमितपणे भरवल्या जाते. अधिवेशनाची सुरुवात सप्टेंबरच्या तिसऱ्या मंगळवारी होत असते.दरवर्षी सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीत आणि त्यानंतर आवश्यकतेनुसार आमसभेची बैठक होते.

संयुक्त राष्ट्राची आमसभा संयुक्त राष्ट्रासाठी पुढील महत्त्वाचे निर्णय देखील घेते

- सुरक्षा परिषदेच्या शिफारशीनुसार सरचिटणीसाची नियुक्त करणे
- सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्यांची निवड करणे
- UN बजेट मंजूर करणे

**संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्याची प्राथमिक जबाबदारी सुरक्षा परिषदेची आहे. तसेच आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी आक्रमक राष्ट्राविरुद्ध सामुहिकपणे विरोध करण्याचे काम हे सुरक्षा मंडळाचे प्रमुख कार्य आहे.

सुरुवातीच्या काळात पाच कायम सभासद व सहा अस्थायी सभासद असे एकूण ११ सभासद होते. १९६५च्या घटनादुरुस्तीनंतर संयुक्त राष्ट्राच्या सभासद संख्येत वाढ झाल्यामुळे सुरक्षा मंडळाच्या अस्थायी सदस्यत्वाचे प्रमाण वाढवण्यात आलेले आहे.संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत सध्या एकूण १५ सदस्य आहेत.त्या १५ पैकी चीन,फ्रान्स, सोव्हिएट रशिया, ब्रिटन आणि अमेरिका हे पाच स्थायी सदस्य आहेत.तर सर्वसाधारण सभेद्वारे दोन वर्षांच्या मुदतीसाठी निवडलेले दहा अस्थायी सदस्य त्यांचा कालावधी दोन वर्षाचा असतो. सध्या अल्बेनिया (२०२३),ब्राझील (२०२३),गॅबॉन (२०२३),घाना (२०२३),भारत (२०२२),आयर्लंड (२०२२),केनिया (२०२२),मेक्सिको (२०२२),नॉर्वे (२०२२),संयुक्त अरब अमिराती (२०२३) हे देश अस्थायी सदस्य आहेत.

भारताला सुरक्षा परिषदेत कायम सभासदत्व देण्याच्या बाबतीत मागील अनेक वर्षापासून प्रयत्न चालू आहेत. संयुक्त राष्ट्रातील अनेक राज्यांनी त्याबाबत पाठिंबाही दर्शवलेला आहे. तरीही भारताला कायम सदस्यत्व मिळू शकलेले नाही.

सुरक्षा मंडळाची बैठक आठवड्यातून एकदा होत असते दोन बैठकीतील अंतर १४ दिवसापेक्षा जास्त असू नये असा संकेत आहे.संयुक्त राष्ट्राच्या चार्टर अंतर्गत सर्व सदस्य राष्ट्रे परिषदेच्या निर्णयांचे पालन करण्यास बांधील आहेत.

सुरक्षा मंडळाची महत्त्वपूर्ण अशी एक मतदान पद्धती आहे. या मतदान पद्धतीद्वारे कायम सदस्य राष्ट्रांना सुरक्षा मंडळात नकाराधिकार Veto देण्यात आलेला आहे. सुरक्षा मंडळात विचार विनिमयासाठी व मतदानासाठी येणारे विषय दोन भागात मांडल्या जातात. त्यापैकी साधारण विषयावर पंधरा सभासदांपैकी कोणत्याही नऊ सभासदांच्या अनुकूल मताद्वारे निर्णय घेतला जातो. परंतु महत्त्वाच्या विषयावर पंधरा सभासदांपैकी नऊ जणांचे मत आवश्यक असते. परंतु नऊ सभासदांमधील पाच बड्या राष्ट्रांचे होकारार्थी मत अत्यावश्यक असते. पाच कायम सभासद राष्ट्रापैकी एकाने जरी विरोधी मत नोंदवले तरी ठराव संमत होत नाही. परंतु एखाद्या महत्त्वाच्या विषयावर एखाद्या सभासद राष्ट्राने मतदान करणे वर्ज्य मानले किंवा ते तटस्थ राहिले तर त्याला व्हेटो मानले जात नाही. तसेच सुरक्षा मंडळातील सभासद राष्ट्रापैकी कोणत्याही राष्ट्राचा प्रश्न चर्चेसाठी व मतदानासाठी असेल तर त्या सभासद राष्ट्रात मतदान करता येत नाही, तसेच राष्ट्र कायम सभासद असले तरी त्यास आपला व्हेटोचा अधिकारही वापरता येत नाही.

सुरक्षा मंडळातील नकाराधिकार हा एक वादांकित प्रश्न आहे त्यामुळे राष्ट्रा राष्ट्रांमध्ये श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे भेद निर्माण होताना दिसून येते. त्यामुळे नकाराधिकाराचा अधिकार हा समानतेच्या विरुद्ध आहे त्यामुळे तो नष्ट केला पाहिजे असे अनेक राष्ट्रांचे व समीक्षकांचे मत आहे. नकाराधिकाऱ्यांचा वापर सर्वप्रथम सोव्हिएट संघाद्वारे केला गेला होता.

एकंदरीतच सुरक्षा परिषद शांततेला धोका किंवा आक्रमक कृतीचे अस्तित्व ठरवण्यासाठी पुढाकार घेते. विवादातील प्रश्नांना शांततेच्या मार्गाने सोडवण्याचे आवाहन करते आणि समायोजनाच्या पद्धती किंवा समझोत्याच्या अटींची शिफारस करते. काही प्रकरणांमध्ये, सुरक्षा परिषद निर्बंध लादण्याचा किंवा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी बळाचा वापर करू शकते.

### आर्थिक आणि सामाजिक परिषद

संयुक्त राष्ट्राचा उद्देश केवळ युद्धांना प्रतिबंध करणे हाच नसून संपूर्ण मानव जातीचे रक्षण करण्याची जबाबदारी ही संयुक्त राष्ट्र संघाची आहे. संयुक्त राष्ट्र संघ मानवाचे जीवन सुखी आणि समृद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्या दृष्टिकोनातून आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य विषयक कार्य या परिषदेकडे सोपवण्यात आलेले आहेत.

सुरुवातीच्या काळात महासभेकडून १८ सदस्यांची निवड या परिषदेवर केली जात होती परंतु १९६५ च्या घटनादुरुस्तीप्रमाणे ही संख्या २७ एवढी करण्यात आलेली आहे. २७ सभासदांपैकी नऊ सभासदांची निवड ही दर तीन वर्षांनी महासभा करत असते. आर्थिक आणि सामाजिक परिषदेत प्रत्येक राष्ट्राचा एकावेळी एकच प्रतिनिधी असतो. आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा परिषदेत निर्णय हे साधारण बहुमताने घेतले जातात. आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या वर्षातून कमीत कमी दोन बैठका होणे आवश्यक आहे.

आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या मार्फत मानवी जीवनाचे संरक्षण आणि मानवी मूल्याचे रक्षण केल्या जाते. एकंदरीतच आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या मार्फत जागतिक पातळीवर विविध देशातील दारिद्र्य दूर करणे, मागास राष्ट्रांना तांत्रिक मदत करणे, तसेच मागास राष्ट्राच्या विकासासाठी कृषी, उद्योग व शिक्षणाच्या विकासात मदत करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याची जबाबदारी ही या परिषदेची आहे. आर्थिक आणि सामाजिक मंडळ हे आपल्या उद्देशाच्या पूर्ततेसाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या वेगवेगळ्या उपांगाच्या त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय शेतकरी व अन्न संघटना, आंतरराष्ट्रीय बँक, संयुक्त राष्ट्र शैक्षणिक,वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना, आंतरराष्ट्रीय वित्त आयोग इत्यादींचे सहकार्य घेताना आपल्याला दिसून येते.

## विश्वस्त परिषद

संयुक्त राष्ट्र संघाच्या सनदेने विश्वस्त परिषदेची  स्थापना संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य अंगांपैकी एक म्हणून केली होती.संयुक्त राष्ट्राच्या नियंत्रणाखाली व देखरेखीखाली असलेल्या अविकसित प्रदेशांचा कारभार पाहण्यासाठी विश्वस्त परिषदेची स्थापना करण्यात आलेली आहे.

विश्वस्त प्रदेशाचे पुढील तीन प्रकार पडतात. एक पहिल्या महायुद्धानंतर निर्माण झालेले प्रदेश पहिल्या प्रकारात समाविष्ट होतात. दोन दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शत्रुराष्ट्रापासून दोस्त राष्ट्रांनी जिंकून घेतलेले आहेत असे प्रदेश. तीन स्वतंत्र राष्ट्र असूनही स्वखुशीने विश्वस्त मंडळाकडे त्या प्रदेशाच्या विकासासाठी देण्यात आलेल्या प्रदेशाचा समावेश विश्वस्त प्रदेशांमध्ये होतो.

वरील तीनही प्रकारच्या प्रदेशांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक उन्नती करण्यासाठी या प्रदेशांना विश्वस्त मंडळाकडे सोपवण्यात आलेले आहे.या प्रदेशांना स्वशासन करण्यायोग्य बनवणे हा विश्वस्त पद्धतीचा उद्देश असून त्यामध्ये भाषा, धर्म, वंश, हा भेद न बाळगता त्या ठिकाणच्या लोकांना मानवी हक्क व मूलभूत अधिकार उपलब्ध करून देऊन त्या भागातील मागास लोकांना न्याय वागणूक मिळेल याची दखल विश्वस्त परिषदेमार्फत घेतल्या जाते.

## आंतरराष्ट्रीय न्यायालय

आंतरराष्ट्रीय न्यायालय (ICJ) हे संयुक्त राष्ट्राचे प्रमुख न्यायिक अंग आहे. संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरद्वारे जून १९४५ मध्ये त्याची स्थापना झाली आणि एप्रिल १९४६ मध्ये काम सुरू केले.

न्यायालयाचे मुख्यालय हेग (नेदरलँड) येथे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सहा प्रमुख अंगापैकी न्यूयॉर्क मध्ये नसलेले हे  संयुक्त राष्ट्राचे महत्त्वाचे आहे.

न्यायालयाची भूमिका आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार, वेगवेगळ्या देशांनी  सादर केलेल्या कायदेशीर विवादांचे निराकरण करणे आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिकृत वेगवेगळ्या अंगाच्या संदर्भित कायदेशीर प्रश्नांवर सल्लागार मते देणे आहे.

आंतरराष्ट्रीय न्यायालय १५ न्यायाधीशांचे बनलेले आहे, जे संयुक्त राष्ट्र महासभा आणि सुरक्षा परिषदेद्वारे नऊ वर्षांच्या पदासाठी निवडले जातात. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या अधिकृत भाषा इंग्रजी आणि फ्रेंच आहेत.

**सचिवालय**

संयुक्त राष्ट्राचे कार्य प्रामाणिकपणे व योग्यरीतीने होण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या वेगवेगळ्या अंग आणि उपंगात एकसूत्रता यावी या दृष्टिकोनातून सचिवालाची स्थापना करण्यात आलेली आहे.

संयुक्त राष्ट्र संघाचे दैनंदिन काम जनरल असेंब्ली आणि इतर मुख्य अंगाद्वारे केले जाते. सचिवालय हे संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रशासकीय अंग आहे. सचिवालयाचा एक प्रमुख सचिव व दहा हजाराच्यावर नोकरवर्ग प्रशासकीय कामकाजात कार्यरत आहेत.

महासचिव हे संयुक्त राष्ट्रांचे मुख्य प्रशासकीय अधिकारी आणि संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयाचे प्रमुख असतात

## ३.३.३ संयुक्त राष्ट्रसंघाचे वेगवेगळे उपांगे

संयुक्त राष्ट्रांच्या सहा प्रमुख घटकअंगाशिवाय संयुक्त राष्ट्रांनी वेळोवेळी स्थापन केलेल्या अनेक वेगवेगळे उपांगे आहेत. ही उपांगे संयुक्त राष्ट्रसंघाच्या विशेष कार्यात्मक संस्था म्हणून आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचा एक भाग म्हणून कार्य करत आहेत.संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक-वैज्ञानिक अशा विविध क्षेत्रांत या संस्था कार्यरत आहेत संयुक्त राष्ट्राची एकूण सोळा उपांगे आहेत. ती पुढील प्रमाणे

१.आंतरराष्ट्रीय अनुशक्ती संघटना

२.आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

३.अन्न व शेतकरी संघटना

४.संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना (यूनेस्को)

५.जागतिक आरोग्य संघटना

६.जागतिक बँक

७.आंतरराष्ट्रीय विकास संस्था

८.भांडवल पुरवठा संस्था

९.आंतरराष्ट्रीय नाणेनिधी

१०.आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटना

११.आंतरराष्ट्रीय टपाल संघटना

१२.दूरध्वनी संपर्क संघटना

१३.जागतिक हवामान संघटना

१४.सागरी वाहतूक सल्लागार संघटना

१५.जकात आणि व्यापार करार

१६.आंतरराष्ट्रीय प्रवास संघटना

वरील संघटना ह्या आंतरराष्ट्रीय पातळीवर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे,मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन, तसेच आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्नांवर काम करताना दिसून येतात त्यापैकी महत्त्वाच्या संघटना अभ्यास आपण पुढील प्रमाणे करणार आहोत.

## १. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना सदस्य राष्ट्रांची सरकारे, नियोक्ते आणि कामगारांना एकत्र आणते, कामगार मानके निश्चित करणे, कामगारांसाठी धोरणे विकसित करणे आणि सर्व महिला आणि पुरुषांसाठी सभ्य कामांना प्रोत्साहन देणारे कार्यक्रम तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कामगार संघटना ही कटिबद्ध आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या संविधानाचा मसुदा १९१९ च्या सुरुवातीस लेबर कमिशनने तयार केला होता, ज्याचे अध्यक्ष सॅम्युअल गॉम्पर्स, युनायटेड स्टेट्समधील अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर (AFL) चे प्रमुख होते. बेल्जियम, क्युबा, झेकोस्लोव्हाकिया,फ्रान्स, इटली, जपान, पोलंड, युनायटेड किंगडम आणि युनायटेड स्टेट्स या नऊ देशांच्या प्रतिनिधींनी ते बनवले होते.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या निर्मितीची प्रेरक शक्ती सुरक्षा, मानवतावादी, राजकीय आणि आर्थिक विचारातून निर्माण झाली आहे.आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या संस्थापकांनी त्या काळातील औद्योगिक राष्ट्रांमध्ये कामगारांच्या शोषणाच्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्यासाठी सामाजिक न्यायाचे महत्त्व ओळखुन जगाच्या आर्थिक परस्परावलंबनाबद्दल आणि बाजारपेठेसाठी स्पर्धा करणाऱ्या देशांमधील कामकाजाच्या परिस्थितीची समानता मिळविण्यासाठी सहकार्याची आवश्यकता स्पष्ट केलेली आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे मुख्य कार्यालय स्वित्झरलँड मधील जिनेव्हा शहरात आहे.आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे मुख्य उद्दिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील- कामावरील कामगारांना त्यांच्या अधिकाराच्या बाबतीत जागरूकता निर्माण करून त्या अधिकाराच्या वापरास प्रोत्साहन देणे, रोजगाराच्या चांगल्या संधींना प्रोत्साहन देणे, सामाजिक संरक्षण वाढवणे आणि कामाशी संबंधित समस्यांवर संवाद मजबूत करणे.

## २. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक संघटना

युनोस्को या संघटनेची स्थापना ४ नोव्हेंबर १९४६ ला झालेली आहे. ही संस्था जागतिक पातळीवर शिक्षण, विज्ञान व संस्कृतीच्या विकासासाठी प्रयत्न करताना आपल्याला दिसून येते. या संस्थेच्या उदयाच्या संदर्भात बोलताना युद्धकाळात मित्र राष्ट्रांच्या शिक्षण मंत्र्यांच्या संमेलना मधून या संस्थेचा उदय झालेला आहे. या संस्थेचे प्रमुख मुख्यालय पॅरिस मध्ये आहे. एकंदरीतच शिक्षण, विज्ञान, संस्कृती यासंदर्भात युनेस्को ही संयुक्त राष्ट्रांच्या कल्पनांची प्रयोगशाळा आहे.

तीस वर्षांपेक्षा कमी कालावधीत दोन महायुद्धांनंतर, युनेस्कोचा जन्म एक स्पष्ट दृष्टीकोनातून झाला.शाश्वत शांतता, राज्यांमधील आर्थिक आणि राजकीय करार पुरेसे नाहीत,आपण लोकांना एकत्र आणले पाहिजे आणि संस्कृतींमधील परस्पर समज आणि संवादाद्वारे मानवजातीची बौद्धिक आणि नैतिक एकता मजबूत केली पाहिजे यासाठी युनेस्कोची स्थापना झालेली आहे.

युनेस्कोने प्रत्येक राष्ट्रातील तत्त्वज्ञ, कलाकार, विचारवंत एकत्र केले. अगदी सुरुवातीपासूनच वर्णद्वेषी सिद्धांतांचा निषेध केला आणि आम्ही नाविन्यपूर्ण प्रकल्प विकसित करून जग बदलण्याचा प्रयत्न केलेला आहे.

युनेस्कोने वैज्ञानिक संशोधनाच्या जागतिक केंद्रांना जन्म दिला आहे.युनेस्कोने आफ्रिका आणि पाचही खंडांचा पहिला सामान्य इतिहास लिहिण्यासाठी तज्ञ आणि विद्वानांना एकत्र आणले.तसेच युनेस्कोने अनेक साक्षरता मोहिमा राबवल्याआहेत. सोबतच युनेस्कोने वैज्ञानिक नैतिकता आणि मानवी विकासासाठी सार्वत्रिक तत्त्वे स्थापित करून मानवतेने देऊ केलेल्या सर्वोत्तम गोष्टींचे संरक्षण केले आहे.

आज युनेस्कोचे १९३ सभासद राष्ट्र सदस्य आहेत. २२१७ कर्मचारी ५४ प्रादेशिक कार्यालयांसह आणि १३६ संस्था आणि संशोधन केंद्रे जगात कार्यरत आहेत.युनेस्कोने ११५४ जागतिक वारसा स्थळे घोषित करून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे.

## ३. जागतिक आरोग्य संघटना

७ एप्रिल १९४८ मध्ये स्थापन झालेली WHO ही संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची संस्था असून जी सदस्य राष्ट्रांना आणि लोकांना आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी, जगाला सुरक्षित ठेवण्यासाठी आणि असुरक्षित लोकांची सेवा करण्यासाठी काम करत आहे. या संस्थेचे मुख्य कार्यालय जिनेव्हा येथे आहे. जगातील लोकांची आयुर्मर्यादा वाढवून लोकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्य सुधारण्याच्या उद्देशाने या संघटनेची वाटचाल सुरू आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या ८०००+ व्यावसायिकच्या टीममध्ये डॉक्टर, एपिडेमियोलॉजिस्ट, शास्त्रज्ञ आणि व्यवस्थापकांसह जगातील आघाडीचे सार्वजनिक आरोग्य तज्ञांचा समावेश आहेत. एकत्रितपणे जागतिक आरोग्य संघटना

जगात आरोग्याच्या बाबतीत निर्माण होणाऱ्या आणीबाणीसाठी जागतिक पातळीवर समन्वय साधते. रोगराई टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करते. तसेच जागतिक आरोग्य संघटना जागतिक पातळीवर आरोग्य सेवांचा दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्नशील आहे. प्रत्येकाला सुरक्षित आणि निरोगी जीवनासाठी समान संधी देण्याचा प्रयत्न जागतिक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून केला जातो.

जागतिक आरोग्य संघटना संयुक्त राष्ट्रांच्या प्रणालीमध्ये आंतरराष्ट्रीय आरोग्याचे निर्देश आणि समन्वय अधिकारी म्हणून, अखंडता, व्यावसायिकता आणि विविधतेचा आदर या संयुक्त राष्ट्रांच्या मूल्यांचे पालन करते.

जागतिक आरोग्य संघटना कर्मचाऱ्यांची मूल्ये याशिवाय जागतिक आरोग्य संघटनेच्या घटनेत स्थापित मानवी हक्क, सार्वत्रिकता आणि समानतेची तत्त्वे तसेच संस्थेच्या नैतिक मानकांचे प्रतिबिंबित करतात.

जागतिक आरोग्य संघटनेची मूल्य पाहता ही मूल्ये जगाच्या आरोग्याच्या दृष्टिकोनासाठी प्रेरित आहेत ज्यामध्ये सर्व लोक आरोग्याची उच्च संभाव्य पातळी गाठतात आणि आरोग्याला प्रोत्साहन देणे, जग सुरक्षित ठेवणे आणि असुरक्षितांना सेवा देणे ह्यासाठी जागतिक आरोग्य संघटना कटिबद्ध आहे.

## ३.३.४ संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेचे मूल्यांकन

संयुक्त राष्ट्रांची वाटचाल पाहता १९४५ मध्ये स्थापन झालेल्या या आंतरराष्ट्रीय संघटनेने गेल्या ७५ वर्षांत सनदेतील उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या दृष्टीने वाटचाल केलेली असली तरी सुद्धा संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अनेक मर्यादा ही संयुक्त राष्ट्र संघाला आलेल्या आहेत.

जागतिक शांतता स्थापित करणे हा संयुक्त राष्ट्रसंघाचा मुख्य उद्देश राहिला असला तरी महाशक्तीतील परस्पर संघर्षामुळे आणि मतभेदामुळे संयुक्त राष्ट्र संघाच्या ह्या ७५ वर्षाच्या कालावधी जागतिक शांततेला अनेक वेळा धोका निर्माण झालेला आहे.महाशक्तीच्या संघर्षांमुळे जागतिक पातळीवर शीतयुद्ध निर्माण झाले. शीतयुद्धाच्या वातावरणामुळे सुरक्षा परिषदेच्या कार्यावर परिणाम झाला. शीतयुद्धाच्या काळातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेवरून सदस्य राष्ट्रात संशयाचे वातावरण निर्माण झालेले आहे. पर्यायाने भारत-पाक युद्धे (१९४८, १९६५ व १९७१), इझ्राएलची निर्मिती (१९४८) आणि नंतरचा अरब-इझ्राएल संघर्ष यात आमसभा आणि सुरक्षा परिषद यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे मात्र युद्धविराम होऊनही या देशांतील संशयाचं वातावरण कमी करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघ नक्कीच कमी पडला आहे ही वस्तुस्थिती आहे.

शस्त्रनियंत्रण व शस्त्र स्पर्धा बंद करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने अनेक पावले उचलली पण त्या प्रयत्नास संयुक्त राष्ट्रसंघास ज्या पद्धतीने यश मिळणे अपेक्षित होते त्या पद्धतीने यश मिळू शकले नाही कारण संयुक्त राष्ट्र संघाच्या नियमांचे पालन लहान राष्ट्रांनीच करावे असा मोठ्या राष्ट्रांच्या भूमिका राहिलेल्या आहेत त्यामुळे मोठी राष्ट्र संयुक्त राष्ट्र संघाच्या विचाराचे, तत्त्वाचं पालन करत नाहीत. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघामध्ये मोठ्या राष्ट्रांचा

वर्चस्व आणि प्रभुत्व हे दिसून आलेले आहे. एकंदरीतच शस्त्रनियंत्रण आणि शस्त्र स्पर्धेच्या संदर्भातील करारांमध्ये मोठ्या राष्ट्रांना झुकते माप दिलेले आहे.मोठे राष्ट्र स्वतःच्या फायद्यासाठी स्वतःच्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ लावतात त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनाच्या उद्देशांना काही वेळा हरताळ फासला जातो. जागतिक पातळीवरील निशस्त्रीकरणाबाबत अनणुपरीक्षण प्रतिबंध करार, अण्वस्त्र निर्माण व प्रसार प्रतिबंधक करार, सर्वसमावेशक चाचणी प्रतिबंधक करार, असे करार करण्यात येऊनही या करारात अण्वस्त्रधारी राज्यांना झुकतो माप देण्यात आलेले होते. यातूनच जागतिक पातळीवर अनेक संरक्षणात्मक लष्करी करार करण्यात आलेले आहेत. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघांवर सदस्य राष्ट्राचा जागतिक शांततेसाठी विश्वास राहिला नसल्याचे हे धोतक असले तरी संयुक्त राष्ट्र संघाने अनेक ठिकाणी आपली शांती सेना पाठवलेली आहे.

संयुक्त राष्ट्राच्या संदर्भात सर्व सदस्य राष्ट्रांना समान अधिकार दिला आहे असे म्हटल्या जाते परंतु संयुक्त राष्ट्राच्या भूमिका पाहता ती समानता केवळ ही नवापूरतीच राहिलेली आहे कारण व्हेटोच्या अधिकारामुळे संयुक्त राष्ट्रसंघा मधले वातावरण हे अनेकवेळा दूषित झालेले आहे.

अराजकीय क्षेत्रातही संयुक्त राष्ट्रांचे कार्य महत्त्वाचे आहे.१० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्रांनी सर्वव्यापक मानवाधिकारांची घोषणा केली व मानवी हक्क आयोगाची स्थापना करून कोणताही भेदभाव न करता सर्वांना समान मूलभूत हक्कांची जाणीव करून दिली असली तरीही आजही जागतिक पातळीवर अनेक ठिकाणी मानवी हक्काची वर गदा आणली जाते ही वस्तुस्थिती आहे.

१९६० मध्ये वसाहतवाद हा मूलभूत मानवी हक्कांच्या संकल्पनेविरूद्ध असून कोणत्याही प्रदेशावरील परकीय वर्चस्व अंतिमत: आंतरराष्ट्रीय शांततेला धोका निर्माण करणारे आहे, हे आमसभेने स्पष्ट केले होते. त्या दृष्टिकोनातून संयुक्त राष्ट्र संघाने वाटचाल करून अनेक वसाहतींना स्वातंत्र्य करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत.

संयुक्त राष्ट्राने अनेक क्षेत्रांत भरीव व विधायक कार्य केले आहे.संयुक्त राष्ट्रांनी मागासलेल्या राष्ट्रांमधील दारिद्रय, बेकारीची समस्या, त्यांच्या आर्थिक विकासासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना, मानवतावादी दृष्टिकोनातून करावी लागणारे कार्य या विषयांवर लक्ष केंद्रित करून त्यासाठी तज्ज्ञांचे अभ्यासगट संघटित करून विकासाच्या संकल्पनेला चालना दिली आहे.तसेच आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता, लोकशाही तत्त्वांचे रक्षण, मुक्त वातावरणात सार्वत्रिक निवडणुका, अवर्षण, दारिद्रय व कुपोषण यांविरूद्धचा लढा आदी क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी या संघटनेने केली आहे.

एकंदरीतच संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेचे मूल्यांकन करताना संयुक्त राष्ट्र संघाच्या यश अपयशाची चर्चा आपणास करता येईल. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्यक्षेत्र पाहता ते कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक स्वरूपाचे आहे. त्यामुळे मोठ्या कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या या संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण जग सुखी आणि समृद्धी होण्यासाठी अनेक अडचण निर्माण होऊ शकतात हे आपल्याला लक्षात घेणे गरजेचे आहे.

**सारांश**

जागतिक शांतता आणि सुरक्षितता याबाबतीत स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखणे,मानवी हक्कांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने मोठ्या प्रमाणात प्रयत्न केलेले आहेत.जागतिक शांतता आणि सुरक्षितता यांबाबतीत या संघटनेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या असल्यातरी ही या संयुक्त राष्ट्रसंघटनेद्वारे मानवतावादी दृष्टिकोनातून कल्याणकारी योजनांनी आफ्रो-आशियाई व लॅटिन अमेरिकेतील छोटया गरीब आणि परिस्थितीने गांजलेल्या देशांना दिलासा देणारी आहे.या विकसनशील देशांना संयुक्त राष्ट्रांची त्यांच्या विकासासाठी आजही नितांत आवश्यकता वाटते.

**आपली प्रगती तपासा**

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेची चर्चा करा?

२. संयुक्त राष्ट्रसंघाच्या वेगवेगळे अंगावर भाष्य करा?

३. शाश्वत विकास आणि हवामान कृतीला समर्थन देण्यासाठी काम करणारे प्रमुख कार्यक्रम व संस्थाची चर्चा करा.

## अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


1. Arora Prem.1984.Studies in international relations bookhive, New Delhi.
2. Craig Murphy N.1990.International Organization and Industrial Change: Global Governance Since 1950, New York.
3. Meiser Stanley.1995. United Nations: The First-Fifty Years, New York.
4. Nicholas Herber G. 1975.The United Nations as a Political Institution, Oxford.
5. Yoder Amos.1993.The Evolution of the United Nations System, New York.


❄❄❄❄❄❄❄

# ४

# आजचे संयुक्त राष्ट्र (United NationsToday)

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ संयुक्त राष्ट्राचे बदलते स्वरूप

४.३ संयुक्त राष्ट्रातील बदल / सुधारणा

४.४ संयुक्त राष्ट्रांचे औचित्य / प्रस्तुतता

४.५ सारांश

४.६ आपण काय शिकलो?

४.७ संदर्भ सूची

## ४.१ उद्दिष्टे

पहिल्या जागतिक महायुद्धाच्या अनुभवातून राष्ट्रसंघ स्थापन झाला. परंतु राष्ट्रसंघ जगास दुसऱ्या महायुद्धाचा धोका टाळण्यात अपयशी ठरला. त्यातूनच जगात शांतता व सहकार्याची भावना चिरंतन स्वरूपात निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन झाली त्यास आज संयुक्त राष्ट्रे हे संबोधन प्रचलित झाले आहे. संयुक्त राष्ट्रे मागील ७५ वर्षाहून अधिक काळ जगातील संघर्षाचे प्रश्न सहकार्य व शांततामय मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळेच जगात अनेकदा संघर्षाचे प्रसंग उद्‌भवल्यानंतर ही जगास तिसऱ्या महायुध्दाचा सामना करावयास लागला नाही. संयुक्त राष्ट्रे जागतिक शांतता व सहकार्य निर्माण करण्याच्या प्रधान हेतूने अस्तित्वात आले असले तरी काळाच्या ओघात व बदलत्या संदर्भातील आव्हानामुळे त्याच्या स्वरूप व रचनेत मोठे बदल झाले आहेत. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी स्थापन झालेली संयुक्त राष्ट्र संघटना व आजचे संयुक्त राष्ट्रे याचे स्वरूप, ध्येय, उद्दिष्ट यामध्ये मोठे बदल झाले आहेत. विज्ञान – तंत्रज्ञान व दुरसंचार संसाधनांमध्ये झालेली क्रांती व त्याच्या विकासाचा वेग प्रचंड असला तरी समकालीन संदर्भात ही संयुक्त राष्ट्रांचे औचित्य तेवढेच महत्वाचे वाटते. यादृष्टिने या घटकात संयुक्त राष्ट्राचे बदलते स्वरूप संयुक्त राष्ट्रांमध्ये घडवून आणलेल्या सुधारणा, संयुक्त राष्ट्रांची समकालीन संदर्भातील प्रस्तुतता या घटकांचाअभ्यास करण्यात येणार आहे. ज्याचा उपयोग ‘संयुक्त राष्ट्रे’ विषयीचे आपले आकलन अधिक व्यापक व समृद्ध होण्याच्या दृष्टिने निश्चित होईल.

## ४.२ संयुक्त राष्ट्रे बदलते स्वरूप –

संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना ही प्रामुख्याने जगास तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यातून वाचवण्याच्या हेतूने झाली होती. याशिवाय राष्ट्रांना आपले प्रश्न शांतता, सहकार्य, वाटाघाटी व संवादाच्या माध्यमातून सोडवण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा एक

प्रधान उद्देश संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापने मागे होता. परंतु काळाच्या ओघात संयुक्त राष्ट्रांची उद्दिष्टे अधिकाधिक व्यापक होत गेली व त्याप्रमाणात संयुक्त राष्ट्रांचे स्वरूप ही बदलत गेलेले आपणास दिसते. यातील काही प्रमुख घटकांचा आढावा आपणास पुढील प्रमाणे घेता येईल.

**१) बहुपक्षीयता –**

बहुपक्षीयता हा संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेमागील एक प्रमुख प्रेरक घटक राहिलेला दिसतो. समकालिन जागतिक राजकीय संदर्भात तर हा घटक केवळ पर्याय न राहता अपरिहार्य बनला आहे. बहुपक्षीयतेच्या अभावी जागतिक अराजक निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जाते. कारण बहुपक्षीयतेच्या अभावी सत्तेचा परम प्रभाव निर्माण होऊ शकतो हा सत्तेचा परम प्रभाव छोटया-छोटया राष्ट्रांसाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे बहुपक्षीयता ही समकालीन अपरिहार्यता म्हणून पुढे आली आहे. या बहुपक्षीयतेचे प्रतिनिधित्व संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून केले जाते. आजचे संयुक्त राष्ट्रांचे स्वरूप हे बहुपक्षीयतेच्या तत्वावर आधारलेले आहे.

**२) आत्मरक्षणाचा अधिकार अपवादात्मक स्थितीत :**

जागतिक महायुद्ध टाळण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाल्यामुळे राष्ट्रांना युद्धाच्या प्रसंगाना सामोरे जाणारी परिस्थिती निर्माण होणार नाही याची काळजी संयुक्त राष्ट्रे वाहते. संयुक्त राष्ट्रे तरीही अपवादात्मक परिस्थितीत राष्ट्र-राज्याच्या स्वयंनिर्णयाच्या तत्वास स्वसंरक्षणाच्या दृष्टीने आपल्या घटनेत एखाद्या राष्ट्रास आक्रमक राष्ट्राविरोधात युद्ध पुकारण्याचा अधिकार बहाल करते. या अधिकारामुळे एखाद्या राष्ट्रावर दुसऱ्या राष्ट्राकडून सशस्त्र आक्रमण झाले असेल तर आत्मरक्षणाकरिता हल्ल्यात बळी पडलेले राष्ट्र आक्रमक राष्ट्राविरोधात युद्ध पुकारू शकते. या राष्ट्राच्या अधिकारास 'The right of self defense in the event of an armed attack' असे संबोधले जाते. अशा परिस्थितीत ही संबंधित राष्ट्राने आपल्या कारवाई संबंधीची माहिती संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेस देणे अपरिहार्य असते. एकंदरीत अपवादत्मक परिस्थितीस आत्मरक्षणाचा अधिकार हा संयुक्त राष्ट्रांच्या बदलत्या स्वरूपातील एक महत्वाचा घटक होय.

**३) जागतिक स्तरावर समन्वय साधणारी मध्यवर्ती संघटना –**

जगास तिसऱ्या महायुद्धापासून वाचविणे या प्रधान उद्दिष्टास अनुसरून स्थापन झालेली संयुक्त राष्ट्रे काळाच्या ओघात नवनव्या आव्हानांचा सामना करतांना व जगात विश्वरचना प्रतिमाने कार्यन्वीत करताना समन्वय साधणारी मध्यवर्ती संघटना म्हणून आज कार्य करत असल्याचे स्पष्ट दिसते. संयुक्त राष्ट्रे आज राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा बहुविधक्षेत्रात जागतिक स्तरावर कार्यरत असणाऱ्या संघटनांच्या कार्यात समन्वय साधताना दिसते. जागतिक स्तरावर या विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या काही उपसंघटना संयुक्त राष्ट्रांकडून सुरू करण्यात आल्या आहेत. शिवाय विश्व व्यापार संघटना, जागतिक बँका, जागतिक नाणेनिधी यासारख्या संघटना ही संयुक्त राष्ट्रांचे अधिपत्य मान्य करतात. संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतील कलम ६४ नुसार अशा संस्थांना आपल्या कार्याविषयीचे वार्षिक अहवाल संयुक्त राष्ट्रांना सादर करणे बंधनकारक आहे.

एकंदरीत, जागतिक स्तरावर विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संघटनांमध्ये समन्वय साधण्याचे मध्यवर्ती कार्य करणेच्या दृष्टिने संयुक्त राष्ट्रांच्या स्वरूपात अलिकडच्या काळात बदल होतांना दिसत आहेत.

**४) वैश्विक सदस्यत्व –**

समकालिन संदर्भात वैश्विक सदस्यता हे संयुक्त राष्ट्रांचे बदलत्या स्वरूपातील एक महत्वाचे घटक तत्व आहे.आज जगामध्ये बिगरशासकीय आंतरराष्ट्रीय संघटनांपैकी केवळ १८ संघटना या सामान्य उद्दिष्टये असणाऱ्या संघटना आहेत असे मानले जाते. त्यापैकी संयुक्त राष्ट्रे ही संघटना एकमेव वैश्विक सदस्यता असणारी संघटना आहे. आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्व राष्ट्रे संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतात. आज स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून जागतिक समुदायाकडून मान्यता प्राप्त करण्याकरिता संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व अनिवार्य आहे. १९४५ साली संयुक्त राष्ट्र संघटना ज्यावेळी अस्तित्वात आली त्यावेळी तीची सदस्य संख्या ५१ होती. आज ती १९१ पेक्षा अधिक आहे. अदयापही काही राष्ट्रे संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या या वाढत्या कार्यक्षेत्राने संयुक्त राष्ट्राच्या स्वरूपातही मोठे बदल केलेले आपणास दिसतात.

**५) बहुउद्देशीय स्वरूप –**

जागतिक शांतता व सहकार्याची भावना वृद्धिगंत करणे हा संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेमागील प्रधान हेतु होता. जागतिक शांतता व सहकार्याची भावना वृद्धिंगत करण्यासाठी व जगास युद्धाच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी शस्त्रनियंत्रणा शिवाय दारिद्रय, आरोग्य व तत्सम क्षेत्रातील प्रश्नांची सोडवूणक करणे अत्यावश्यक असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या लक्षात आले. त्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी आपले स्वरूप बहुउद्देशीय केलेले दिसते. आज संयुक्त राष्ट्र संघटना आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्याबरोबरच सदस्य राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे, सहकार्याचे संबंध प्रस्थापित करणे, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवी अधिकारांच्या क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविणे त्याकरीता सदस्य राष्ट्रांचे सहकार्य प्राप्त करणे, मानवी हक्काच्या संवर्धनाकरीता आंतरराष्ट्रीय समुदायात जागरुकता व आदर निर्माण करण्याकरिता प्रयत्न करणे अशा विविध उद्दिष्टांकरीता संयुक्त राष्ट्रे आज कार्यरत असलेले दिसते.

**६) संघर्षाचे व्यवस्थापन –**

विश्वरचनेमध्ये राष्ट्र-राज्य अवस्थेच्या विकासाबरोबर राष्ट्रीय सार्वभौमत्वाचा संघर्ष उभा राहिलेला दिसतो. प्रत्येक सार्वभौम राष्ट्र सत्ताप्राप्तीसाठी व आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाकरिता सक्रिय असते यातूनच सत्ता व राष्ट्रीय हितसंबंधासाठी चाललेल्या स्पर्धेत अनेकदा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता वाढते. अशा पद्धतीच्या संघर्षाचे व्यस्थापन करण्याचे कार्य संयुक्त राष्ट्रांना करावे लागते. या बरोबरीनेच वैश्विक पातळीवर सर्वांच्या सामूहिक हिताकरिता सार्वभौम राष्ट्रांच्या धोरणांमध्ये समन्वय साधने ही गरजेचे असते हे कार्य संयुक्त राष्ट्रे पार पाडतात. वास्तविक राष्ट्रीय सत्ता वृध्दींगत करण्याच्या अनियंत्रित महत्वकांक्षेतून पहिले व दूसरे महायुद्ध घडून आले

होते. या अनुभवाचा सामना जागतिक समूदायास परत करण्याची वेळ येऊ नये यास्तव संयुक्त राष्ट्रांनी आपल्या स्वरूपात राष्ट्रीय सत्तेच्या नियंत्रणासाठी, राष्ट्रांच्या धोरणांमध्ये समन्वय साधण्यासाठी, वैश्विक पातळीवर सामूहिक कल्याणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मोठे बदल केलेले दिसतात.

**७) राष्ट्रीय हिताचे संवर्धन –**

संयुक्त राष्ट्रे हे जागतिक समूदायास युद्धासारख्या आपत्तींपासून संघर्षाच्या प्रश्नापासून परावृत्त करण्याचे महान कार्य करत जागतिक समुहास विश्व राज्याच्या अधिक समीप घेऊन जाण्याचे कार्य एका बाजूने करत असताना दुसऱ्या बाजूने राष्ट्रीय हिताचे संवर्धन करण्याचे कार्य ही पार पाडताना दिसते. यासाठी संयुक्त राष्ट्रांनी कालपरत्वे आपल्या रचना व स्वरूपात आवश्यक ते बदल केलेले दिसतात. त्यामुळेच संयुक्त राष्ट्राचे सदस्यत्व राष्ट्रांसाठी केवळ त्यांची आंतरराष्ट्रीय प्रतिमा वाढवणारेच साधन नाही तर अनेक प्रकारचे राजकीय, आर्थिक, व्यापारी फायदे मिळवून देणारे आहे. संयुक्त राष्ट्रांचे सदस्य बनल्यामुळे राष्ट्रांना सामूहिक सुरक्षिततेच्या यंत्रणेत प्रवेश मिळतो. त्यांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राखले जाण्याची हमी त्यांना मिळते. त्याचबरोबर संयुक्त राष्ट्रांच्या राजनयिक व्यासपीठावरून राजकीय स्वरूपाचे प्रश्न ही शांतता व सहकार्याच्या माध्यमातून सोडवले जाऊ शकतात. शिवाय गरीब राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रांकडून मोठा विकास निधी उपलब्ध करून दिला जातो. ज्यातून ती राष्ट्रे आपले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक प्रश्न सोडवू शकतात. याकरीता संयुक्त राष्ट्रांच्या उपसंघटना मदतीसाठी तत्पर असतात. एकंदरीत विश्वराज्याचे स्वप्न साकाराला आणत असतानाही राष्ट्रीय हिताची काळजी घेण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी आपल्या स्वरूपात आवश्यक लवचिकता ठेवलेली दिसते.

**८) राज्यकेंद्रित स्वरूप –**

संयुक्त राष्ट्रे ही राज्यकेंद्रिंत संस्था मानली जाते. कारण संयुक्त राष्ट्रे या संघटनेची स्थापना राज्यांच्या प्रभावाखाली झाली असून राज्यांचेच त्यावर नियंत्रण असल्याचे दिसते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांना राज्यामधील संघटनेचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसते. संयुक्त राष्ट्रांची घटना तयार करतांनाच संयुक्त राष्ट्रे ही संघटना राज्यांना वरचढ होणार नाही याची काळची घेण्यात आली होती. उदा. संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतच अशी तरतुद करण्यात आली की संयुक्त राष्ट्रे प्रत्येक सदस्य राष्ट्राच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचा आदर करेल व कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रांना नसेल. संयुक्त राष्ट्रांच्या घटनात्मक तरतुदी राज्यांचा प्रभाव वाढवणाऱ्या असल्या तरी मागील सात दशकात संयुक्त राष्ट्राचा प्रवास पाहता राज्यांचा प्रभाव कमी होताना दिसतो आहे. राज्यां-राज्यामध्ये संवाद व सहकार्याची भावना ज्या प्रमाणात वृद्धिगंत होत आहे त्या प्रमाणात राष्ट्रीय सार्वभौमत्व ही संकल्पना मागे पडून जग विश्व राज्याच्या संकल्पनेच्या अधिक जवळ जात आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांचे स्वरूप राज्यकेंद्रित व्यवस्थेपासून विश्वराज्य व्यवस्थेच्या दृष्टिने बदलत असल्याचे प्रत्ययास येते.

**९) केंद्रिकरण व विकेंद्रीकरण तत्वाचे सहअस्तित्व –**

संयुक्त राष्ट्रांचे स्वरूप अभ्यासताना संयुक्त राष्ट्रांच्या व्यवस्थेत केंद्रिकरण व विकेंद्रीकरण हे दोन्ही विचार प्रवाह एकत्रितपणे कार्यरत असल्याचे दिसतात. संयुक्त राष्ट्रांच्या रचनेत राजकीय दृष्टया केंद्रिकणावर तर आर्थिक व सामाजिक दृष्टया विकेंद्रिकरणाच्या तत्वावर भर दिलेला दिसतो. उदा. सामूहिक सुरक्षिततेच्या क्षेत्रात सुरक्षा परिषदेला कायदेशीर, कार्यकारी व न्यायिक स्वरूपाचे व्यापक अधिकार आहेत. सुरक्षा परिषदेच्या या अधिकारांचे स्वरूप एक प्रकारे निरकुंश स्वरूपाचे आहे. सुरक्षा परिषदेच्या निर्णयांचे पुनर्विलोकन ही होऊ शकत नाही. त्यामुळे राजकीयदृष्टया संयुक्त राष्ट्रे केंद्रिकरणाच्या तत्वास मान्यता देते तर उलट सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अनेक संस्था, संघटना, आयोग व समित्या स्थापन करून त्यांना मोठया प्रमाणात स्वायत्तता बहाल करण्यात आली आहे.

**१०) सुस्पष्ट स्वरूपात सत्ताविभाजनाच्या तत्वाचा अभाव –**

आधूनिक राष्ट्र-राज्य व्यवस्थेत सत्ता विभाजनाचे तत्व मोठया प्रमाणात प्रचलित असलेले दिसते. त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रांच्या घटनेत ही सत्ता विभाजनाचे तत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला. मात्र संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतील तत्वे सत्ताविभाजनाच्या तत्वाची निर्विवाद मांडणी करताना दिसत नाहीत. संयुक्त राष्ट्रांच्या घटनेत आमसभा, सुरक्षा परिषद, आंतरराष्ट्रीय न्यायालय व आर्थिक आणि सामाजिक परिषदेमध्ये जी सत्ताविभागणी झालेली आहे. ती असमान व अस्पष्ट स्वरूपाची आहे. त्यामुळे या घटक संस्थामध्ये अधिकारांचे नियंत्रण व समतोलाचे तत्व खऱ्या अर्थाने कार्यन्वीत होऊन शकलेले नाही. उदा. सुरक्षा परिषदेत आमसभा व आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या तुलनेत मोठे निर्णायक अधिकार प्राप्त झालेले आहेत. ज्यामुळे संयुक्त राष्ट्रांना आपले निर्णय व भूमिका कार्यन्वीत करताना अडथळे निर्माण होतांना दिसतात. संयुक्त राष्ट्रांच्या प्रचलित घटनात्मक तरतुदी प्रमाणे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी व ती धोक्यात आल्यास त्याचा सामना करण्यासाठी सुरक्षा परिषदेस कायदे करण्याचा, त्यांची अंमलबजावणी करण्याचा व या संदर्भात न्यायनिवाडा करण्याचा असे सर्वच अधिकार प्राप्त झालेले आहेत. तरीही अभ्यासकांच्या मते, अधिकारांच्या नियंत्रण आणि समतोलाच्या तत्वाचा सध्या जरी संयुक्त राष्ट्रांच्या घटनेत अभाव असला तरी या तत्वाच्या विकासासाठी क्षमता निश्चितच संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतच अंतर्भूत आहे. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोवियत रशियामधील संघर्षामुळे जेव्हा सुरक्षा परिषद आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेशी निगडीत महत्वाच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यास असमर्थ ठरली. त्यावेळी आमसभेने घेतलेला पुढाकार याचे निदर्शक आहे.

एकंदरीत संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासून आजतागायत काळाप्रमाणे संयुक्त राष्ट्रांनी आपल्या रचना व स्वरूपात सुंसगत बदल केलेले निदर्शनास येतात.

## ४.३ संयुक्त राष्ट्रे – बदल किंवा सुधारणा –

संयुक्त राष्ट्र रचना व स्वरूपात मोठे बदल होणे गरजेचे आहे याबाबत सदस्य राष्ट्रांमध्ये एकमत जरी आढळत असले तरी कोणत्या प्रकारच्या सुधारणा व कोणत्या उद्दिष्टाकरिता सुधारणा यासंदर्भात मात्र त्यांच्यात गंभीर स्वरूपाचे मतभेद आहेत. उदा. आंतरराष्ट्रीय बिगर शासकीय संघटनांना लोकतांत्रिक, पारदर्शक व उत्तरदायी संयुक्त राष्ट्रे यादृष्टीने सुधारणा आवश्यक आहेत तर सुधारणावाद्यांना सर्वसमावेशक व विस्तारीत संयुक्त राष्ट्रे आवश्यक वाटते, पुराणमतवाद्यांना मात्र संयुक्त राष्ट्रांचा प्रभाव व सक्रियता कमी करणे आवश्यक वाटते. यादृष्टीने संयुक्त राष्ट्रांमध्ये सुधारणा करावयाच्या हेतूने अनेक अहवाल, सूचना व शिफारशी येताना दिसतात. संयुक्त राष्ट्रांमधील बदल व सुधारणांची मांडणी पुढील काही घटकांच्या आधारे करता येईल.

**अ) सुधारणा प्रक्रियेचे स्वरूप –**

संयुक्त राष्ट्रांमधील सुधारणा प्रक्रियेचे स्वरूप पुढील मुद्दयांच्या आधारे करता येईल.

**१) सुधारणांची अनिवार्यता –**

कोणत्याही संघटनेत ज्यावेळी सुधारणा वा बदल अनिवार्य स्वरूपात पुढे येतो त्यावेळी संघटनेची ध्येये व उद्दिष्टे साध्य करण्यासाठी गुणात्मक व कार्यात्मक सुधारणा करून त्यात गतिमानता आणत संघटनेच्या रचनेत, बांधणीत, कार्यपद्धतीत, निर्णयनिर्मिती प्रक्रियेत व आर्थिक बाबींमध्ये आवश्यक ते बदल घडवून आणणे आवश्यक मानले जाते. यादृष्टीने संयुक्त राष्ट्रांच्या कार्यास कालानुरूप गतिशिलता प्राप्त करून देण्यासाठी, आव्हानांचा सामना करण्यासाठी आवश्यक सुधारणा घडवून आणणे हे या प्रक्रिया घटकात अपेक्षित असते. त्यामुळे संयुक्त राष्ट्राप्रती नाराज सदस्यांमधील वा घटकांमधील वाढत जाणारा अंसतोष कमी होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

**२) आत्मपरिक्षणाकरिता सुधारणा –**

सुधारणा प्रक्रियेतील हे दुसरे महत्वाचे घटक तत्व म्हणून प्रस्तुत केले जाते. संयुक्त राष्ट्रे ही एक जगातील अतिशय क्लिष्ट विकेंद्रित व बहुआयामी व्यवस्था वा संघटन आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या दाहक अनुभवाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली व शीतयुद्ध काळात तीचा विस्तार झाला. त्यामुळे श्रीमंत राष्ट्रांचा प्रभाव व वर्चस्व संयुक्त राष्ट्रांवर स्पष्टपणे दिसतो. संयुक्त राष्ट्रांसारखी आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रांच्या वर्तनास नियंत्रित करणारी आंतरराष्ट्रीय संघटना ही कल्पनाच मुलत: सार्वभौम राष्ट्रांच्या पचनी पडणारी नव्हती. त्यामुळे संयुक्त राष्ट्राच्या दृष्टीने ज्या उद्दिष्टांना न्याय दिला जात आहे किंवा नाही या आधारावर स्वत:चे मूल्यमापन करणे आवश्यक होते. या दृष्टीने संयुक्त राष्ट्रांकरिता सुधारणांची प्रक्रिया ही आत्मपरिक्षणाची संधी म्हणून ही पहिली जाते.

### ३) संरचनात्मक सुधारणांची मागणी –

संयुक्त राष्ट्रांमध्ये संरचनात्मक बदलांची मागणी ही संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासून आहे. सॅनफ्रॉन्सिस्को परिषदे मध्ये संयुक्त राष्ट्रांची पायाभरणी होत असतांनाच संयुक्त राष्ट्रांच्या प्रचलित प्रतिमानामध्ये कोणते व कसे बदल होणे गरजेचे आहे याची ही मांडणी केली गेली होती. काही मोजक्या राष्ट्रांच्या हितसंबंधाकरिता संयुक्त राष्ट्रे ही संघटना अस्तित्वात येत असल्याची गंभीर टिका संयुक्त राष्ट्रांवर होत होती. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या घटनेतच संयुक्त राष्ट्रांच्या रचनेत बदल घडवून आणण्याकरिता पुनर्विलोकन परिषद बोलावण्याची तरतुद अंर्तभूत करण्याची मागणी केली गेली होती. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासूनच संयुक्त राष्ट्रांच्या घटनेत बदल करण्यासाठी आग्रही असणारा व या बदलांना विरोध करणारा वा अवरोध निर्माण करणारा असे दोन्ही गट कार्यरत असलेले दिसतात.

### ४) सुधारणांचे प्रस्ताव –

संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेत सुधारणाविषयक आलेल्या प्रस्तावांची भूमिका ही महत्वाची राहिलेली दिसते. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेपासून आजतागायत संयुक्त राष्ट्रांमध्ये रचनात्मक, कार्यात्मक व गुणात्मक बदल घडवून आणण्याकरिता अभ्यासकांकडून, आयोगांकडून व बिगरशासकीय संघटनांकडून प्रस्ताव मांडले गेलेले आहेत. उदा. जॅकसन यांचे क्षमता अध्ययन, १८ राष्ट्रांच्या समूहाकडून मांडला गेलेला सुधारणा प्रस्ताव, कोफी अन्नान यांचा सुधारणा प्रस्ताव. या प्रस्तावामधून संयुक्त राष्ट्रांमधील विविध संस्था व संघटनाद्वारे होणाऱ्या कार्यात संतुलन कसे घडवून आणावे, समन्वय कला साधावा, पुनरावृत्ती कशी टाळता येईल, वित्त पुरवठा व कामाची विभागणी कशी करावी इत्यादी बाबतीत सुधारणा सुचविण्यात आलेल्या आहेत. एकंदरीत विविध स्तरावरून मांडल्या गेलेल्या सुधारणा प्रस्तावांची संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेत महत्वाची भूमिका आहे हे प्रत्ययास येते.

### ५) सुधारणा प्रक्रियेवरील शीतयुद्धाचा प्रभाव –

संयुक्त राष्ट्रे यातील सुधारणा प्रक्रियेत शीतयुद्धांची भूमिका ही महत्वाची राहिलेली दिसते. संयुक्त राष्ट्राच्या स्थापने पासूनच शीतयुद्धाचा काळ ही प्रारंभ झाला. १९४५ ते १९९१ हा शीतयुद्धाचा कालखंड होय. या कालखंडात संयुक्त राष्ट्रांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी मोठया प्रमाणात प्रस्ताव आले मात्र या कालखंडात संयुक्त राष्ट्रांमध्ये बदल घडून येण्याची प्रक्रिया मात्र संथ होती. सुधारणा प्रस्ताव व सूचना यांना शीतयुद्ध काळात राजकीय रंग दिसल्यामुळे हे सूचना व सुधारणा प्रस्ताव वादात अडकत गेले व सुरक्षा परिषदेतील व्हेटोचा अधिकार रशिया व अमेरिका या दोन्हीं महासत्तांनी या सुधारणा प्रक्रियांना विरोध करण्यासाठी मोठया प्रमाणात वापरला. त्यामुळे शीतयुद्ध काळात संयुक्त राष्ट्रांमध्ये घडून आलेल्या सुधारणा या अतिशय किरकोळ स्वरूपाच्या राहिल्या.

**६) घटनात्मक सुधारणांच्या मर्यादा –**

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासून अजतागायत घटनात्मक दुरुस्त्यांचा आढावा घेताना त्यातील मर्यादा स्पष्टपणे दिसतात. संयुक्त राष्ट्राच्या स्थापने पासून आजतागायत केवळ तीन घटनात्मक सुधारणा प्रत्यक्षात घडून येऊ शकल्या. त्यातील एक सुधारणा म्हणजे सुरक्षा परिषदेतील हंगामी सदस्यांची संख्या सहा वरून दहा एवढी करण्यात आली. दुसऱ्या घटना दुरुस्तीने आर्थिक व सामाजिक परिषदेतील सदस्यांची संख्या १८ वरून २७ एवढी करण्यात आली तर तिसऱ्या घटना दुरुस्तीने पुन्हा एकदा आर्थिक व सामाजिक परिषदेतील सदस्यांची संख्या पुन्हा एकदा वाढवून ती २७ वरून ५४ करण्यात आली. या सुधारणांचे स्वरूप व एकूण प्रभाव पाहता या अगदी जुजबी स्वरूपाच्याच सुधारणा मानाव्या लागतील. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेत घटनात्मक मर्यादा स्पष्टपणे जाणवतात.

**७) सीमापार आव्हानांचा सामना –**

समकालीन संदर्भात संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेत सीमापार आव्हानांचा सामना करतांना राष्ट्र-राज्यांना ज्या मर्यादा पडत आहेत त्या घटकांनी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. वातावरणातील बदल, पर्यावरणातील वाढते प्रदूषण, जागतिक तापमान वाढ, गरीबी, लोकसंख्येचा विस्फोट, वांशिक संघर्ष, मानवी हक्कांचे उल्लंघन, स्थलांतर व निर्वासितांचे, प्रश्न, एड्स, कोरोना, स्वाईन फ्लू सारखे विषाणूंनी निर्माण केलेली महामारी यासारख्या आव्हानांचा सामना करणे एखाद्या राष्ट्रास वा राष्ट्र समूहास शक्य होत नाही. त्याकरीता आंतरराष्ट्रीय पातळीवरूनच प्रयत्न करणे अपरिहार्य आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्रे त्याकरीता महत्वाचे आहेत. या दृष्टीने संयुक्त राष्ट्रांच्या रचनेत व स्वरूपात आवश्यक सकारात्मक बदल घडवून आणणे आवश्यक मानले जाते.

**ब) सुधारणा प्रक्रियेचा प्रवास –**

संयुक्त राष्ट्रांचा सुधारणा प्रक्रियेचा प्रवास पुढील मुद्दयांच्या आधारे मांडता येईल.

**१) प्रथम टप्पा – संख्यात्मक विस्तारास प्राधान्य –**

सयुक्त राष्ट्राच्या स्थापनेनंतर घटनात्मक सुधारणांची प्रथम मागणी ही संयुक्त राष्ट्रांच्या काही घटक अंगाच्या संख्यात्मक विकास संबंधीची होती. संयुक्त राष्ट्रे ज्यावेळीस स्थापन झाली त्यावेळी संस्थापक राष्ट्रांमध्ये आशिया व अफ्रिका खंडातील केवळ दोन-दोन राष्ट्रांचाच समावेश होता. मात्र पुढील दोन दशकात ही सदस्य संख्या १९४ वर पोहचली. त्यातील ५० पेक्षा अधिक सदस्य ही आशिया व अफ्रिका खंडातील होती. आशिया व आफ्रीका खंडातील सदस्य राष्ट्रांची सदस्य संख्या वाढण्याबरोबरच त्यांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न ही निर्माण झाला. स्थापणेच्या वेळी संयुक्त राष्ट्रांची सदस्य संख्या ५१ होती. त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रांच्या रचनेत प्रतिनिधित्व प्रदान करण्यात आले होते. परंतु संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य संख्येबरोबरच घटक संस्थांची सदस्यसंख्या देखील वाढवली जावी व त्यामधून आशियाई-

आफ्रीकी राष्ट्रांना प्रतिनिधित्व दिले जावे या मागणीने १९५० आणि १९६०च्या दशकात जोर पकडला. उदा. १९६३ साली स्थापन झालेल्या ऑर्गनाझेशन ऑफ आफ्रिकन युनिटी या आफ्रिकन राष्ट्रांच्या संघटनेने आपल्या पहिल्याच परिषदेत संयुक्त राष्ट्रांच्या विविध संस्था-संघटनांमध्ये आफ्रिकी राष्ट्रांना त्यांच्या संस्थेच्या प्रमाणात योग्य प्रतिनिधित्व मिळावे अशी एकमताने मागणी केली होती. सुरक्षा परिषदेचा अपवाद करता पुढील काळात तीन घटना दुरुस्त्या करून संयुक्त राष्ट्रांच्या घटक संस्थांची सदस्य संख्या वाढवली.

**२) द्वितीय टप्पा – कार्यात्मक व गुणात्मक सुधारणा**

संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासूनच सुधारणांच्या दृष्टीने दोन मतप्रवाह आढळून येतात. यातील एक प्रवाह हा संख्यात्मक विस्ताराचा व दुसरा प्रवाह हा कार्यात्मक सुधारणा व गुणात्मक वाढीवर भर देणारा होता. १९४५ ते १९७० पर्यंत प्रथम प्रभाव प्रभावी होता. १९७० नंतर मात्र दुसरा प्रभाव पुढे आला. संयुक्त राष्ट्रांच्या विविध घटक संस्थांचा केवळ संस्थात्मक विस्तार करून भागणार नाही तर गुणात्मक वाढीच्या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत हा विचार पुढे आला. आफ्रो-आशियाई राष्ट्रांना प्रतिनिधित्व प्राप्त झाले तरी गुणात्मक सुधारणेचा प्रश्न हा अनिर्णीतच होता. त्यामुळे सुधारणेच्या या प्रवाहातंर्गत गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रामुख्याने पुढील घटकांना प्राधान्य देण्यात आले.

अ) विविध संस्थातंर्गत होणाऱ्या कार्याचे संतुलन व व्यवस्थापन

ब) कार्याची पुनरावृत्ती टाळणे

क) कार्यात पारदर्शकता

ड) उत्तरदायित्व

इ) आंतरराष्ट्रीय बिगर शासकीय संस्था-संघटनाना कार्यात सहभागी करून घेणे, त्यांचे अहवाल, शिफारशी व संस्थांचा विचार करणे.

ई) निर्णयनिर्मिती प्रक्रियेत सुधारणा बाबतच्या मुद्यांवर अनेक सुधारणा प्रस्ताव विविध घटकांकडून आले परंतु सुरक्षा समितीतील बडया राष्ट्रांच्या दुटप्पी भूमिकेमुळे या सुधारणा प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत.

**३) आर्थिक सुधारणा –**

१९५० च्या दशकापासून आर्थिक सुधारणेची मागणी होत असली तरी या मागणीची तीव्रता प्रामुख्याने शीतयुद्धोत्तर काळात वाढली. कारण शीतयुद्धोत्तर काळात संयुक्त राष्ट्रांच्या कार्यात प्रचंड वाढ झाली व दुसऱ्या बाजूने शांतिमोहीमांची संख्या ही वाढत गेली. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक सुधारणां संदर्भात प्रामुख्याने पुढील घटक विचारार्थ आले.

१) संयुक्त राष्ट्रांना स्वत:चा आर्थिक स्रोत उपलब्ध नसल्यामुळे खर्चाकरिता बडया राष्ट्रांवर संयुक्त राष्ट्रांना विसंबून रहावे लागते.

२) सदस्य राष्ट्रे आपला निधी विहीत वेळेत जमा करत नाहीत त्यावर काय उपाय करता येतील.

३) संयुक्त राष्ट्राचे व्यवस्थापन करून खर्च कपात कशी करता येईल.

४) थकबाकी भरताना सदस्य राष्ट्रे अनेक अटी घालतात याबाबत उपाय करणे.

५) संयुक्त राष्ट्राच्या खर्चात कपात करण्याकरिता कर्मचारी कपात व अनावश्यक कार्य टाळणे.

६) संयुक्त राष्ट्रांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन निर्माण करण्याकरिता प्रयत्न करणे

७) संयुक्त राष्ट्रांची उद्योग जगताशी भागीदारी वाढवून खर्चाची विभागणी कशी करता येईल ते पाहणे.

वरील बाबींना आर्थिक सुधारणा प्रक्रियेत प्राधान्य देण्यात आले. यासंदर्भात मागील तीन दशकात अनेक अहवाल सादर झालेले दिसतात.

**सुधारणा प्रक्रियेतील अडथळे –**

संयुक्त राष्ट्रांच्या एकूण प्रक्रियेत सुधारणा घडवून आणणाऱ्या मार्गात अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात त्यातील प्रमुख घटकांची मांडणी पुढील मुद्दयांच्या आधारे करता येईल.

**१) संकल्पनात्मक मतभेद –**

संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत सुधारणांची प्रक्रिया संथ राहण्यामागे सदस्य राष्ट्रांची संक्लपनात्मक भिन्नता ही एक प्रमुख समस्या म्हणून पुढे आलेली दिसते. अगदी सुधारणा म्हणजे नेमके काय? या प्राथमिक बाबी संदर्भात ही सदस्य राष्ट्रांमध्ये एकवाक्यता आढळत नाही. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांमध्ये अंतर्गत सुधारणेची निश्चित व्याख्या प्रस्तुत करण्यात वा त्यास मान्यता प्राप्त करून देण्यात संयुक्त राष्ट्रांना यश प्राप्त झालेले दिसत नाही. त्यामुळे प्रत्येक राष्ट्र सुधारणा प्रस्तावांकडे स्वहित संबंधाच्या दृष्टिनेच पाहतात. त्यामुळे संयुक्त राष्ट्रातील एखाद्या राष्ट्र वा राष्ट्रगटाकडून मांडलेला सुधारणा प्रस्ताव दुसऱ्या राष्ट्रगटांकडून नाकारला जातो. त्यामुळे संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांमध्ये संकल्पनात्मक अर्थ संदर्भात एक वाक्यता नसणे ही संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा मार्गातील एक प्रमुख समस्या बनलेली दिसते.

**ii) बदल प्रक्रियेच्या व्याप्ती बाबतीतील संभ्रम:-**

संयुक्त राष्ट्रांमध्ये अंतर्गत बदलाची प्रक्रिया पार पाडत असतांना या बदलाच्या प्रक्रियेत कोणकोणत्या घटकांना सहभागी करून घ्यावे याबाबत ही संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांमध्ये एकवाक्यता नाही. सुधारणा म्हणजे काय? याबाबत जसे संयुक्त राष्ट्रांच्या सदस्य राष्ट्रांमध्ये एकमत नाही त्याप्रमाणे सुधारणा कोणत्या क्षेत्रात करावयाच्या? याबाबत ही एकावाक्यता नाही. संयुक्त राष्ट्रांची जी तत्वे आधारभूत मानली जातात त्याबाबत सुधारणा करावयाची की नाही? संयुक्त राष्ट्रांची जी प्रमाण

कार्यपद्धती आहे, रचना आहे त्यात सुधारणा करावयाची की नाही? यासारख्या बाबींमध्ये सदस्य राष्ट्रांमध्ये मतभेद असल्याने सुधारणांची व्याप्ती नेमकी काय? याची निश्चिती अद्यापही झालेली दिसत नाही. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांचे तत्कालीन महासचिव कोफी अन्नान यासंदर्भात म्हटले होते. "In an organisation as 1979 and Complex as the United Nations, reform necessarily consists not of one or two simple actions but a multitude of tasks that amount to a major agenda that must be presued over time."

**ii) संयुक्त राष्ट्रांचे राजकीय स्वरूप –**

संयुक्त राष्ट्रांचे मुलभूत स्वरूप व रचना ही राजकीय आहे. संयुक्त राष्ट्रास काळाच्या ओघात अधिकाधिक बहुआयामी स्वरूप प्राप्त होत गेले असले तरी राजकीय घटकास संयुक्त राष्ट्राच्या स्वरूपात प्रथम स्थान प्राप्त झालेले दिसते. हा राजकीय आयामच संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत सुधारणांमध्ये मोठा अडथळा ठरतांना दिसतो. प्रत्येक सभासद राष्ट्र संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर मांडलेल्या प्रस्तावाकडे राजकीय दृष्टीकोनातूनच पाहतात. प्रत्येक राष्ट्र स्वहितसंबंधाच्या परिप्रेक्ष्यातून त्या-त्या प्रस्तावाचे फायदे व तोटे जोखतांना आढळतात. त्यावरूनच त्या प्रस्तावास विरोध करायचा की त्याचे समर्थन करावयाचे हे प्रत्येक राष्ट्र ठरवतांना दिसते. सुधारणा प्रस्ताव कोणी मांडला व त्या प्रस्तावाची अंमलबजावणी कोणाकडून होणार? त्याची किमंत कोणास चुकवावी लागणार त्याचा आपल्यास काय फायदा होणार? याबाबींना प्रत्येक राष्ट्र प्राधान्य देत त्या प्रस्तावाचा स्वीकार वा नकार ठरवत असल्याने संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणा प्रक्रियेस राजकीय रंगानी अधिक गडद केल्याचे निदर्शनास येते. एकंदरीत, संयुक्त राष्ट्राचे राजकीय स्वरूप हा संयुक्त राष्ट्रांच्या अंतर्गत सुधारणा प्रक्रियेतील एक प्रमुख अडचण ठरतांना दिसतो आहे.

## ४.४ संयुक्त राष्ट्रांचे औचित्य / प्रस्तुतता –

संयुक्त राष्ट्रे हे जागतिक व्यासपीठ समकालीन संदर्भात अधिकच अनिवार्य व प्रस्तुत आहे हे पुढील काही मुद्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

**१) राष्ट्र-राज्यांमध्ये सुसंवाद साधणारी संघटना –**

समकालिन राष्ट्र-राज्य व्यवस्थेमध्ये समन्वय व सुसंवाद साधणारी जागतिक संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रांची प्रस्तुतता अधिक प्रभावी ठरतांना दिसते. राष्ट्रां-राष्ट्रांमधील द्विपक्षीय, विभागीय व वैश्विक पातळीवरील विविध स्वरुपाच्या समस्या सोडविणारी एक कार्यकारी वैश्विक परिषद म्हणून संयुक्त राष्ट्रांची एक अमिट ओळख तयार झाली आहे. बहुपक्षीयता वृद्धींगत करण्यात संयुक्त राष्ट्रे आज निर्णायक भूमिका बजावतांना दिसते. ही संयुक्त राष्ट्रांची भूमिकाच त्यास अधिक औचित्यपूर्ण ठरवतांना दिसते आहे. संयुक्त राष्ट्रांकडून राष्ट्र-राज्य व्यवस्थेतील समस्या सोडवतांना ही प्रत्येक राष्ट्राच्या धोरणांमध्ये कृतींमध्ये समन्वय साधण्याचे कार्य पार पाडले जात आहे. परस्पर सहकार्य, परस्पर संवाद व शांततेच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक करण्याचे एकमेव वैश्विक व्यासपीठ म्हणून संयुक्त

राष्ट्रांचे स्थान अढळ स्वरूपात पुढे आले आहे. त्यामुळेच शशी थरूर यासंदर्भात म्हणतात,

''The UN is a form where sovereign states can work out strategies for tackling global problems and an instrument for putting those strategies into effect.''

संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून सर्व राष्ट्रांना आपले प्रश्न, समस्या, मते आंतरराष्ट्रीय समूदायासमोर मांडण्याची, आपली भूमिका विशद करण्याची संधी तर मिळतेच परंतु त्याबरोबरीनेच वैश्विक स्वरूपाच्या प्रश्नांचा सामना करण्यासाठी जागतिक सहकार्य व समर्थन ही प्राप्त होते. त्यामुळेच मानवी हक्कांचे उल्लंघन, जागतिक दहशतवाद, जैविक विविधता, जागतिक तापमानवाढ, वातावरणातील बदल, एड्स महामारी यासारख्या समस्या व प्रश्नांची सोडवणूक ही संयुक्त राष्ट्रांच्या सहभागाशिवाय शक्य होवू शकणार नाही ही वस्तुस्थिती सर्व राष्ट्र-राज्यांना जाणवू लागली आहे. संयुक्त राष्ट्रे वैश्विक स्वरूपाच्या समस्यांवर जागतिक लोकमत तयार करण्याचे व ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य निर्माण करण्याचे कार्य संयुक्त राष्ट्रांकडून पार पाडले जात आहे. वास्तविक वैश्विक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्रांच्या धोरणांमध्ये समन्वय साधणे पुरेसे नसते तर त्यांच्या धोरणांमध्ये सुसंवाद निर्माण करणे ही आवश्यक असते. राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये हा सुसंवाद निर्माण व्हावा याकरिता संयुक्त राष्ट्रे. 'A Center for harmonizing actions of states म्हणून आपली भूमिका चोख बजावत आहे. यादृष्टीने संयुक्त राष्ट्रांचे औचित्य अधिक उठून दिसते.

**२) वैश्विक कायदा व मूल्यांवर आधारीत संघटना –**

आंतरराष्ट्रीय समुदायातील सर्वाधिक राष्ट्रांचे प्रतिनिधित्व करणारी वैश्विक संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रांचे स्थान असाधारण आहे. केवळ संख्याच नव्हे तर आधाराच्या दृष्टीने ही संयुक्त राष्ट्रांचे समकालीन औचित्य अधिक महत्वाचे ठरतांना दिसते. संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेचे दोन मूलभूत आधार म्हणून आंतरराष्ट्रीय कायदा व वैश्विक मानवी मूल्य या घटकांना प्राधान्य देण्यात आले होते. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांची स्थापना करत असतांना सदस्य राष्ट्रांमध्ये सार्वभौमत्वाची समानता, राष्ट्रांना अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होणार नाही याची हमी, राष्ट्रा-राष्ट्रांमधील समस्या प्रश्न युद्ध व संघार्षाऐवजी शांतता, सहकार्य व संवादाच्या माध्यमातून सोडवण्यास प्राधान्य, प्रत्येक राष्ट्राच्या स्वरक्षणाच्या अधिकाराचा सन्मान या आंतरराष्ट्रीय कायद्याच्या मूलभूत तत्वांना प्राधान्य देण्यात आले होते. त्याचबरोबर दुसऱ्या महायुद्धात ज्या पध्दतीने मानवी मूल्यांची, हक्कांची पायमल्ली झाली त्यातून वैश्विक जनसमुदायास सावरण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी शांतता, सहकार्य, बंधुत्व, स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवी हक्क यातत्वांना आपल्या स्थापनेंचा एक प्रमुख आधार मानले. संयुक्त राष्ट्रांच्या या मानवी मूल्यांच्याआधारातून मानवी हक्कांच्या रक्षणाचे उद्दिष्ट विकसित झाले. त्यामुळेच अमेरिकेचे तत्कालिन परराष्ट्रमंत्री असलेले कार्डेल हल यासंदर्भात म्हणाले होते. ''The fulfillment of humanities highest aspirations.'' ह्यामुळेच आज ही आंतरराष्ट्रीय कायद्याची

अंमलबजावणी व मानवी हक्क व मुल्यांचे संरक्षक / संवर्धन यादृष्टीने संयुक्त राष्ट्रे प्रस्तुत आहे.

**३) जागतिक सर्वोच्च व्यवस्था –**

समकालिन संदर्भात संयुक्त राष्ट्रे सुरक्षा, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये एक मध्यवर्ती राजवट म्हणून उदयास आली आहे. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याची संपूर्ण जबाबदारी संयुक्त राष्ट्रांकडे असलेली आपणांस पहावयास मिळते. यादृष्टीनेच सामूहिक सुरक्षितते करिता कोणत्याही राष्ट्राविरोधात कारवाई करण्याचा अधिकार संयुक्त राष्ट्रांकडे आहे जो इतर कोणत्याही संघटनेस प्राप्त झालेला दिसत नाही. वास्तविक बहुपक्षीयता व सामूहिक सुरक्षितता या संयुक्त राष्ट्रांच्या दोन प्रमुख आधारभूत तत्वांमुळेच दुर्बल राष्ट्रांच्या स्वातंत्र्य व सार्वभौमत्वाचे संरक्षण होतांना दिसते आहे. छोटया व कमकूवत राष्ट्रांच्या संरक्षणाचा प्रश्न हा ऐतिहासिक काळापासून गंभीर स्वरूप धारण केलेला आपणास दिसतो. अशा दुर्बल राष्ट्रांच्या संरक्षणाकरीता राष्ट्रांपेक्षा अधिक शक्तीशाली व श्रेष्ठ बहुपक्षीय संस्थात्मक यंत्रणेची आवश्यकता असते. ही आवश्यकता सयुक्त राष्ट्रे पूर्ण करताना दिसते. संयुक्त राष्ट्रांच्या सनदेत त्यादृष्टीने स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे की, संघटनेच्या एका सदस्य राष्ट्रावरील आक्रमण हे सर्व सदस्य राष्ट्रांवरील आक्रमण म्हणून गृहीत धरले जाईल. या आक्रमणाचा सर्व सदस्य राष्ट्रे एकत्र येऊन मुकाबला करतील व हे आक्रमण परतवून लावण्याचा प्रयत्न करतील. या दृष्टीने संयुक्त राष्ट्रे स्थापने पासून आजतागायत कटिबद्ध असल्याचे प्रत्ययास येते त्यामुळे त्याची प्रस्तुतता अधिकच आवश्यक ठरतांना दिसते.

**४) मानवी सभ्यतेचे आशास्थान –**

संयुक्त राष्ट्रांकडे मानवी सभ्यतेचे आशास्थान म्हणून पाहिले जात आहे. दोन महायुद्धांच्या दाहक अनुभवांनी होरपळलेल्या जागतिक मानवी समुदायासाठी शांतता व सहकार्याची आशा संयुक्त राष्ट्रांनी अधिक आश्वासक केली. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रांचे तत्कालिन महासचिव डॅग हॅमराशिल्ड म्हणतात. "Peace is possible"हा आशावाद संयुक्त राष्ट्रांमुळे दृष्टीपथात आला. १४ ऑगस्ट १९४१ रोजी पारित झालेल्या अटलांटिक सनदेमधून ही हा आशावाद अधिक आश्वासक स्वरूपात व्यक्त झालेला दिसतो. अटलांटिक सनदेतील पुढील शब्द त्याची आपणांस प्रचिती देतात, "The establishment of Peace, which will afford to all nations the means of dwelling in safety within their own boundries" जागतिक शांततेकरिता अटलांटिक सनदे मध्ये A wider and Permanent System of general Security ची संकल्पना अंतर्भूत करण्यात आली. एकंदरीत सामूहिक सुरक्षितता हे संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेतील एक आधारभूत तत्व आहे. संयुक्त राष्ट्रांनी या तत्वाच्या प्रस्थापनेकरिता जे कार्य केले आहे जी भूमिका घेतली आहे त्यामुळे संयुक्त राष्ट्रे हे मानवी संस्कृती करीता एक महत्वाचे आशास्थान म्हणून पुढे आले आहे. जे आजही तेवढेच औचित्यपूर्ण वाटते.

**५) संयुकत राष्ट्रे बहुपक्षीयतेच्या विचारविनिमयाचा अविष्कार –**

संयुक्त राष्ट्रांसारखी आंतरराष्ट्रीय संघटना आज वैश्विक स्वरूप धारण करत जागतिक शांतता व सुरक्षितता राखण्यात महत्वाची भूमिका बजावत असली तरी अशा पद्धतीच्या संघटनेची स्थापना करणे हा मूल विचार मात्र बराच जुना आहे. आंतरराष्ट्रीय संघयनेच्या कल्पनेचे बीजे प्रामुख्याने आपणांस युरोपच्या इतिहासामध्ये आढळतात. १७ व्या शतकामध्ये युरोपमध्ये राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये युद्ध छेडले गेले जे पुढे ३० वर्षे चालले. वेल्टपालियाच्या तहाने हे युद्ध संपुष्टात आले. या वेल्टफालियाच्या तहातून जशी राष्ट्र-राज्याची कल्पना अधिक विकसित झाली त्याप्रमाणेच आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचेही बीजारोपन या तहातून झालेले दिसते. १६४८ साली झालेल्या या वेल्टफालियाच्या तहाने केवळ यूरोपियन राष्ट्रांमधील संघर्ष व युद्धच थांबविले नाही तर राष्ट्रां-राष्ट्रांमधील संघर्ष सोडविण्याकरिता बहुपक्षीय सहकार्याचा मार्ग ही प्रस्तुत केला. वेल्टफालियाच्या तहा अगोदर युरोपियन राष्ट्रांमध्ये राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्षाची सोडवणूक करण्यासाठी द्विपक्षीय राजनय पद्धतीचा अवलंब केला जात असे वेल्टफालियाच्या तहाने बहुपक्षीय विचारविनिमय प्रक्रियेस चालना दिली. त्यानंतरच्या काळात या मार्गाने राष्ट्रे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देऊ लागली. त्यामुळे वेल्टफालियाच्या तहाने बहुपक्षीय विचारविनमय प्रक्रियेचा पाया घातला असे म्हटले जाते. त्याचाच पुढे परिषद राजनय असे संबोधले गेले.

संयुक्त राष्ट्रांची स्थापना ही बहुपक्षीय विचारविनिमय प्रक्रियेचाच एक अविष्कार होय. दुसरे महायुद्ध चालू असतानच आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्याकरिता एका सक्षम आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचा विचार पुढे आला. १ जानेवारी १९४२ रोजी अमेरिकेचे तत्कालिन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन रूझवेक्ट यांनी 'संयुक्त राष्ट्रे' या संकल्पनेची घोषणा केली. अटलांटिक सनद, कासाब्लांका परिषद, मॉस्को परिषद, डबस्टान ओकस प्रस्ताव, याल्टा परिषद, सॅनफ्रान्सिसको परिषद असा प्रवास करत संयुक्त राष्ट्रे ही संघटना बहुपक्षीय विचार विनिमय प्रक्रियेतून आकारास आली. सॅनफ्रान्सिस्को परिषदेचा संदर्भ घेतला तरी याची प्रचिती आपणास येते. २५ एप्रिल ते २६ जून १९४५ या दरम्यान सॅन फ्रान्सिस्को येथे ही परिषद भरविण्यात आली. या परिषदेत ५० राष्ट्रांचे २८२ प्रतिनिधी उपस्थित होते. जवळ-जवळ दोन महिने चाललेल्या या परषिदेमध्ये संयुक्त राष्ट्राच्या सनदेस अंतिम स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या करिता अनेक समित्या व आयोग निर्माण करण्यात आले होते. याच परिषदेमध्ये सुरक्षा परिषदेमधील पाच कायम सदस्य राष्ट्रांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. अमेरिका, सोव्हियत रशिया, इग्लंड, फ्रान्स, चीन या सुरक्षा परिषदेच्या पाच कायम सदस्य राष्ट्रांनी २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर स्वाक्षरी केली. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी अशा रीतीने संयुक्त राष्ट्रे ही संघटना अस्तित्वात आली त्यामुळे २४ ऑक्टोबर हा दिवस संयुक्त राष्ट्रे दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. अशा रीतीने सखोल बहुपक्षीय विचार विनिमयातून स्थापन झालेली संघटना समकालनि संदर्भात ही अधिक प्रभावी ठरतांना दिसते त्यामुळे तीची प्रस्तूतता निर्णायक आहे या निष्कर्षाप्रत आपण येतो.

## ४.५ सारांश –

एकंदरीत जागतिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रे ही जागतिक संघटना बहुपक्षीय विचारविनिमयाच्या प्रक्रियेतून २४ ऑक्टोबर १९४५ रोजी अस्तित्वात आली. पहिले महायुद्ध व दूसरे महायुद्ध या दरम्यानच्या काळात मानवी हक्कांचे झालेले उल्लंघन दोन महायुद्धांमध्ये झालेली प्रचंड वित्त व मनुष्यहानी यामुळे जग भयभीत झाले होते. युद्ध संघर्ष यातून मानवी समाजाची मुक्तता करण्यासाठी शांतता, सहकार्य व संवाद याशिवाय पर्याय नाही या जाणीवेतून जागतिक धुरीणत्व करणाऱ्या नेत्यांनी संयुक्त राष्ट्रांचा विचार प्रस्तूत केला व त्यास उत्तरोत्तर अधिक समृद्ध करण्याचे काम पुढच्या पिढीतील जागतिक नेतृत्वाने वेळोवेळी केलेले दिसते. तत्कालिन परिस्थितीच्या अवलोकनातून राजकीय व लष्करी परिस्थितीतून आकारास आलेल्या या जागतिक संघटनेच्या स्वरूपात, उद्दिष्टांमध्ये काळाच्या ओघात बदल करण्याचा त्यास अधिक व्यापक व प्रभावी बनविण्याचाही प्रयत्न होतांना दिसतो आहे. परंतु सदस्य राष्ट्रांची स्वहितसंबंधी भूमिका बडया राष्ट्रांची दांभिकता संयुक्त राष्ट्रांचे राजकीय स्वरूप व आर्थिक, लष्करी दुर्बलता या घटकांमुळे त्यास मोठया मर्यादा निर्माण झालेल्या दिसतात. तरीही जागतिक जनसमूदायास तिसऱ्या महायुद्धाच्या धोक्यापासून वाचवण्याचे व जागतिक शांततेचे आशास्थान अधिक आश्वासक करण्याचे महान कार्य संयुक्त राष्ट्रांनी पार पाडलेले दिसते.

## ४.६ आपण काय शिकलो?

प्र. १ ला. संयुक्त राष्ट्रांचे बदलते स्वरूप स्पष्ट करा.

प्र.२ रा. संयुक्त राष्ट्रातील बदल वा सुधारणा प्रक्रियेवर निबंध लिहा

प्र. ३ रा. संयुक्त राष्ट्रातील सुधारणा प्रक्रियेतील अडथळ्यांची चर्चा करा.

प्र. ४ था. संयुक्त राष्ट्राचे महत्व विशद करा.

प्र. ५ वा. संयुक्त राष्ट्राचे औचित्य सोदाहरण लिहा.

**टिपा लिहा**

१) संयुक्त राष्ट्राचे स्वरूप

२) संयुक्त राष्ट्राची प्रस्तुतता

३) संयुक्त राष्ट्र स्वरूपातील सुधारणा

४) संयुक्त राष्ट्रे सुधारणेतील अडथळे

५) संयुक्त राष्ट्रांची सुधारणा प्रक्रिया

## ४.७ संदर्भ सूची –


१) देवळाणकर शैलेंद्र, संयुक्त राष्ट्रे, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००८

२) रायपूरकर वसंत, आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाश, नागपूर २००१

३) अग्रवाल रामेश्वर दयालू, गुप्ता कैलाशचंद्र, आंतरराष्ट्रीय राजनीती, जयप्रकाशनाथ कंपनी, मेरठ, १९७२

४) चिंचूनसुरे मा. दि., संयुक्त राष्ट्रसंघ, इंडिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई १९७०

५) वेदालंकार हरिदत्त, 'आंतरराष्ट्रीय संबंध' सरस्वती सदन, दिल्ली-७, १९७१

६) शर्मा प्रभुदत्त, 'आंतरराष्ट्रीय राजनितीकी विचारभूमी', कॉलेज बुकडेपो, जयपुर १९६९

७) Joshua Goldstein, 'International Relations' Long Man


❄❄❄❄❄❄❄